**(सभापतीस्थानी माननीय सभापती)**

**म.वि.प.नियम 289 अन्वये प्रस्तावाच्या सूचनेसंबंधी**

**सभापती** : माननीय विरोधी पक्ष नेते.

श्री.धनंजय मुंडे : सभापती महोदय, या सभागृहात पुन्हा एकदा नियम 289 अन्वये शेतकऱ्यांच्या कर्जमुक्तीसंदर्भात सरकारला विनंती करण्यासाठी मी उभा आहे. पेरण्या होऊन 25 दिवस झाले आहेत. पेरणी होऊन 25 दिवस झाल्यानंतर सुध्दा पाऊस न पडल्यामुळे, आता दुबार पेरणीचा विषय येत नाही. सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे, आम्ही आपल्या भूमिकेशी थोडेसे सहमत आहोत. कारण आपण कालपासून आमच्या भूमिकेशी सहमत झालेला आहात.

**सभापती** : माननीय विरोधी पक्ष नेते, मी कालही विचारले होते आणि आजही विचारतो की, आपण कोणत्या माध्यमातून हा विषय मांडत आहात ?

श्री.धनंजय मुंडे : सभापती महोदय, महाराष्ट्र विधानपरिषद नियम 289 अन्वये या राज्यातील शेतकऱ्यांची कर्जमुक्ती करावी म्हणून मी हा विषय मांडत आहे. कारण शेतकऱ्यांनी पेरण्या करुन 25 दिवस होऊनही पाऊस पडलेला नाही. आता दुबार पेरणीसाठी राज्य सरकारने कितीही आणि काहीही करावयाचे म्हटले तरी शेतकरी दुबार पेरणी करु शकत नाही. कारण येथून पुढे पाऊस पडल्यानंतर राज्यातील राज्यकर्त्यांनी शेतकऱ्यांना दुबार पेरणी कशी करावयाची याचे ज्ञान दिले पाहिजे. या सरकारकडून दावा केला जात आहे की, मागे शेतकऱ्यांच्या कर्जाचे पुनर्गठन केलेले आहे. परंतु प्रत्यक्षात पुनर्गठन झालेले नाही. पुनर्गठन झालेल्या कर्जाची परतफेड कशी करावयाची हा प्रश्न आज शेतकऱ्यांसमोर आहे. म्हणून आम्ही.....

(विरोधी पक्षाचे काही सन्माननीय सदस्य वेलमध्ये येऊन घोषणा देतात.)

श्री.एकनाथराव खडसे : सभापती महोदय, म.वि.प. नियम 260 अन्वये या विषयासंदर्भातील प्रस्ताव आजच्या कामकाजपत्रिकेवर दर्शविलेला आहे. त्यावेळी विरोधी पक्षाच्या सन्माननीय सदस्यांना त्यावर बोलता येईल. मला वाटते विरोधी पक्षाला या विषयावर चर्चा करावयाची नाही. मी विरोधी पक्षाला विचारु इच्छितो की, आपल्याला यामध्ये राजकारण करावयाचे आहे काय ? आज

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

राज्यासमोर अनेक महत्त्वाचे प्रश्न आहेत. राज्यातील शेतकरी सरकारकडे आशेने पाहत आहे.

..2..



श्री.एकनाथराव खडसे....

आम्ही निर्णय घ्यावयास तयार आहोत. आजच्या कामकाजपत्रिकेवर या विषयाच्या अनुषंगाने प्रस्ताव दर्शविलेला आहे. निव्वळ राजकीय हेतूने आणि राजकारणासाठी विरोधी पक्ष सभागृहाचा वेळ वाया घालवित आहे. विरोधी पक्षाला शेतकऱ्यांशी काही देणे-घेणे नाही.

**सभापती** : सभागृहाची बैठक मी 1 तासासाठी स्थगित करीत आहे.

(सभागृहाची बैठक दुपारी 12.04 ते 1.04 वाजेपर्यंत स्थगित झाली.)

----------

नंतर श्री.कांबळे....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**(स्थगितीनंतर)**

**(सभापतीस्थानी तालिका सभापती प्रा. जनार्दन चांदूरकर)**

(विरोधी पक्षातील अनेक सन्माननीय सदस्य वेलमध्ये येऊन घोषणा देत असतात.)

श्री. धनंजय मुंडे : सभापती महोदय, शेतकऱ्यांना कर्जमाफी दिली पाहिजे. 25 दिवस झाले, राज्यात पाऊस झालेला नाही. दूबार पेरणी करूनसुध्दा शेतकरी जगू शकत नाहीत. कर्जमाफी शिवाय ....

(विरोधी पक्षातील अनेक सन्माननीय सदस्य वेलमध्ये घोषणा देतच असतात.)

(गोंधळ)

**तालिका सभापती** : सभागृहाची बैठक मी पुन्हा 20 मिनिटांकरिता स्थगित करीत आहे.

(सभागृहाची बैठक दुपारी 01.03 ते 01.23 वाजेपर्यंत स्थगित झाली.)

( नंतर श्री. रोझेकर ....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**(स्थगितीनंतर)**

**(सभापतीस्थानी माननीय तालिका सभापती श्री.दीपकराव साळुंखे)**

(विरोधी पक्षाचे काही सन्माननीय सदस्य वेलमध्ये येऊन एकत्रितपणे घोषणा देत असतात.)

**तालिका सभापती :** सभागृहातील गोंधळसदृश परिस्थितीत मला सभागृहाचे कामकाज पार पाडणे शक्य होत नसल्यामुळे मी सभागृहाची बैठक 1 तासासाठी स्थगित करतो.

(सभागृहाची बैठक दुपारी 1.24 ते 2.24 वाजेपर्यंत स्थगित झाली.)

------------

यानंतर श्री.बोरले......

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**( स्थगितीनंतर )**

**( सभापतीस्थानी माननीय सभापती )**

श्री.हेमंत टकले : सभापती महोदय, आपण मागील 3 दिवसापासून सभागृहातील सर्व कामकाज बाजूला ठेऊन शेतकऱ्यांच्या कर्जमुक्तीच्या विषयावर चर्चा होईल म्हणून वाट बघत आहेत. त्या अगोदर अधिवेशनाच्या पूर्वसंध्येला मुख्यमंत्री महोदयांनी असे निवेदन केले की, आम्ही शेतकऱ्यांना कर्जमुक्ती देऊ शकत नाही. त्या संदर्भात आमच्या सर्वांची मागणी होती की, अशा प्रकारची भूमिका घेणे अतिशय अयोग्य आहे. आज राज्यामध्ये भीषण परस्थिती उद्‌भवलेली असताना अशा प्रकारचे स्टेटमेंट होत असेल तर त्या स्टेटमेंटचा आधार घेतल्यानंतर या विषयावर पुढे चर्चाच होऊ शकत नाही. म्हणून आम्ही अशी मागणी केली होती की, मुख्यमंत्री महोदयांनी अधिवेशनाच्या पूर्वसंध्येला जे निवेदन केले त्याबाबत सभागृहात स्पष्टीकरण झाले पाहिजे आणि ते स्पष्टीकरण झाल्या नंतरच आपल्याला सभागृहाचे पुढील कामकाज सुरु करता येईल.

सभापती महोदय, परिस्थिती अतिशय अवघड आहे आणि याची जाणीव सर्व सन्माननीय सदस्यांना व्हावयास पाहिजे. मागील 8-15 दिवसापूर्वी अशी घटना घडलेली आहे की, एका शेतकरी सरपंच महिलेने सावकाराकडून कर्ज घेतले होते. कर्जात अडकलेल्या त्या महिलेने त्या सावकाराला ॲफिडेव्हिट करुन ग्रामपंचायत चालविण्याचे अधिकार दिले होते आणि ते स्टेटमेंट नोटराईज करुन घेतले होते. अशा प्रकारची अवस्था या शासनामार्फत केलेल्या किंवा न केलेल्या उपायांमुळे होत असेल तर ते राज्याच्या आणि शेतकऱ्यांच्या दृष्टीने अत्यंत दुर्दैवी आहे. आता पाऊस लांबलेला आहे आणि आणखी 15 दिवस पाऊस पडलाच नाही तर दुबार पेरणी देखील होणे शक्य नाही. म्हणून या विषयाची संवेदनशीलता लक्षात घेऊन मुख्यमंत्री महोदयांनी जे निवेदन केलेले आहे त्याबाबतचे स्पष्टीकरण आणि शासनाची भूमिका जोपर्यंत या सभागृहात मांडली जात नाही तोपर्यंत दुसरा कोणताही विषय चर्चेसाठी घेण्यात येऊ नये, आम्हाला ते मान्य होणार नाही. त्या दृष्टीने सत्ताधारी पक्षाला काही निवेदन करावयाचे असेल त्यांनी ते निवेदन करावे.

..2...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.प्रकाश महेता : सभापती महोदय, माननीय विरोधी पक्षनेते आणि मुख्यमंत्री महोदयांसमवेत आताच या विषयावर स्पष्टता झालेली आहे. मुख्यमंत्री महोदयांनी असे सांगितले की, आपण 3 दिवसापासून कामकाजात भाग घेतलेला नाही, असे शब्द प्रयोग मी कोठेही केलेले नाहीत. आजच्या कामकाज पत्रिकेवर विरोधी पक्षाचा प्रस्ताव दाखविण्यात आलेला आहे, तो प्रस्ताव आपण मांडावा. कर्जमाफी देणे शक्य नाही, असे शब्द प्रयोग केलेले नाहीत तर.....

( विरोधी पक्षाचे काही सन्माननीय सदस्य आपापल्या जागेवर उभे राहून एकत्रितपणे बोलण्याचा प्रयत्न करतात.)

**सभापती** : सन्माननीय सदस्यांनी कृपया आपल्या जागेवर बसावे. आपण मंत्री महोदयांचे म्हणणे ऐकून घ्यावे.

श्री.अमरसिंह पंडित : सभापती महोदय, माझी हरकत आहे.

श्री.एकनाथराव खडसे : सभापती महोदय, ज्यावेळी विरोधी पक्षाचे सन्माननीय सदस्य बोलण्यासाठी उभे राहता त्यावेळी आम्ही त्यांचे म्हणणे शांतपणे ऐकून घेतो आणि आम्ही बोलण्यासाठी उभे राहतो त्यावेळी तुम्ही गोंधळ करता ? तुम्ही सभागृहाचे 4 दिवस वाया घालविले. तुम्हाला शेतकऱ्यांविषयी आस्था आहे तर शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर चर्चा करावयास पाहिजे, विषय मांडावयास पाहिजे. तुम्ही एका विषयावर सभागृहाचे जाणीवपूर्वक 4 दिवस वाया घालविले, विनाकारण पैसा वाया जात आहे, वेळ वाया जात आहे.

**सभापती** : माननीय संसदीय कार्यमंत्र्यांनी आपले म्हणणे पूर्ण करावे.

( विरोधी पक्षाचे काही सन्माननीय सदस्य आपापल्या जागेवर उभे राहून एकत्रितपणे बोलण्याचा प्रयत्न करतात.)

श्री.एकनाथराव खडसे : सभापती महोदय, माझा माईका का बंद केला ? सभापती महोदय, आम्ही ज्यावेळी बोलण्यासाठी उभे राहतो त्यावेळी हे गोंधळ करता. ज्यावेळी तुम्ही बोलण्यासाठी उभे राहतात त्यावेळी आम्ही तुमचे म्हणणे शांतपणे ऐकून घेतो. माननीय सभापती महोदयांनी आम्हाला बोलण्यासाठी परवानगी दिल्यानंतर आपण आमचे म्हणणे ऐकून घेतले पाहिजे, का तुम्ही गोंधळ करावयाचा आहे असे ठरवून सभागृहात आलेला आहात ? शेतकऱ्यांविषयी तुम्हाला काहीही घेणे देणे नाही.

..3...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**सभापती :** आता मी उभा आहे. माननीय सभागृह नेते आणि सन्माननीय सदस्यांनी कृपया जागेवर बसावे. आता माननीय संदसदीय कार्यमंत्री बोलतील आणि त्यानंतर सन्माननीय सदस्य श्री.अमरसिंह पंडित आपले म्हणणे मांडतील.

यानंतर श्री.खर्चे वि........

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.प्रकाश महेता : सभापती महोदय, सभागृह सुरु होण्यापूर्वी दोन तीन मिनिटांच्या अगोदर विरोधी पक्ष नेते व मी सभागृहात येण्यासाठी सोबत निघालो होतो. परंतु त्यांना काही काम निघाल्यामुळे ते येथे पोहचू शकले नाहीत. माननीय विरोधी पक्ष नेते, माननीय मुख्यमंत्री व मी स्वत: मुख्यमंत्री महोदयांच्या कॅबीनमध्ये होतो, तेथे आमच्यामध्ये चर्चा झाली. मुख्यमंत्री महोदयांनी विरोधी पक्ष नेत्यांना सांगितले की, या विषयाबाबत कामकाज पत्रिकेवर आज चर्चा दर्शविण्यात आलेली आहे. मी अशा प्रकारचा शब्दप्रयोग कोठेच केलेला नाही. त्यासंदर्भातील भूमिका मी सभागृहात चर्चेच्या माध्यमातून मांडणार आहे. कर्जमाफी हा एक मात्र उपाय नाही, अन्य उपाय आहेत, असे मी बोललो होतो. त्यासंदर्भात आपणाला चर्चा करता येईल. त्यासाठी सभागृहात चर्चा सुरु केली पाहिजे अशी त्यांनी विनंती केली आहे. ही बाब माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी मान्य केलेली आहे. विधानसभेत या विषयावर अडीच वाजता चर्चा सुरु झाली आहे. विरोधी पक्ष नेते व इतर सन्माननीय सदस्यांना माझी विनंती आहे की, आपण सर्व सदस्य शेतकऱ्याच्या प्रश्नांबाबत चिंतीत आहेत, माननीय मुख्यमंत्री महोदयांनी विरोधी पक्ष नेत्यांना सांगितले आहे, की मी असे बोललो नाही. याबाबत मुख्यमंत्री महोदय चर्चेच्या उत्तरात सांगणार आहेत. त्यामुळे चर्चेला सुरुवात करावी अशी माझी विनंती आहे.

श्री.धनंजय मुंडे : सभापती महोदय, अधिवेशनाच्या पूर्व संध्येला राज्य शासनाने चहापान कार्यक्रम आयोजित केला होता त्यानंतर मुख्यमंत्री महोदयांनी महाराष्ट्रातील दुष्काळ, नापिकी, नेहमीची गारपीट यामुळे अडचणीत आलेल्या शेतकऱ्यांच्या कर्ज माफीच्या संदर्भात बोलताना त्यांनी कर्जमाफी देता येणार नाही अशी भूमिका जाहीररित्या घेतली होती.

सभापती महोदय, गेल्या तीन दिवसांपासून दोन्ही सभागृहात शेतकऱ्यांची कर्जमाफी करावी असा आम्ही आग्रह धरला आहे. संसदीय कामकाज मंत्री व मुख्यमंत्री यांच्यासोबत चर्चा झाल्यानंतर संसदीय कामकाज मंत्री महोदयांनी सांगितले की, कर्जमाफीच्या बाबतीत राज्याच्या मुख्यमंत्री महोदयांनी जी घोषणा केली होती ती त्या संदर्भाला धरुन नाही. कर्ज माफीच्या बाबतीत राज्य सरकार, राज्याचे मुख्यमंत्री व राज्याचे मंत्रिमंडळ सर्व सदस्यांच्या भावना ऐकल्यानंतर याबाबत विचार करण्यास तयार आहे. हे संसदीय कामकाज मंत्री महोदयांच्या बोलण्यातून स्पष्ट होते.

...2...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.धनंजय मुंडे...

सभापती महोदय, विरोधी पक्षाकडून महाराष्ट्र विधानपरिषद नियम 260 अन्वये शेतकऱ्यांच्या कर्जमाफीचा प्रस्ताव दिलेला आहे. आपण अनुमती देत असाल तर त्या अनुषंगाने चर्चा करण्यास आमची तयारी आहे.

श्री.माणिकराव ठाकरे : सभापती महोदय, सभागृहात शेतकऱ्यांच्या कर्जमाफी संदर्भात नियम 289 अन्वये स्थगन प्रस्तावाची सूचना आम्ही दिलेली होती. त्यावर गेल्या तीन दिवसात शासनाकडून राज्यातील शेतकऱ्यांच्या प्रश्नाबाबत गांभीर्याने लक्ष दिले गेले नाही. शेतकऱ्यांना न्याय मिळावा अशी आमची भूमिका आहे. गेल्या तीन दिवसात मुख्यमंत्री महोदयांनी विधानसभा सुरु होण्याच्या एक दिवस अगोदर जे विधान केले...अडथळा... खडसे साहेब तुम्ही मुख्यमंत्री नाही आहात. तुम्ही मुख्यमंत्री व्हा तेव्हा निश्चित न्याय मिळेल. पण आज न्याय मिळत नाही असे चित्र दिसत आहे.

सभापती महोदय, मुख्यमंत्री महोदयांनी स्पष्ट जाहीर करावे की, कशा प्रकारे आम्ही कर्जमाफी देऊ शकतो. विरोधी पक्ष म्हणून आमची कर्जमाफी देण्याची मागणी आहे. या वर्षी शेतकऱ्यांना कर्जमाफी मिळायला पाहिजे. शेतकऱ्यांची अवस्था अत्यंत वाईट झालेली आहे. या विषयाच्या अनुषंगाने चर्चेला सुरुवात करायची आहे. कर्जमाफी देण्याबाबत मुख्यमंत्री महोदयांची भूमिका ओपन नसेल तर मग चर्चा कशासाठी व कशाच्या आधारावर करावी ? नुसती पोकळ चर्चा करुन शेतकऱ्यांची दिशाभूल करायची व शासनाने शेवटी सांगायचे की, आम्ही कर्जमाफी देऊ शकत नाही. शासनाने हे सांगणे गरजेचे आहे की, शेतकऱ्यांच्या कर्जमाफीच्या संदर्भात आमची भूमिका ओपन आहे. आम्ही कर्जमाफी करण्याच्या दृष्टीकोनातून पावले टाकू, शेतकऱ्यांना कर्जमाफी देऊ. राज्यात ज्या आत्महत्या होतात त्या थांबविण्याच्या दृष्टीने हा निर्णय घेणे अत्यंत महत्वाचा आहे. तो निर्णय सरकार घेणार आहे काय ? याबाबत शासनाने सभागृहात स्पष्ट सांगितले पाहिजे. सभागृहाचे नेते आहेत, मुख्यमंत्री महोदयांनी स्वतः सभागृहात यावे. विधानसभा व विधानपरिषद हे दोन्ही सभागृह महत्वाचे आहेत, मुख्यमंत्री महोदयांनी विधानसभेत त्यांची भूमिका मांडली आहे. याबाबत मुख्यमंत्री महोदयांनी सभागृहात स्पष्टपणे सांगितले पाहिजे. शासनाकडून याबाबत स्पष्ट

...3...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.माणिकराव ठाकरे...

भूमिका जाहीर झाल्याशिवाय कोणत्याही चर्चेला अर्थ राहणार नाही. त्यामुळे यासंदर्भातील भूमिका मुख्यमंत्री महोदयांनी सभागृहात स्पष्ट केली पाहिजे.

श्री.एकनाथराव खडसे : सभापती महोदय, सभागृहाच्या नेत्याला आपण अधून मधून बोलण्याची संधी दिली तर मी आपला आभारी राहीन. माननीय विरोधी पक्ष नेते श्री.धनंजय मुंडे यांचा मी आभारी आहे. प्रामुख्याने राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचा देखील मी आभारी आहे. विधानसभेत या चर्चेला सुरुवात झाली आहे. चर्चा झाल्याशिवाय प्रश्न सुटत नाहीत. 'आधी मुर्गी की अंडे' या मध्ये साडेतीन दिवस गेले आहेत. या साडेतीन दिवसात मी सभागृहात अनेक वेळा विरोधी पक्षाच्या सन्माननीय सदस्यांना चर्चा करण्याची विनंती केली होती. आजपर्यंत चर्चा झाली असती तर कदाचित आपल्यापर्यंत निर्णय देखील आला असता. सरकारचा प्रत्येक निर्णय विरोधी पक्षाच्या सदस्यांना आवडतोच किंवा तो पसंत असेलच असे नाही. परंतु विषयावर चर्चा तर झाली पाहिजे. चर्चेद्वारे प्रश्न सोडविण्यासाठी सभागृह आहे. या संदर्भात अगोदर तुम्ही निर्णय घ्या, हे सभागृहातील म्हणणे बरोबर आहे. विरोधी पक्षात व विरोधी पक्ष नेता म्हणून मी अनेक वर्ष काम केले आहे. आपण विरोधी पक्षात नवीन आहात, मी विरोधी पक्षातील फार जूना सदस्य आहे.

या नंतर श्री.भोगले....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.एकनाथराव खडसे.....

या ठिकाणी चर्चा व्हावी. माननीय मुख्यमंत्र्यांनी म्हटले होते की, कर्जमाफी हा एकमात्र उपाय नाही. या संदर्भात अन्य मार्गाने काही उपाय उपलब्ध आहेत, त्यानुसार आम्ही कार्यवाही करु. या प्रस्तावावरील चर्चेला माननीय मुख्यमंत्री उत्तर देतील त्यावेळी सरकारच्या वतीने जे निर्णय घेतले आहेत ते चर्चेनंतर जाहीर करतील. निव्वळ तुम्ही म्हणता तो एक उपाय झाला, इतरही वेगवेगळया मार्गाचे उपाय असू शकतात. चर्चेतून अनेक मागण्या पुढे येतील, त्या संदर्भात सरकारला विचार करावा लागेल. या माध्यमातून शेतकऱ्यांना न्याय देण्याची भूमिका आहे. निव्वळ तुम्हीच शेतकऱ्यांच्या बाजूचे आहात, आम्ही त्यांचे वैरी आहोत असा प्रकार नाही......(अडथळा).....मी माननीय सदस्य श्री.माणिकराव ठाकरे यांच्या वेदना समजू शकतो. सर्वाधिक आत्महत्यांचा चटका आणि फटका यवतमाळ जिल्हयाला बसला आहे. गेल्या 15 वर्षाच्या काळात सातत्याने आत्महत्यांचे प्रकार त्या जिल्हयात घडल्यामुळे ते अगतिक आहेत हे मी समजू शकतो.

माननीय विरोधी पक्षनेत्यांनी चर्चेला सुरुवात करावी. आज दिवसभर चर्चा व्हावी, उद्या माननीय मुख्यमंत्र्यांकडून उत्तर येणे यासाठी संयुक्तिक आहे की, कॅबिनेटला निर्णय घ्यायची आवश्यकता असेल घेता येईल. उद्याही या प्रस्तावावर चर्चा घेण्यास सरकारची तयारी आहे. जेणेकरुन समर्पक उत्तर सभागृहाला देता येईल. आवश्यकता असल्यास मंत्रिमंडळाची विशेष बैठक घेऊन त्यामध्ये काही निर्णय घेऊ. चर्चेला पूर्ण वेळ द्यावा आणि चर्चेमध्ये सर्वांनी सहभाग घ्यावा अशी मी या निमित्ताने विनंती करतो.

श्री.प्रकाश महेता : सभापती महोदय, पूर्वीचा प्रस्ताव सत्तारुढ पक्षाचा होता. आजच्या कामकाज पत्रिकेवर पहिला प्रस्ताव विरोधी पक्षांचा आहे. त्यावर चर्चा होऊ द्यावी. विधानसभेत सत्तारुढ पक्षाचा प्रस्ताव आणि विरोधी पक्षाचा प्रस्ताव क्लब करुन माननीय विरोधी पक्षनेत्यांनी चर्चेला सुरुवात केलेली आहे. त्याच धर्तीवर या सभागृहात दोन्ही प्रस्ताव क्लब करण्यात यावेत अशी माझी विनंती आहे.

...2..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.सुनील तटकरे : सभापती महोदय, गेंले साडेतीन दिवस शेतकऱ्यांच्या प्रश्नाबाबत सरकारने निर्णय घ्यावा अशी मागणी विरोधी पक्षाकडून या ठिकाणी केली जात होती. आज या ठिकाणी माननीय संसदीय कार्य मंत्री यांनी खुलासा केला. सभागृहाच्या नेत्यांनी त्यांच्या नेहमीच्या शैलीत शब्दच्छल करण्याचा प्रयत्न केला. विरोधी पक्षाला असा आग्रह का धरावा लागला हे सभागृहाच्या नेत्यांनी लक्षात घेतले पाहिजे. यापूर्वी या सभागृहात काही मुद्यांबाबत निर्णय घेतले गेले. अधिवेशन संपण्यापूर्वी निर्णय घेतले जातील असे आश्वासन चर्चेच्या माध्यमातून दिले गेले. ते आश्वासन सरकारकडून पाळले गेले नाही, म्हणून अशा पध्दतीची आग्रहाची मागणी विरोधी पक्षाला करावी लागली. आपण चर्चेला नक्की सुरुवात करणार आहोत, त्याबद्दल दुमत असण्याचे कारण नाही. आज कार्यक्रमपत्रिकेवर सत्तारुढ पक्षाचा विरोधी पक्षाच्या प्रस्तावानंतर दर्शविण्यात आला आहे. काल विधानसभेत प्रस्तावावरील चर्चा सुरु झाली होती, तो प्रस्ताव ऑनलेग होता. समन्वयाच्या माध्यमातून प्रश्न सोडविण्यासाठी विधानसभेत दोन्ही प्रस्ताव क्लब केले गेले आहेत. या ठिकाणी परिस्थिती भिन्न आहे. या सभागृहात विरोधी पक्षाचा प्रस्ताव स्वतंत्र आहे. त्या प्रस्तावावरील चर्चेला सुरुवात व्हावी. त्या चर्चेच्या अनुषंगाने सत्तारुढ पक्षाच्या माननीय सदस्यांनी त्यांचे विषय मांडावेत. माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे कर्ज मुक्तीच्या संदर्भात बोलतील. माननीय वित्त राज्यमंत्र्यांना त्यावर बोलता येणार नाही. माननीय परिवहन मंत्री श्री.दिवाकर रावते यांना कर्ज मुक्तीबाबत बोलता येणार नाही. माननीय सदस्य सर्वश्री जयंत पाटील, कपिल पाटील आपले विचार मांडतील. विषयाला अनुसरुन जे काही मुद्दे असतील ते या ठिकाणी मांडले जातील. माननीय विरोधी पक्षनेत्यांना आपण प्रस्ताव मांडण्यास अनुमती द्यावी अशी मी आपल्याला विनंती करतो.

श्री.जयंत पाटील : सभापती महोदय, आपण निर्णय देण्यापूर्वी माझी आपल्याला विनंती आहे की, आम्ही म.वि.प.नियम 289 अन्वये प्रस्तावाची सूचना दिलेली होती. त्या सूचनेबाबत आपण प्रथम रुलिंग द्यावे.

...3..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**सभापती** : दिनांक 13 जुलै, 2015 रोजी अधिवेशन सुरु झाल्यापासून नियम स्थगित करुन चर्चा करण्याबाबत विरोधी पक्षाने आग्रह धरला. आजच्या कामकाज पत्रिकेवर म.वि.प.नियम 260 अन्वये विरोधी पक्षाचा प्रस्ताव दर्शविला असून जवळपास सारख्याच आशयाचा सत्तारुढ पक्षाचा प्रस्ताव देखील दर्शविण्यात आला आहे. मी असा निर्णय घेतला आहे की, सदर विषयाचे गांभीर्य आणि महत्व पाहता प्रस्तावावर चर्चा होणे आवश्यक आहे, असे माझे मत झाले आहे. आपण म.वि.प.नियम 289 अन्वये प्रस्तावाच्या सूचनेची नोटीस देऊन इतर सर्व कामकाज स्थगित करुन विरोधी पक्षाने जो प्रस्ताव मांडला आहे त्यावर चर्चा सुरु करावी असे म्हटले आहे. सत्तारुढ पक्षानेही त्याच विषयावर (in the spirit of same) भाग घ्यावा. या सभागृहाच्या उच्च परंपरेनुसार आपण एक चांगली चर्चा या ठिकाणी घडवून राज्याची जनता आणि शेतकरी वाट बघत आहेत त्यावर विषयाबाबत एक चांगला निर्णय घ्यावा. माननीय विरोधी पक्षनेत्यांनी चर्चेला सुरुवात करावी.

श्री.प्रकाश महेता : सभापती महोदय, आपण निर्णय दिल्यानंतर त्यावर भाष्य करता येणार नाही. मी आपल्या निर्णयाबद्दल बोलू इच्छित नाही. आपण यापूर्वी रुलिंग दिलेले आहे. सत्तारुढ पक्षाचा आणि विरोधी पक्षाचा प्रस्ताव क्लब करण्याबाबतचे भाष्य रेकॉर्डवर यावे अशी माझी विनंती आहे.

**सभापती** : मी निर्णय दिलेला आहे. माननीय विरोधी पक्षनेत्यांनी चर्चेला सुरुवात करावी. विरोधी पक्षाने प्रस्ताव दिला आहे आणि सत्तारुढ पक्षानेही प्रस्ताव दिला आहे. दोन्ही प्रस्तावाचे स्पिरिट चांगले आहे. दोन्ही प्रस्तावाच्या स्पिरिटमध्ये चर्चा घडावी.

-------

...4..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी.:** राज्यात सरासरीपेक्षा कमी पाऊस झाल्याने भूजल पातळीत कमालीची घट होऊन दुबार पेरणीचे निर्माण झालेले संकट

**मु.शी.:** राज्यात सरासरीपेक्षा कमी पाऊस झाल्याने भूजल पातळीत कमालीची घट होऊन दुबार पेरणीचे निर्माण झालेले संकट या विषयावर सर्वश्री धनंजय मुंडे, माणिकराव ठाकरे, सुनील तटकरे, अमरसिंह पंडित, संजय दत्त, हेमंत टकले, भाई जगताप, जयंतवराव जाधव, जयंत पाटील, शरद रणपिसे, कपिल पाटील, वि.प.स. यांचा प्रस्ताव

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.धनंजय मुंडे (विरोधी पक्षनेता) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने म.वि.प.नियम 260 अन्वये पुढील प्रस्ताव मांडतो.

*"राज्यात पावसाळा सुरू होऊन दीड महिना झाला तरीही सरासरीच्या केवळ १० टक्क्यांहून कमी पाऊस होणे, अल्प पर्जन्यामुळे भूजल पातळीत कमालीची घट होणे, वेळेवर पाऊस न पडल्यामुळे खरीपाची पेरणी वाया जाऊन दुबार पेरणीचे संकट निर्माण होणे, नापिकी आणि कर्जबाजारीपणामुळे राज्यात मागील ८ महिन्यात १८०० हून अधिक शेतकऱ्यांनी आत्महत्या करणे, दररोज सरासरी ८ ते १० शेतकऱ्यांनी आत्महत्या करणे, मागील वर्षी दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना जाहीर झालेल्या पॅकेजची अंमलबजावणी करण्यात न येणे, अद्याप अनेक नुकसानग्रस्त शेतकरी शासकीय अनुदानापासून वंचित राहणे, मंजूर झालेल्या पिक विम्याची रक्कम शेतकऱ्यांच्या बँक खात्यावर जमा करण्यास अक्षम्य विलंब होणे, यावर्षी विमा हप्त्यामध्ये दुप्पटीहून अधिक वाढ होणे, हवामानावर आधारित पीक विमा योजना राज्यभर लागू करण्याची मागणी होणे, शासनाच्या शेतकरी विरोधी धोरणामुळे शेतीमालासह दुधाचे दर कमी होणे, गोवंश हत्या बंदी कायद्यामुळे भाकड जनावरांची संख्या वाढणे, यामुळे गुरांच्या पालन-पोषणाचा गंभीर प्रश्न निर्माण होणे, राज्यभर चारा टंचाई असतानाही जनावरांसाठी छावण्या सुरू न होणे, धान उत्पादन जिल्ह्यात रोपे करपल्यामुळे दुबार पेरणीसाठी नवीन बियाणे उपलब्ध नसल्यामुळे शेतकऱ्यांवर दुबार पेरणीची समस्या निर्माण होणे, बि-बियाणे, खते, किटकनाशके यासह वीजदरामध्ये झालेली प्रचंड वाढ, राज्यभर कृषी पंपाच्या विद्युतीकरणाचा अनुशेष मोठ्या प्रमाणावर वाढणे, शासनाने गाजा-वाजा करुन सुरू केलेली जलयुक्त शिवार अभियान योजना पूर्णपणे अपयशी ठरणे, योजनेची हजारो कामे निधी आणि नियोजनाअभावी प्रलंबित असणे, कामाच्या दर्जाबाबत अनेक तक्रारी प्राप्त होऊनही संबंधितांविरुध्द*

...५...

श्री.धनंजय मुंडे....

कारवाई न होणे, महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेत मजुरांनी कामाची मागणी नोंदवूनही त्यांना काम उपलब्ध न होणे, अनेक ठिकाणी योजनेतील कामे अपूर्ण असणे, अपूर्ण कामांना मुदतीत मंजुरी न दिल्यामुळे कामाच्या किंमतीमध्ये वाढ होणे, सन २०१३ मध्ये अतिवृष्टीमुळे खचलेल्या विहिरी दुरुस्तीची कामे प्रशासकीय दिरंगाई व दुर्लक्षामुळे दिनांक ३१ मे, २०१४ पर्यंतच्या मुदतीत पूर्ण न होणे, त्यामुळे विहिरी दुरुस्तीच्या आवश्यक बाबीस दिनांक ३० जून, २०१६ पर्यंत मुदतवाढ देण्याची आवश्यकता निर्माण होणे, विदर्भ सधन सिंचन विकास कार्यक्रमांतर्गत ३२०० कोटी रुपये खर्चाची अंमलबजावणी न झाल्यामुळे संरक्षित सिचंनाची सोय आवश्यकता असताना होऊ न शकणे, शेतकरी आत्महत्याग्रस्त जिल्ह्यातील सिंचन प्रकल्प निधी अभावी रखडलेले असणे, शाश्वत सिंचन सुविधा उपलब्ध न झाल्यामुळे शेतकरी आत्महत्येच्या प्रमाणात लक्षणीय वाढ होणे, राज्यात अनेक सिंचन प्रकल्पांची कामे सुप्रमा अभावी बंद असणे, दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांच्या पीक कर्जाचे पुनर्गठन करुन शेतकऱ्यांना नविन पीक कर्ज उपलब्ध करण्याची घोषणा करुनही राज्यातील शेतकऱ्यांना पीक कर्ज मिळण्यास अडचणी निर्माण होणे, अनेक बँकांनी शेतकऱ्यांना पीक कर्ज देण्यास अक्षम्य टाळाटाळ करणे, नापिकी आणि कर्जबाजारीपणाला कंटाळलेल्या दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांनी शासनाकडे इच्छा मरणाची मागणी करणे, राज्यातील शेतकऱ्यांकडून संपूर्ण कर्जमाफीची मागणी होणे, माननीय मुख्यमंत्री यांनी अधिवेशनाच्या पूर्वसंध्येला कर्जमाफी करता येणार नाही, अशी घोषणा करणे, यामुळे राज्यातील देशोधडीला लागलेल्या शेतकऱ्यांच्या जिवाशी हे सरकार खेळत असल्याची भावना शेतकऱ्यांमध्ये पसरणे, दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना दिलासा देऊन त्यांच्यामध्ये उमेद निर्माण करण्यासाठी शासनाने चर्चेच्या सुरुवातीला संपूर्ण कर्जमाफी करण्याची घोषणा करुन चर्चेला सुरुवात करण्यात यावी, अशी मागणी होणे, शासनाने याबाबत धोरणात्मक निर्णय घेवून करावयाची तातडीची कार्यवाही, विचारात घेण्यात यावी."

नंतर जी.1...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.धनंजय मुंडे.....

सभापती महोदय, राज्यात सत्ता परिवर्तन झाल्यानंतर या सरकारला भाजपचे सरकार म्हणावे की, भाजप-शिवसेनेचे सरकार म्हणावे की, भाजप-शिवसेना महायुतीचे सरकार म्हणावे की, अजून दुसरे काही म्हणावे हेच कळत नाही.

सभापती महोदय, पावसाळ्याच्या आधी अवकाळी पाऊस येतो. तसेच अचानकपणे अवकाळी सरकार या राज्यात आलेले आहे. हे सरकार सत्तेत आल्यानंतर राज्यात भयंकर दुष्काळ पडला. मी सन्माननीय मंत्री श्री.गिरीष महाजन यांना सांगू इच्छितो की, त्यांनी माननीय महसूल राज्यमंत्री श्री.संजयजी राठोड यांचा थोडा आदर्श घ्यावा. त्यांनी आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या शेतावर जाऊन पेरणी केली. आज राज्यातील शेतकऱ्यांचा प्रश्न अतिशय गंभीर झालेला आहे. त्यामुळे माझी आपल्याला पहिल्यांदा विनंती आहे की, सत्ताधारी बाकावर बसलेल्या माननीय मंत्र्यांनी या चर्चेच्या निमित्ताने तरी गंभीर व्हावे. ग्रामीण भागात आजही पायगुणाला महत्त्व दिले जाते. आपण सत्तेवर असल्यामुळेच मी हे आपल्याला उदाहरण देत आहे. आपण तसेच देशाच्या सन्माननीय पंतप्रधानांनी देखील सांगितले की, मी आल्यानंतर देशात बदल झाला हे आपण नाकारता का ? समोरच्या बाकावर बसलेले म्हणत असतील की, हे आम्ही नाकारतोय. जर ते आपण स्वीकारत असाल तर राज्यामध्ये आपण सत्तेवर आल्यानंतर आपल्या पायगुणामुळे या सात महिन्यांच्या कालावधीत 1800 शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या आहेत. गारपीट झाली. अवकाळी पावसामुळे शेतकरी मेला. आज राज्यात दुष्काळ तर भयंकर आहे.

श्री.अमरसिंह पंडित : सभापती महोदय, सभागृहामध्ये एका गंभीर विषयावर चर्चा सुरू असताना माननीय मंत्री एकमेकांमध्ये बोलत आहेत हे चुकीचे आहे.

श्री.धनंजय मुंडे : सभापती महोदय, आपण आम्हाला संरक्षण दिले पाहिजे. या सरकारचा पायगुण एवढा चांगला की महाराष्ट्रातील शेतकऱ्यांवर भयंकर संकट कोसळले आहे. सात महिन्यांमध्ये 1800 शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या आहेत. मी माझ्या मनाचे काहीच सांगत नाही. लोकसभेच्या निवडणुकीत भारतीय जनता पार्टीने जाहीरनामा प्रसिद्ध केला. या जाहीरनाम्यातील पृष्ठ क्र.27 वर नमूद केले आहे की, कृषी हा सर्वाधिक प्राधान्याचा विषय असेल. पान क्रमांक 28

..2

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.धनंजय मुंडे....

वर सांगितले आहे की, उत्पादन खर्च अधिक 50 टक्के नफा धरून एकूण शेतीमालाला भाव देण्यात येईल. त्यानंतर आपण सांगितले की, शेतकऱ्यांच्या जीवनात सुद्धा आम्ही "अच्छे दिन" आणणार आहोत. केंद्र सरकारने खरेच कृषिला प्राधान्य दिले आहे ? ते दिले असेल तर आपण या वर्षीचा केंद्रीय अर्थसंकल्प पहावा. त्यांनी कृषिसाठी मागच्या सरकारच्या तुलनते किती कमी तरतूद केली आहे हे आपल्याला दिसून येईल. हा खोटारडेपणा आहे. जाहीरनाम्यामध्ये नमूद केले आहे की, आम्ही कृषिकडे विशेष लक्ष देऊ. पण आपण सत्तेमध्ये आल्यानंतर त्याचे प्रतिबिंब आपल्या अर्थसंकल्पात दिसून येत नाही. ही आपण देशातील जनतेची केलेली फसवणूक नाही काय ? उत्पादन खर्चाच्या अधिक 50 टक्के नफा धरून शेती मालाला भाव देऊ असे आपण आपल्या जाहीरनाम्यामध्ये नमूद केलेले आहेच. देशाच्या माननीय पंतप्रधानांनी निवडणुकीच्या काळात महाराष्ट्रात झालेल्या जाहीर सभेत सांगितले की, आम्ही उत्पादन खर्चाच्या अधिक 50 टक्के भाव देऊ. 1 जानेवारीला शेती मालाचे भाव आले. पण 5 ते 10 टक्क्याच्यावर भाव वाढ झाली नाही. याला जिम्मेदार कोण आहे. विषय तांदूळ, ज्वारी, कपूस, सोयाबीनचा असला तरी श्री.शरद पवार साहेब हे या देशाचे कृषि मंत्री असताना, आघाडीचे सरकार देशात असताना, 2013-14 मध्ये तांदुळाचा भाव रूपये 560 वरून रूपये 1345/- वर गेला म्हणजे 240 टक्क्यांची वाढ झाली. ज्वारी रूपये 515/- वरून रूपये 1520/- पर्यंत गेली. म्हणजे 295 टक्यांची वाढ झाली आहे.

यानंतर श्री.जुन्नरे....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.धनंजय मुंडे ......

कापसाची किंमत 1760 वरुन 5 हजाराच्यावर गेली होती. सोयाबीनची किंमत 900 वरुन 3800 रुपये झाली होती. परंतु या सरकारच्या काळात तांदूळामध्ये आम्ही 1345 रुपयेवाढ केली होती ती तुमच्या काळात 1400 रुपयांपर्यंत झाली. ज्वारीची किंमत आमच्या काळात 1520 रुपये होती ती तुमच्या काळात 1550 रुपये झाली. कापूस 4 हजार रुपयावरुन 4050 रुपये झाला. अशा प्रकारची वाढ तुमच्या काळात झालेली आहे. शेती मालामध्ये 50 टक्के वाढ देऊ अशी घोषणा तुम्ही केली होती ती हीच घोषणा आहे काय ? हे सरकार केवळ शेतकऱ्यांची फसवणूक करीत आहे. तुम्ही शेतकऱ्यांच्या मतावरच सत्तेमध्ये आला असताना तुम्ही शेतकऱ्याची अशा प्रकारे फसवणूक करता ? आज शेतकरी जीवन संपवण्यासाठी तुमच्याकडे अर्ज करीत आहे. आज हाच शेतकरी आम्हाला कर्ज मुक्ती द्या म्हणून याचना करीत आहे. असे असताना सरकार शेतकऱ्यांचे म्हणणे ऐकून घेण्यास तयार नाही.

सभापती महोदय, विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहात बळीराजाच्या एका मागणीसाठी आम्हाला केविलवाणी प्रयत्न करावा लागला आहे. बळीराजाची कर्जमुक्तीची घोषणा तुम्ही अगोदरच केली असती तर ही वेळ आमच्यावर आली नसती. लोकसभेच्या निवडणुकीत तुमच्या जाहीरनाम्यात म्हटले होते की, शेतीमालामध्ये 50 टक्के वाढ दिली जाईल. परंतु तुम्ही 50 टक्के वाढ केली असती, जे स्वप्न तुम्ही शेतकऱ्याला दाखवले होते ते केले असते तर आज शेतकऱ्यावर कर्जमाफीची वेळ आली नसती. तुम्ही एक वर्षात कृषी क्षेत्राकडे लक्ष देतो म्हणून सांगितले होते ते जर दिले असते तर आमच्यावर ही वेळ आली नसती.

सभापती महोदय, भारतीय जनता पार्टीच्या राज्याच्या जाहीरनाम्यात पृष्ठ क्रमांक 8 वर असे सांगितले होते की, "शेतकऱ्यांच्या आत्महत्या टाळण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करणार". आज राज्यातील विदर्भाला मुख्यमंत्री पदाची संधी मिळाली आहे. त्याच भारतीय जनता पार्टीच्या जाहीर नाम्यात "विदर्भातील कापूस उत्पादनाला स्थिरता देणारी विशेष योजना आणली जाईल" असेही म्हटले होते. सन्माननीय सदस्य श्री. संजयजी आपल्या जिल्हयात किती शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या ? आज कापूस उत्पादक शेतकऱ्याचे हाल किती आहे ? तुम्ही शेतकऱ्याच्या संदर्भातील शब्द

...2...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.धनंजय मुंडे ......

पाळला ? जनतेने आमच्याकडून 15 वर्षाचा हिशोब मागितल्यामुळेच आम्ही विरोधी पक्षात बसलो आहोत आणि तुम्ही सत्ताधारी पक्षात बसला आहात. परंतु तुमच्यावर सात महिन्यात वेळ यावी यासारखे दुसरे उदाहरण देता येणार नाही. भारतीय जनता पार्टीने तिसरी घोषणा अशी केली होती की, "वीज पंपासाठी शेतकऱ्यांनी मागणी केली तर सात दिवसात वीज कनेक्शन दिले जाईल". या सरकारने पहिली घोषणा केली होती की, "शेतकऱ्यांच्या आत्महत्या टाळण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न केले जातील". परंतु तुम्ही सत्तेत आल्यानंतर सर्वाधिक आत्महत्या झाल्या त्याला जबाबदार कोण ? आम्ही सत्तेमध्ये होतो त्यावेळेस विधानसभेचे विरोधी पक्ष नेते सन्माननीय श्री.नाथाभाऊ होते परंतु ते आज या सभागृहाचे नेते आहेत. आजचे विद्यमान मुख्यमंत्री त्यावेळेस विरोधी पक्षातील आमदाराची भूमिका बजावित होते ते त्यावेळेस आमच्या सरकारवर आरोप करीत होते की, या सरकारचे लक्ष नसल्यामुळे शेतकरी आत्महत्या करीत आहेत. आज तुमच्या सात महिन्याच्या काळात 1800 शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या आहेत. आम्ही सत्तेमध्ये होतो त्यावेळेस तुम्ही शेतकऱ्यांच्या आत्महत्येसाठी आमच्यावर कलम 302 चा गुन्हा दाखल करण्याच्या बाबतीत तावातावाने सांगत होता, आज राज्यातील शेतकऱ्यांनी ज्या आत्महत्या केल्या आहेत त्यासंदर्भात 302 चा गुन्हा कुणावर दाखल करावयाचा ? 302 चा गुन्हा कोणावर दाखल करावयाचा हा प्रश्न शेतकरी आज आम्हाला विचारीत आहे. तुम्ही सांगितले होते की, शेतकऱ्यांच्या आत्महत्या थांबवण्यासाठी आम्ही प्रयत्न करु. त्यामुळेच आम्ही आपल्याला हा प्रश्न विचारीत आहोत. परंतु आपण तर स्पष्ट सांगितले आहे की, "आत्महत्या रोखू शकत नाही आणि ते शक्यही नाही".

सभापती महोदय, "विदर्भात कापूस उत्पादनाला स्थिरता देणारी विशेष योजना आणू" अशी घोषणा आपल्या जाहीरनाम्यात केली होती त्या घोषणेचे काय झाले ? कापसाची किमान आधारभूत किंमत 6000 रुपये असावी यासाठी आमचे सरकार असताना भारतीय जनता पार्टीने अनेक जिल्हयांमध्ये मोर्चे काढले होते. त्या मोर्च्यामध्ये मागणी केली जात होती की, 6 ते 6.5 हजार रुपये कापसाला भाव मिळालाच पाहिजे. परंतु आज महाराष्ट्रातील शेतकऱ्याला कापूस पिकलाच नाही परंतु जो काही पिकला त्याला तुम्ही 3800 रुपये सुध्दा भाव दिला नाही, हे अच्छे दिन आहेत काय ? हे तुमचे कल्याणकारी सरकार आहे काय ? अशा प्रकारे तुम्ही शेतकऱ्यांचे कल्याण

...3...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.धनंजय मुंडे ......

करणार आहात काय ? एक प्रकारे तुम्ही शेतकऱ्यांची थट्टा केली नाही काय ? आम्ही सत्तेमध्ये असताना कापसासाठी 6.5 हजार रुपये भाव द्यावा म्हणून तुम्ही मोर्चे काढले. परंतु आज शेतकऱ्याच्या कापसाला 3800 रुपये भाव मिळतो आहे त्याला जबाबदार कोण याची माहिती या चर्चेच्या उत्तरामध्ये आम्हाला तुमच्याकडून पाहिजे आहे.

सभापती महोदय, राज्यातील शेतकऱ्याने वीज पंपासाठी अर्ज केल्यानंतर सात दिवसात वीज कनेक्शन दिले जाईल अशी घोषणा तुम्ही केली होती त्यामुळे आपण गेल्या सात महिन्यात किती शेतक-यांनी अर्ज केले व त्यापैकी किती शेतकऱ्यांना वीज कनेक्शन दिले गेले याची माहिती सुध्दा उत्तरामध्ये देण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदय, राज्यात खरीप पिकाचे क्षेत्र 150 लक्ष हेक्टर एवढे आहे. जून ते ऑक्टोबर या दरम्यान खरीप हंगाम असतो. राज्यात रब्बी पिकाचे क्षेत्र 50 लक्ष हेक्टर आहे. आता रब्बी हंगाम ऑक्टोबर नंतर आहे. आम्ही सत्ताधारी पक्षाचा प्रस्ताव मंगळवारी वाचला होता त्यामध्ये असे म्हटले होते की, "राज्यातील शेतकऱ्यांना दुबार पेरणीची वेळ आली आहे, दुबार पेरणीसाठी शेतकऱ्यांना बी-भरणा करण्यासाठी पैसे देऊ". परंतु हे बी शेतकऱ्याने कोठे लावायचे ? पेरणी करुन 25 दिवस झाले परंतु त्यानंतर पाऊस न पडल्यामुळे पिकांनी माना टाकल्या आहेत. राज्यातील शेतकरी पावसाची डोळे लावून वाट बघतो आहे. मराठवाडयात काही ठिकाणी दुबार पेरणी सुध्दा करण्यात आलेली आहे. असे असताना तुम्ही म्हणता बी-भरण्यासाठी आम्ही पैसे देऊ ? त्यामुळे आपण शेतकऱ्यांना कशा प्रकारची मदत करणार आहात ? बी-भरण्यासाठी पैसे दिले तर शेतकरी पुन्हा पेरणी करु शकतो काय ? तुम्ही बी-भरण्यासाठी पैसे देणार परंतु ते किती दिवसात देणार आहात ? राज्य शासनाने डिसेंबर महिन्यात 7 हजार कोटी रुपयांच्या पॅकेजची घोषणा केली होती. तुमच्या सरकारची गती कशी आहे ते मी सांगणार आहे. ज्या 24 हजार गावांची आणेवारी 50 टक्क्याच्या आत होती त्यासाठी 4 हजार कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली होती. 4 हजार कोटी रुपयांची तरतूद दोन टप्प्यात करण्यात आली होती. मी या सभागृहात जबाबदारी पूर्वक सांगतो आहे की, त्यावेळेस प्रशासनाकडून 4803 कोटी रुपयांची मागणी करण्यात आली होती परंतु त्याच्या अगेन्स्ट तुम्ही 4000 कोटी रुपयांची तरतूद केली. 800 कोटी रुपयांसाठी आजही तो

..4...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.धनंजय मुंडे ......

शेतकरी वाट बघतो आहे. या शेतकऱ्यांना त्यातील अनुदान मिळाले नाही त्यामुळे तुमचे सरकार किती गतिमान आहे हे दिसून येते. डिसेंबर महिन्याच्या अधिवेशनात पॅकेजची घोषणा करावी लागली होती परंतु तुम्हाला 26 जानेवारीच्या आत हे पैसे शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा होण्यासाठी कॅबिनेटमध्ये निर्णय ध्यावा लागला होता.

यानंतर श्री.अजित......

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.धनंजय मुंडे....

पॅकेज जाहीर केल्यानंतर असे कधी झाले काय, याचा अर्थ काय ? आजही या पैशाचे वाटप सुरुआहे. मी या संदर्भातील विभागनिहाय आकडेवारी देण्यास तयार आहे. ज्या विभागातून मोठ्या प्रमाणावर रक्कम परत आली त्याची माहिती देतो. मराठवाड्यातून 190 कोटी, विदर्भातून 260 कोटी रुपये, खानदेशातून 50 कोटी रुपये आणि पश्चिम महाराष्ट्रातून 15 लक्ष रुपये परत आले. मराठवाड्यात 10 लाख शेतकरी, विदर्भात 2 लाख 50 हजार शेतकरी, नाशिक जिल्ह्यात 1 लाख शेतकरी आणि खानदेशमध्ये 50 हजार शेतकरी मदतीविना वंचित राहिलेले आहेत. सहा-सहा महिने झाले तरी शेतकऱ्यांना मदत मिळालेली नाही. गतिमान सरकारने अतिशय गतिशीलपणे लोकप्रिय पॅकेज जाहीर केलेल्याचा हा परिणाम आहे. आज आपण शेतकऱ्यांसाठी काहीही करण्याच्या इच्छेने आहात. पण ते शेतकऱ्यांच्या पदरात पडणार केव्हा ? नागपूरमध्ये जाहीर केलेले पॅकेजचे पैसे शेतकऱ्यांना मे आणि जून महिन्यात मिळाले आणि ते अजूनही मिळत आहेत. अधिवेशनाच्या तोंडावर जिल्हाधिकाऱ्यांकडून परत आलेले पैसे परत पाठविले गेले. प्रशासनाने 800 कोटी रुपयांची मागणी केलेली आहे, ते पैसे तसेच शासनाकडे बाकी आहेत. पुन्हा रिव्हयू घेऊन यादी पाठवा असे मंत्रालयातून जिल्हाधिकाऱ्यांना पत्र पाठविण्यात आले. पण या 800 कोटी रुपयांची तरतूद अर्थसंकल्पामध्ये करण्यात आलेली नाही.

सभापती महोदय, दिनांक 8 जुलै, 2015 रोजीचा शासन निर्णय आहे. अपुऱ्या झालेल्या पावसामुळे 402 कोटी रुपयांची मदत अधिवेशनाच्या पूर्वसंध्येला म्हणजे जवळपास वर्षभरानंतर उपलब्ध केली. शेतकऱ्यांच्या हातातून हंगाम गेल्यावर मदत करण्यात आली. शेतकऱ्यांच्या बाबतीत इतके दुर्लक्ष आहे. मात्र दुसऱ्या विभागात किती गतीने सरकार काम करीत आहे, हे सांगावयास नको. शेतकऱ्यांच्या बाबतीत निर्णय होऊनही त्यांना सहा-सहा महिने अनुदान मिळत नाही. या सरकारची कमाल आहे असे म्हटले पाहिजे.

सभापती महोदय, राज्य सरकारने केंद्र सरकारकडे 6 हजार कोटी रुपयांची आर्थिक मागणी केली. त्यापैकी केंद्र सरकारकडून फक्त दोन हजार कोटी रुपये मिळाले, ही माहिती तरी खरी



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.धनंजय मुंडे....

आहे ना ? फेब्रुवारी महिन्यात 1207 कोटी रुपये मिळाले म्हणजे मागणीच्या 67 टक्के आणि मे महिन्यात 574 कोटी रुपये म्हणजे मागणीच्या 53 टक्के रक्कम मिळाली. मला एवढेच सांगायचे आहे की, आणखी शेतकऱ्यांची परीक्षा घेऊ नका.

सभापती महोदय, राज्यातील शेतकऱ्यांनी पीक विम्यापोटी 260 कोटी रुपये भरले. शेतकऱ्यांना पीक विम्याचे पैसे तरी वेळेवर मिळाले पाहिजे होते, परंतु आजपर्यंत या पीक विम्याचे पूर्ण वाटप झालेले नाही. मी आपणास बीड जिल्ह्याचे उदाहरण देतो. जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेत 251 कोटी रुपये आहेत. तर उर्वरित 80 कोटी रुपये इतर बँकेत आहेत. शेतक-यांनी इतर बँकेतून जो प्रिमियम भरला होता त्याचे पैसे मिळाले. पण जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेने शेतकऱ्यांनी पीक विम्यापोटी भरलेले 251 कोटी रुपये म्युच्युअल फंडामध्ये डिपॉझीट केले. मी इन्शुरन्स काढला असेल आणि उद्या मी मेलो तर ते पैसे माझ्या घरच्यांना मिळण्यासाठी बँकेत जमा झाले तर ते पैसे तुम्ही बँकेच्या फायद्यासाठी म्युच्युअल फंडामध्ये गुंतवणार आणि त्याच्या व्याजावर बँकेचा फायदा करुन घेणार ? आपली शेतकऱ्यांच्या बाबतीत अशी तळमळ आहे काय, या अडचणीचा कोण विचार करणार आहे ? आज आम्ही कर्जमाफी मागत आहोत याला ही कारणे आहेत. यामध्ये राजकारण नाही. उद्या कोणतीही निवडणूक नाही. स्वच्छ मनाने आम्ही ही मागणी करीत आहोत. आम्ही यातून देखील मार्ग काढला आहे. दिनांक 30 मे आणि 1 व 2 जून रोजी आदरणीय श्री.शरद पवार साहेबांनी मराठवाड्याचा दौरा केला. त्यावेळी पाऊस पडला नव्हता. त्यानंतर आदरणीय श्री.शरद पवार साहेबांच्या नेतृत्वाखाली राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने मुख्यमंत्री महोदयांकडे विनंती केली की, आपण सरसकट कर्जमाफी करु नका. पण ज्या 24 हजार गावांची 50 टक्केच्या आत आणेवारी आली आहे आणि ती 24 हजार गावे दुष्काळी म्हणून घोषित केलेली आहेत, त्या गावातील शेतकऱ्यांची कर्जमाफी करावी. त्यांचा 7/12 उतारा कोरा करावा. पण नंतरच्या काळात शेतकऱ्यांची त्यापेक्षा वाईट परिस्थिती झाली. पाऊस झाल्यानंतर शेतकऱ्यांनी पेरणी केली, पण त्यानंतर पाऊस थांबला तो आजपर्यंत पडलेला नाही.

..3..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.धनंजय मुंडे....

सभापती महोदय, फेब्रुवारी आणि मार्च महिन्यात अतिवृष्टी आणि गारपीट झाली त्यावेळी शासनाकडून करण्यात आलेली मदत शेतकऱ्यांना अजून मिळालेली नाही. राज्य सरकारने अर्थसंकल्पीय अधिवेशनात तसेच त्यानंतर झालेल्या मंत्रिमंडळात स्पष्ट केले होते की, खरीप हंगामासाठी शेतकऱ्यांच्या कर्जाचे पुनर्गठन करण्यात येईल. मी सभागृहात जबाबदारीने सांगतो की, आज शेतकऱ्यांना त्या कर्जाच्या पुनर्गठनाचा फायदा झालेला नाही म्हणून शेतकऱ्यांना कर्ज मिळू शकले नाही. सरकार काहीही आकडेवारी सांगेल. सरकारने शेतकऱ्यांची दिशाभूल करु नये. माझी आपणास विनंती आहे की, सरकारने पुढे येऊन शेतकऱ्यांच्या कर्जाचे पुनर्गठन झाले किंवा नाही हे जाणून घेण्यासाठी एक फोन नंबर द्यावा आणि त्या नंबरवर राज्यातील सर्व शेतकऱ्यांनी कर्जाचे पुनर्गठन झाले किंवा कसे हे सांगावे. मग आपणास नक्की किती शेतकऱ्यांच्या कर्जाचे पुनर्गठन झाले हे आपणास समजेल. पण हे सरकार राज्यातील शेतकऱ्यांचे पुनर्गठन झालेले आहे या समजुतीमध्ये आहे. जर शेतकऱ्यांचे पुनर्गठन झाले असेल, शेतकऱ्यांना कर्ज मिळाले असेल तर मग बँका शेतकऱ्यांना कर्ज देत नसेल तर बँकेवर एफआयआर दाखल करावा लागेल असे सरकारला का सांगावे लागले ? सन 2013-2014 या वर्षातील कर्जाचे पुनर्गठन झाले नाही म्हणून आजही शेतकऱ्यांना कर्ज मिळत नाही. सरकार सांगत आहे की, सन 2014-2015 मध्ये शेतकऱ्यांच्या कर्जाचे पुनर्गठन झाले. परंतु सन 2013-2014 या वर्षातील कर्ज तसेच आहे. मग शेतकऱ्यांना कर्ज कसे मिळेल ? म्हणून आमची ही तळमळ आहे आणि याच कारणासाठी आम्ही शेतकऱ्यांसाठी संपूर्ण कर्जमाफी मागत आहोत. आम्ही काही वेगळे मागत नाही. या कर्जमाफीमुळे सरकारवर 7 हजार कोटी रुपये, पंधरा हजार कोटी रुपयांचा बोजा पडेल, पण आज राज्य सरकारची तेवढी ऐपत आहे.

यानंतर श्री.बोर्डे...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.धनंजय मुंडे....

शासनाने आता तरी या सर्व बाबतीत आपली भूमिका स्पष्ट केली पाहिजे. कारण शासनाने मागे काढलेल्या श्वेतपत्रिकेत या बाबतीत स्पष्ट केले नाही. एवढेच नव्हे तर मागच्या आर्थिक पाहणी अहवालात सुध्दा काहीच स्पष्ट केले नाही. आजही गुजरात किंवा इतर राज्यांपेक्षा महाराष्ट्र राज्याची आर्थिक स्थिती चांगली आहे. परंतु सध्याचे राज्य सरकार गेल्या 15 वर्षांच्या सरकारच्या कामकाजाचे कारण देत, तिजोरीत खडखडाट असल्याचे सांगत आहे. महोदय, आजही आपल्या राज्याची एवढी ऐपत आहे की, राज्य सरकारने मनात आणले तर ते काहीही करु शकते. जर या शासनाला खरोखरच शेतकऱ्यांप्रती प्रेम असेल तर त्यांनी कर्ज काढावे आणि राज्यातील शेतकऱ्यांना कर्जमुक्ती द्यावी.

सभापती महोदय, या सरकारमधील काही सन्माननीय सदस्यांनी आणि माननीय मंत्र्यांनी विधानसभा सभागृहात केलेली भाषणे मी दाखवू शकते. विद्यमान मंत्री श्री.सुधीर मुनगंटीवार यांनी 2009 मध्ये विधानसभेत भाषत करताना सांगितले होते की, शेतकऱ्यांच्या हितासाठी पूर्ण तिजोरी मोकळी करावी लागली तरी चालेल, परंतु शेतकऱ्यांचे संपूर्ण कर्ज माफ झाले पाहिजे. आज शेतकरी संकटात सापडलेला असताना आम्ही तीच मागणी ज्यावेळी करतो त्यावेळी या सरकारकडून सांगितले जाते की, अशाप्रकारे कर्जमाफी देणे शक्य नाही किंवा विरोधी पक्षाची मागणी अवास्तव आहे. या सरकारकडून सांगितले जाते की, शेतकऱ्यांना पेरणीसाठी बियाणे पुरविण्यात येतील. परंतु जर पाऊसच नसेल तर त्यांचा काय उपयोग होणार आहे ? सबंध शेतकरी आज संपण्याच्या मार्गावर आहेत. शेतकऱ्यांची संपूर्ण जात नष्ट होण्याची वेळ आली आहे. अशा परिस्थितीत शेतकऱ्यांना मदत न करणे ही दुर्दैवी बाब आहे.

सभापती महोदय, गेल्या तीन दिवसांपासून आम्ही शेतकऱ्यांच्या कर्जमुक्तीची मागणी करीत आहोत. राष्ट्रवादी काँग्रेस, काँग्रेस, पीआरपी, लोकभारती, शेतकरी कामगार पक्ष, एमआयएम, समाजवादी पक्ष या सर्वच पक्षांची शेतकऱ्यांच्या कर्जमुक्तीची भूमिका घेतलेली आहे. आम्हाला आनंद एका गोष्टीचा वाटला की, सत्तेमध्ये राहून शिवसेना पक्षाने सुध्दा कर्जमुक्तीला म्हणजेच विरोधी पक्षाच्या मागणीला पाठिंबा दिला. विधानसभा सभागृहात सुध्दा शिवसेना पक्षाच्या सर्व सन्माननीय सदस्यांनी शेतकऱ्यांना कर्जमुक्ती दिली पाहिजे अशा प्रकारची मागणी केली. सन्माननीय मंत्री डॉ.दीपक सावंत साहेब, एका बाजूला लाचार होऊन सत्तेत राहायचे आणि दुसऱ्या

..2..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.धनंजय मुंडे....

बाजूला शेतकऱ्यांची कर्जमुक्ती झाली पाहिजे असे सभागृहात आणि सभागृहाबाहेर जाहीरपण सांगायचे, अशी दुटप्पी भूमिका आपल्याला घेता येणार नाही. मी शिवसेना पक्षाच्या माननीय मंत्री आणि सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, आपण खऱ्या अर्थाने शेतकऱ्यांच्या बाजूने असाल, तुमची सत्तेमध्ये काही किंमत असेल आणि आपण सत्तेसाठी लाचार नसाल तर शेतकऱ्यांची कर्जमाफी करुन दाखवावी. या सरकारकडून शेतकऱ्यांची कर्जमाफी होत नसेल तर हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांच्यासारखा तो कणखरपणा दाखवून सत्तेपासून बाजूला व्हावे. आपण असे केल्यास महाराष्ट्रातील शेतकरी तुमच्या मागे राहील. परंतु त्यासाठी आपल्याला तशा प्रकारची भूमिका घ्यावी लागेल. पण आपल्याला ही भूमिका घ्यावयाची नाही असे वाटते. आपल्याला काही तरी एक ठरवावे लागेल. आपल्याला या सरकारसोबत सत्तेत राहायचे आहे. मंत्र्यांना येथे काही काम नाही. या मंत्रिमंडळातील शिवसेना पक्षाच्या इतर मंत्र्यांनी माननीय महसूल राज्यमंत्री श्री.संजय राठोड यांच्याप्रमाणे शेतकऱ्यांचे शेत पेरुन देण्याची भूमिका घेतली. आम्ही वारंवार शेतकऱ्यांच्या कर्जमुक्तीची मागणी केली आहे. परंतु या सरकारकडून सांगितले गेले की, विरोधी पक्षाकडे मुद्दा नाही, राज्यातील शेतकऱ्यांना कर्जमाफीची गरज नाही.

सभापती महोदय, या निमित्ताने मी विचारु इच्छितो की, कोणाचीही मागणी नसताना माननीय मुख्यमंत्र्यांनी हिवाळी अधिवेशनात दिनांक 11 डिसेंबर, 2014 रोजी, शेतकऱ्यांनी सावकारांकडून घेतलेले कर्ज माफ करण्याची घोषणा का केली ? शासनाला अशा प्रकारची कर्जमाफी मान्य आहे. परंतु ज्या शेतकऱ्यांनी बँकेकडून कर्ज घेतलेले आहे ते कर्ज माफ करणे या सरकारला मान्य नाही. सावकारांनी शेतकऱ्यांना कोणत्या व्याज दराने कर्ज दिले असेल ? मुळात हा संपूर्ण विषय गंभीर आहे. सावकारांकडून घेतलेले कर्ज माफ करण्यासंदर्भातील घोषणा दिनांक 11 डिसेंबर, 2014 रोजी केल्यानंतर या विषयावर बरीच चर्चा झाली. किंबहुना या घोषणेवर टीका सुध्दा झाली. परंतु या संदर्भातील शासन निर्णय मात्र तब्बल चार महिन्यानंतर म्हणजेच दि.10 एप्रिल, 2015 रोजी निर्गमित करण्यात आला. यावरुन दिसून येईल की, हे शासन शेतकऱ्यांच्या विषयावर किती गतिमान आहे. महोदय, शेतकऱ्यांशी संबंधित असलेला शासन निर्णय काढण्यास खरोखरच चार महिन्याचा वेळ लागतो काय ? या शासनाच्या माध्यमातून काही गोष्टी

..3..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.धनंजय मुंडे....

एका-एका तासात मिटतात. सन्माननीय महसूल मंत्री श्री.एकनाथभाऊ खडसे, आम्ही आपल्या एकट्याला शेतकरी समजतो. महोदय, सावकारांकडून घेतलेले कर्ज माफ करण्यासंदर्भातील निर्णय काढल्यानंतर औरंगाबाद, नागपूर व अमरावती विभागातील 19 जिल्ह्यातील 2,23,157 शेतकऱ्यांना दि.30/11/2014 रोजी देय असलेले 156 कोटी रुपयांचे कर्ज व त्यावरील दि.30/06/2015 पर्यंतचे 15 कोटी रुपये व्याज, असे एकूण 171 कोटी रुपये सावकारांना देऊन त्या भागातील शेतकऱ्यांना कर्जमुक्त करण्याचा निर्णय घेण्यात आला. महोदय, आज 16 जुलै, 2015 आहे. परंतु शासनाच्या निर्णयानुसार सावकारांकडून घेतलेल्या कर्जाच्या मुक्तीचा लाभ एकाही शेतकऱ्याला झाला नाही. वास्तविक पाहता सावकारांकडून घेतलेले कर्ज माफ करण्याचा निर्णय तुमच्याच सरकारने, प्रशासनाने घेतला होता. परंतु या संदर्भातील फाईल वित्त विभागाकडे गेल्यानंतर, वित्त विभागाने त्यावर टिप्पणी लिहिली की, डॉ.पंजाबराव देशमुख व्याज अनुदान योजनेंतर्गत जे शेतकरी विहित मुदतीत कर्जाची परतफेड करतील त्यांनाच प्रोत्साहनात्मक सूट म्हणून 3 टक्के व्याज सवलत देण्यात येईल. त्यामुळे सावकारी कर्जमाफीची व्याज सवलत दिल्यास योजनेच्या उद्दिष्टात बदल होईल आणि मूळ योजनेशी हे विसंगत आहे. महोदय, हा वित्त विभागाचा अभिप्राय आहे. सन्माननीय सहकार मंत्री, आपण हा विषय वैयक्तिक घेऊ नका. आपण काढलेल्या शासन निर्णयाची अंमलबजावणी कितपत झाली हा या ठिकाणी मुख्य विषय आहे. या योजनेचा फायदा कोणत्याही शेतकऱ्याला झालेला नाही. मी तर म्हणेन की, या योजनेचा फायदा किती शेतकऱ्यांना झाला हे सरकारने उत्तरात जाहीर करावे. महोदय, हे सरकार सांगत आहे की, या विषयाच्या संदर्भात 23 जणांचे रिट पिटीशन नागपूर खंड पिठामध्ये दाखल झाले आहे. महोदय, कोणता सावकार सांगेल की, माझ्याकडून अमुक शेतकऱ्याने अमुक इतक्या व्याज दराने कर्ज घेतले आहे. शासनाने ज्यावेळी हा निर्णय घेतला त्यावेळी आम्ही सांगत होतो की, शासनाचा हा निर्णय चुकीचा आहे. आपण त्या वेळचे इतिवृत्त काढून पहावे. मी तर म्हणेन की, शासनाला शेतकऱ्यांची कर्जमाफी करावयाची नव्हती, उलट शासनाला सावकारांना मदत करावयाची होती. कोणाचीही मागणी नसताना शासनाने सावकारांच्या फायद्यासाठी कर्जमाफी केली आहे. परंतु आम्ही आज शेतकऱ्यांच्या फायद्यासाठी कर्जमाफी मागत आहोत. पण शासनाला शेतकऱ्यांना

..4..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

SJB/ KTG/ पूर्वी श्री.अजित.... 15:20

श्री.धनंजय मुंडे....

कर्जमाफी द्यावयाची नाही. राज्य सरकारची ऐपत असताना, राज्य सरकार शेतकऱ्यांच्या कर्जमाफीचा निर्णय घेऊ शकत नाही. किंबहुना शेतकऱ्यांना दिलासा दिला जात नाही.

नंतर श्री.कांबळे....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. धनंजय मुंडे ....

माझी या संदर्भात विनंती आहे. तुम्ही दरवर्षी एलबीटीसाठी 7 हजार कोटी रूपये देणार आहात. आमचे त्याबद्दल काहीही म्हणणे नाही, आमचा त्या गोष्टीला विरोध नाही. (अडथळा) गेले 4 वर्षे निसर्गामुळे शेतकरी अडचणीत आलेला आहे आणि असे हे चौथे वर्ष आहे. कापूस, धान, सोयाबीन, कांदा उत्पादक शेतकरी अडचणीत आला आहे, फळबाग शेतकरी अडचणीत आला आहे, दूध उत्पादक शेतकरी अडचणीत आला आहे. ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या संदर्भात तर विचारायलाच नको. दादा, एफआरपीमुळे तुमचे 2-4 किलो वजन कमी झाले आहे. सर्व शेतकरी अडचणीत आले आहेत. निसर्गाने संकट निर्माण केले आहे. आपण छत्रपती शिवाजी महाराजांची साथ म्हणून राज्यातील जनतेला साद घातली. महाराष्ट्रातील जनतेने तुम्हाला डोक्यावर घेऊन सत्तेत बसविले. आपण छत्रपती शिवाजी महाराजांचा थोडा तरी आदर्श घ्यावा. दुष्काळाच्या परिस्थितीत छत्रपती शिवाजी महाराजांनी आपल्या रयतेसाठी राज्याचे भांडार उघडून दिले, इतकेच नव्हे तर, पेरणीपासून सर्व गोष्टी केल्या. आज काय आहे ? छत्रपती शिवाजी महाराजांची साथ कुठे आहे ? आपण जनतेला साद घातली आहे. आता त्यांचा अशा पध्दतीने विश्वासघात करू नका. आजही त्यांची कर्जमुक्तीची मागणी आहे. (अडथळा) महाराष्ट्राची एक ओळख आहे. हिंदवी स्वराज्याचे संस्थांपक छत्रपती शिवाजी महाराज हे रयतेचे राजे होते. एक राजा म्हणून छत्रपती शिवाजी महाराजांचा जगाला आदर्श आहे. परंतु आज महाराष्ट्राची ओळख सर्वात जास्त आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांचे राज्य म्हणून झाली आहे. गेल्या 7 महिन्यांत यावर शिक्कामोर्तब झाले आहे. सततची नापिकी, सततचा दुष्काळ, अवकाळी पाऊस, गारपीट हे तुमच्या-माझ्या हातात आहे का ? हे तुमच्या-माझ्या हातात नाही. तुमच्या-माझ्या हातात एक गोष्ट आहे. आपण सलग 4 वर्षे संकटात असलेल्या शेतकऱ्यांना कर्जमुक्ती दिली पाहिजे. आपण या संदर्भात काहीही निर्णय करा. आतापर्यंत कर्जमाफी केली नाही का, इतर राज्याने कर्जमाफी केली नाही का ? नव्याने निर्माण झालेले तेलंगणा व आंध्रप्रदेश हे दोन्ही एनडीएचे घटक आहेत. दोन्ही राज्यांनी त्यांच्या राज्यातील दुष्काळी भागातील शेतकऱ्यांसाठी कर्जमाफी घोषित केली आहे. जर ते करू शकतात तर तुम्ही का



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. धनंजय मुंडे ....

करू शकत नाही ? आंध्रप्रदेशमध्ये सत्तेत भारतीय जनता पक्ष आहे, त्या सरकारने निर्णय घेतला. त्यांना पैशांची चिंता नाही का ? आम्हाला कुठेतरी असे वाटते की, त्यांना त्यांच्या शेतकऱ्यांची चिंता आहे आणि म्हणून त्यांनी तसे केले आहे. मात्र तुम्हाला शेतकऱ्यांची चिंता नाही. शेतकऱ्यांना मतापुरते वापरायचे आणि अनुदान वेळेवर द्यायचे नाही, पीक विमा वेळेवर द्यायचा नाही, कोणतेही लाभ वेळेवर द्यायचे नाही आणि शेतकरी मरण मागतो तर मरणाची परवानगीही द्यायची नाही. हे सत्य आहे की, विदर्भातील 7 शेतकऱ्यांनी आत्महत्या करण्याची परवानगी मागितली आहे. राज्यात पूर्वी अशी परिस्थिती कधीच आली नव्हती. माझी विनंती आहे की, राज्यातील शेतकऱ्यांसाठी कर्जमुक्तीची घोषणा केली पाहिजे. इतर नियोजन करून उपयोगाचे नाही. सावकारी कर्जमुक्तीचे पंचनामे झालेले आहेत, त्या भानगडी करून काहीही होणार नाही. कर्जमुक्तीशिवाय दुसरा मार्ग शेतकऱ्यांना वाचविण्यासाठी नाही आणि म्हणून मी सर्वांच्या समोर सरकारला कळकळीची विनंती करतो की, सरकारने कर्जमुक्तीची घोषणा करावी. आता आपल्याकडे त्याच्या पलीकडे दुसरा मार्ग नाही. आपण खोट्या प्रतिष्ठेचा प्रश्न करू नये. आता सरकारवर काय विश्वास राहिला आहे, शेतकऱ्यांनी सरकारवर आता काय विश्वास ठेवावा ? माननीय मुख्यमंत्री आत्महत्या केलेल्या शेतकऱ्याच्या घरी सांत्वनासाठी गेले. (अडथळा) माननीय मुख्यमंत्र्यांनी या संदर्भात खुलासा करावा की, कोणत्या कॅटररकडून फूड आले ? मला या गोष्टीचे राजकारण करायचे नाही. मला याच्या खोलात जायचे नाही. हे नक्की आहे की, माननीय मुख्यमंत्री आत्महत्या केलेल्या शेतकऱ्याच्या घरी सांत्वन करण्यासाठी गेल्यावर पुन्हा तेथे आत्महत्या झाली. मग तुम्ही काय विश्वास दिला ?

श्री. संजय राठोड : सभापती महोदय, मला बोलायचे आहे.(अडथळा)

**सभापती** : सन्माननीय विरोधी पक्षनेत्यांना बोलू द्यावे. चर्चेच्या उत्तराच्या वेळी सदनाचे माननीय गटनेते किंवा माननीय मुख्यमंत्री उचित उत्तर देतील.

श्री. धनंजय मुंडे : सभापती महोदय, मोठ्या घोषणा देऊन उपयोगाचे नाही. (अडथळा) मी खोटे बोलत नाही. शासनाने हा विषय खोट्या प्रतिष्ठेचा करू नये. आम्ही मागणी केली म्हणून

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. धनंजय मुंडे ....

नाही. कर्जमुक्तीची घोषणा केली तर याच सभागृहात सरकारच्या अभिनंदनाचा ठराव सर्व पक्षांकडून मांडू. आपण शेतकऱ्यांवर उपकार करावेत आणि त्यांना कर्जमुक्ती द्यावी, एवढीच विनंती करतो. आपण शेतकऱ्यांच्या जातीला वाचवावे. धन्यवाद. जय हिंद ! जय महाराष्ट्र !

----

..4

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्रीमती शोभा फडणवीस (विधानसभेने निवडलेल्या) : सभापती महोदय, सन्माननीय विरोधी पक्षनेत्यांनी मांडलेल्या व सत्तारूढ पक्षाच्या तशाच आशयाच्या असलेल्या प्रस्तावावर बोलण्यासाठी मी उभी आहे. शेतकऱ्यांच्या आत्महत्या, कर्जबाजारीपणा, निसर्गाचा लहरीपणा हे अत्यंत गंभीर विषय मी मांडत आहे.

सभापती महोदय, राज्यात पावसाने दडी मारल्यामुळे शेतकऱ्यांवर दुबार पेरणीची वेळ आली आहे. पाऊस गेल्यामुळे दुबार पीक घेऊ शकतो की नाही, पेरणी करून पीक निघेल की नाही हे महत्त्वाचे प्रश्न उद्‌भवलेले आहेत. गेले 15 दिवस पावसाने दडी मारली आहे. काही जिल्ह्यांत पिण्याच्या पाण्याचा प्रचंड टंचाई निर्माण झाली आहे. मराठवाडा भागातील उस्मानाबाद, बीड, जालना जिलह्यांत गेल्या 4-5 वर्षांपासून निसर्गाचा प्रकोप सुरू आहे. हा आमचा पायगुण नाही, आम्ही आता 9 महिन्यांपासून आलो आहोत. हा जुनाच पायगुण आहे. गेल्या 4-5 वर्षांपासून दुष्काळ आहे. त्यामुळे भीषण परिस्थिती निर्माण झाली आहे. मजूर, गरीब शेतकरी सातत्याने पावसावर अवलंबून आहे. शेतकरी त्यामुळेच अडचणीत आलेला आहे. पाऊस न पडणे हेच शेतकऱ्यांच्या अडचणीचे कारण आहे.

( नंतर श्री. रोझेकर ....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्रीमती शोभा फडणवीस........

आज शेतकऱ्यांना सिंचन प्रकल्पांची गरज आहे. शेतकरी भीक मागत नाही तर न्याय मागतो आहे. शेतीसाठी आवश्यक असणाऱ्या गोष्टींची मागणी शेतकरी करीत आहे. शेतकरी स्वतः कष्ट करतो, ग्रामीण भागात, आदिवासी भागात राहतो. हा शेतकरी आपल्याकडे अशी मागणी करतो आहे की, आमच्यासाठी धरणे बांधून द्या, आम्हाला पाणी मिळाले तर आम्ही शेती करु शकू. त्यामुळे खऱ्या अर्थाने शेतकऱ्यांना सिंचन प्रकल्पांची, उत्तम बियाणांची आवश्यकता आहे. अनेक ठिकाणी खाजगी व्यापाऱ्यांकडून खरेदी केलेल्या बियाणांमुळे शेतकऱ्यांची फसवणूक होत आहे. त्यामुळे त्यांना उत्तम प्रतीची बियाणे मिळाली पाहिजेत. शेतकऱ्यांना वेळोवेळी कर्ज उपलब्ध करुन देण्याची आणि घेतलेल्या कर्जावरील व्याज माफ करण्याची आवश्यकता आहे. पिकांसाठी घेतलेल्या कर्जावर सबसिडी व उत्पादन खर्चावर आधारित दर मिळावा, अशाही शेतकऱ्यांच्या आणखी काही मागण्या आहेत.

सभापती महोदय, देशात किंवा राज्यात सिंचन व्यवस्था निर्माण करीत असताना योग्य पध्दतीचे नियोजन झालेले नाही. कोणाला किती पाणी द्यावे, कशा प्रकारे द्यावे, कोणत्या माध्यमातून द्यावे, शेतकऱ्यांनी ते पाणी कशा प्रकारे उचलावे, कोणत्या प्रकल्पातून न्यावे, या बाबतीतील सुयोग्य धोरण नसल्यामुळे पाण्याचा मोठ्या प्रमाणावर अपव्यय झाला आहे. त्यामुळे पाण्याचे योग्य नियोजन करण्याची गरज आहे.

सभापती महोदय, शेतकऱ्यांच्या कृषी पंपांना विद्युत जोडणी आणि पूर्णवेळ वीज, या देखील शेतकऱ्यांच्या आणखी काही छोट्या मागण्या आहेत. शेतीला पाणी देण्यासाठी शेतकरी दिवसा जायचे. त्यावेळी लोड शेडिंग असायचे. रात्री लोडशेडिंग नसले तरी त्यावेळी पिकांना पाणी देण्यासाठी शेतकरी शेतात जात नव्हते. परंतु, आता लोडशेडिंगचा प्रश्न नसला तरी पाणीच उपलब्ध नसल्यामुळे शेतकऱ्यांची मोठी अडचण झाली आहे. गेल्या 50 वर्षात सिंचनाचा प्रश्न सुटला असता तर या गोष्टींसाठी शेतकऱ्यांवर आत्महत्या करण्याची वेळ आली नसती. 70 हजार कोटी रुपये खर्च करुन केवळ एक टक्का सिंचन निर्माण झाले, असा कॅगचा अहवाल आहे. योग्य पध्दतीने सिंचन व्यवस्था निर्माण झाल्या असत्या तर आपण शेतकऱ्यांच्या आत्महत्या थांबवू शकलो असतो. परंतु, मागील काळात हे घडले नाही, हे खरोखरच महाराष्ट्राचे आणि शेतकऱ्यांचे दुर्दैव आहे.

...2....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्रीमती शोभा फडणवीस.....

सभापती महोदय, शेतकरी या नऊ महिन्यात कर्जबाजारी झाला का ? दुर्दैवाने, सततचा ओला किंवा कोरडा दुष्काळ, दिवसेंदिवस उत्पादन खर्चात होत असलेली वाढ, याचा हा परिणाम आहे, हे आपल्या सर्वांना मान्यच करावे लागेल.

सभापती महोदय, यापूर्वीच्या सरकारने धडक विहिरींचा कार्यक्रम हाती घेतला आणि पश्चिम महाराष्ट्रात, यवतमाळ, उस्मानाबाद आणि अकोला जिल्ह्यात 1 हजार विहिरी मंजूर केल्या. या विहिरी पूर्ण झाल्या का, शेतकऱ्यांना या विहिरींचे पैसे मिळाले का ? मी उस्मानाबाद जिल्ह्याला भेट दिली. शेतकऱ्यांच्या शेतात फिरले. त्यावेळी असे लक्षात आले की, काही विहिरी पूर्ण झाल्या असल्या तरी शेतकऱ्यांना एक पैसाही मिळालेला नाही आणि ज्यांच्या विहिरी अर्धवट पूर्ण झाल्या आहेत, त्यांनाही पैसे मिळालेले नाहीत. शेतकरी स्वत:चे पैसे खर्च करुन विहीर बांधत असेल आणि त्याला जर दोन-तीन वर्षांपासून शासनाकडून अनुदानाचे पैसे मिळत नसतील तर तो आत्महत्या करणार नाही तर काय करणार आहे ? हा शेतकऱ्यांवर झालेला अन्याय नाही का ? धडक विहिरींचा कार्यक्रम भडक प्रसिध्दी करुन सुरु झाला. परंतु, खऱ्या अर्थाने शेतकऱ्यांच्या शेतात विहिरी तयार झाल्या नाहीत. त्या जर पूर्ण झाल्या असत्या तर त्यांच्यावर आत्महत्या करण्याची वेळ आली नसती. नियमाप्रमाणे या शेतकऱ्यांना पहिला आणि दुसरा हप्ता देणे गरजेचे होते. शेतकऱ्यांच्या स्वत:चे पैसे खर्च होऊनही त्यांना शासनाचे अनुदान मिळाले नाही. त्यामुळे शेतकरी सिंचनापायी कर्जबाजारी झाला, असे म्हटले तर ते वावगे ठरणार नाही.

सभापती महोदय, जवाहर विहिरींवर विजेचे पंप बसले असते, भारनियमनाचा फटका बसला नसता तर तो शेतकरी कर्जबाजारी झाला नसता. अशाही परिस्थितीत एक वर्ष, दोन वर्षे तो हिंमतीने जगत असतो. परंतु त्यानंतरही समोर अंधार दिसत असल्यामुळे तो आत्महत्या करण्यास प्रवृत्त होतो. ही परिस्थिती खऱ्या अर्थाने आपण विचारात घेण्याची गरज आहे.

सभापती महोदय, शेतकरी भीक नाही तर न्याय मागत असतो. पण आपण त्याकडे सातत्याने दुर्लक्ष करीत आलो आहोत. राज्यातील सिंचन क्षेत्रात राष्ट्रीय सरासरीपेक्षा घट झाली आहे, असे कॅगच्या अहवालात नमूद केले आहे. ही घट का निर्माण व्हावी, याचा विचार कोणी

...3....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्रीमती शोभा फडणवीस.....

केला आहे का ? मी गेल्या 26 वर्षांपासून विधानसभा आणि विधानपरिषदेची सदस्या आहे. दरवर्षी आम्हाला आर्थिक पहाणी अहवाल मिळतो. पाऊस चांगला झाला तर कृषी विकासाचा दर +7.5 टक्के असतो आणि चांगला पाऊस झाला नाही तर तो दर -2.5 टक्क्यांवर येतो. आम्ही गेल्या 50 वर्षांपासून हेच पाहतो आहोत. असे असेल तर गेल्या 50 वर्षात शेतकऱ्यांचा विकास झाला, असे कोणी म्हणू शकेल का ? आर्थिक पहाणी अहवाल किंवा त्या संदर्भातील सर्व हिशेब सरकारकडूनच आम्हाला दिला जात असतो आणि त्यामधून जर ही वस्तुस्थिती निदर्शनास येत असेल तर त्याबाबत गांभीर्याने विचार करण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदय, ज्यावेळी आपण दुसऱ्याकडे बोट दाखवितो, त्यावेळी चार बोटे आपल्या स्वत:वरही रोखलेली असतात, याची जाणीव आपण ठेवली पाहिजे. शेतकरी राजकारणाचा विषय होऊ शकत नाही. शेतक-यांच्या विकासाच्या संदर्भात चर्चा झाली पाहिजे. कारण या राज्यात 70 टक्के लोक शेतकरी आहेत. तुम्ही काय केले, आम्ही काय केले, हा विषय महत्वाचा नाही. शेतक-यांसाठी नेमके काय केले पाहिजे, हा चर्चेचा विषय होऊ शकतो. या शेतकऱ्यांना आत्महत्यांपासून परावृत्त करावयाचे असेल तर त्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदय, शेतकऱ्यांना कर्जमाफी द्यावी, अशी विरोधी पक्षाची मागणी आहे तर सिंचनाच्या व्यवस्था निर्माण करा, शेतीयोग्य सुविधा निर्माण करा, आमच्या पाठीशी उभे राहून आम्हाला शेतीसाठी कर्ज मिळवून द्या, कर्जावरील व्याज माफ करा, अशा मागण्या खुद्द शेतकऱ्यांच्या आहेत. तो भीक मागत नाही. कारण, तो स्वाभिमानी आहे. घेतलेले कर्ज फेडता येत नाही म्हणून आज शेतकऱ्याला आत्महत्या करीत आहेत. हे कोणामुळे घडले आहे ? एखाद्या कारखानदाराने, एखाद्या व्यापाऱ्याने कर्ज फेडता न आल्यामुळे आत्महत्या केल्याचे आपल्याला बघायला मिळते का ? ते कधीही आत्महत्या करीत नाहीत. पण शेतकरी आत्महत्या करतो. कारण, तो खऱ्या अर्थाने स्वाभिमानाने, सन्मानाने जीवन जगण्याचा प्रयत्न करीत असतो. त्यामुळे त्याचाही विचार होण्याची आवश्यकता आहे.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्रीमती शोभा फडणवीस.....

सभापती महोदय, गेल्या 50 वर्षात आपण शेती उत्पादनांचे दर वाढवू शकलो नाही, पावसावर आणि निसर्गावर अवलंबून राहिलो. पण आता आपण सर्वांनी एक गोष्ट लक्षात ठेवली पाहिजे की, हीच परिस्थिती पुढे सुरु राहिली तर आपण शेतकऱ्यांना वाचवू शकणार नाही. गेल्या 50 वर्षात आपण शेतीचा विकास करु शकलो नाही, हे पाप कोणाचे आहे ? हे पाप तुमचे आणि आमचेही आहे. त्या काळात जर आपण सिंचनाचे प्रकल्प राबविले असते आणि मोठ्या प्रमाणावर सिंचन व्यवस्था निर्माण केल्या असत्या तर आज ही वेळ आली नसती.

सभापती महोदय, विदर्भात एकही मोठा सिंचन प्रकल्प झाला नाही. त्यासाठीची कारणे कोणतीही असोत. परंतु, यामुळे वर्षानुवर्षे त्या भागाला दुष्काळी परिस्थितीला सामोर जावे लागत आहे. दुष्काळी परिस्थितीमध्ये आपण टँकरने पाणी पुरवठा करण्याचा विचार करतो. परंतु, कायमस्वरुपी पिण्याच्या पाण्याच्या व्यवस्था निर्माण करण्याचा विचार करीत नाही, हे खरे दुर्दैव आहे. अशा प्रकारे आपण आणखी किती वर्षे टँकरने पाणी पुरवठा करणार आहोत ? त्यापेक्षा कायमस्वरुपी योजना कशा राबवू शकू, लोकांना, शेतकऱ्यांना या परिस्थितीतून कसे बाहेर काढू शकू, शेतकऱ्यांच्या आत्महत्या कशा थांबवू शकू, याचा विचार करावयास हवा होता, हे मला या ठिकाणी नमूद करावयाचे आहे.

सभापती महोदय, मराठवाड्यातील परिस्थिती अशी आहे की, दरवर्षी मराठवाड्यात टँकरने पाणी पुरवठा करावा लागतो. तत्कालीन पाटबंधारे मंत्री डॉ.पद्मसिंह पाटील यांनी उस्मानाबाद जिल्ह्यात 1 हजार कोल्हापूर पध्दतीचे बंधारे बांधले आणि त्यामध्ये पाणी सोडले. परंतु, त्या पाण्याचे योग्य नियोजन न झाल्यामुळे शेतकऱ्यांनी त्या पाण्यावर ऊसाचे पीक घेण्यास सुरुवात केली. आज अशी परिस्थिती निर्माण झाली आहे की, त्या ठिकाणी पिण्याचे पाणी देखील उपलब्ध नाही. त्याचवेळी जर याबाबतचे सुयोग्य नियोजन झाले असते तर उस्मानाबाद जिल्ह्याला टँकरने पाणी पुरवठा करण्याची गरज निर्माण झाली असती का ? आपण त्या ठिकाणी हा विचार करीत नाही की, कायमस्वरुपी पाणी पुरवठा योजना कशा राबवू शकू, सर्व पिकांना पाणी कसे उपलब्ध

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

करुन देऊ शकू, पिण्याच्या पाण्याचा प्रश्न कसा सोडवू शकू. त्यामुळे याबाबत खऱ्या अर्थाने विचार

...5....



श्रीमती शोभा फडणवीस.....

करण्याची आवश्यकता आहे. पाण्याचे योग्य नियोजन झालेले नाही, हेच खरे दुर्दैव आहे. त्यामुळे संपूर्ण महाराष्ट्रासाठी पाण्याचे नियोजन करण्याची आवश्यकता आहे. अनेक शास्त्रज्ञांनी असे म्हटले आहे की, पुढील 10 वर्षात पिण्याच्या पाण्यासाठी लढाया होतील. हे आपल्याला टाळावयाचे असेल तर आपल्याला सुयोग्य पाणी नियोजनाचा विचार करावा लागेल.

सभापती महोदय,शेतकऱ्यांच्या आत्महत्या गेल्या नऊ महिन्यातच झाल्या आहेत का ? गेल्या 15 वर्षांपासून आत्महत्या होत आहेत. या आत्महत्यांना सध्याचा दुष्काळ कारणीभूत असेल तर सिंचन प्रकल्पांमध्ये झालेला भ्रष्टाचार या दुष्काळास कारणीभूत आहे, हे देखील आपल्याला मान्य करावे लागेल. यवतमाळ, बुलढाणा या दोन जिल्ह्यात गेल्या दोन वर्षात सर्वात जास्त आत्महत्या का झाल्या, याचाही शोध घेण्याची आवश्यकता आहे. मी मघाशी सन्माननीय गटनेते श्री.माणिकराव ठाकरे यांच्याशी चर्चा करीत असताना त्यांना असे विचारले की, मोठ्या प्रमाणावर या दोनच जिल्ह्यातील शेतकरी आत्महत्या करण्यासाठी का प्रवृत्त होत आहेत ? मला असे सुचवावयाचे आहे की, या आत्महत्या का होत आहेत, कशासाठी होत आहेत, कोणती परिस्थिती यास कारणीभूत आहे, त्यावर नेमके उपाय काय आहेत, याचा शोध घेणे हा आत्महत्या थांबविण्याचा पहिला प्रयत्न असला पाहिजे. परंतु, आपण ते करीत नाही. आपण तात्पुरत्या उपाययोजनांवर भर देतो. आपण दीर्घकालीन, कायम स्वरुपी उपाययोजना का राबवीत नाही ? त्यामुळे शेतकऱ्यांच्या आत्महत्या गेल्या 15 वर्षांपासून सुरु आहेत, त्या आज सुरु झालेल्या नाहीत, याचाही विचार करण्याची गरज आहे.

सभापती महोदय, विदर्भातील अमरावती जिल्ह्यात सोफिया आणि नागपूर जिल्ह्यात धापेवाडा असे सिंचनाचे काही प्रकल्प झाले. सोफिया प्रकल्पासाठी शेतकऱ्यांच्या जमिनी घेण्यात आल्या. परंतु, या प्रकल्पांमधून शेतकऱ्यांना पाणी देण्यात आले आहे का ?

यानंतर श्री.बोरले.......

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्रीमती शोभा फडणवीस........

शेतकऱ्यांना सिंचनासाठी पाणी देण्यात येईल, असे सांगितले. शेतकऱ्यांचा 70 टक्के पाण्यावर अधिकार आहे, असे आम्हाला तत्कालीन मुख्यमंत्र्यांनी सांगितले होते. मग सोफीया प्रकल्पातील पाणी शेतकऱ्यांना दिले काय ? कारखानदारांना 70 टक्के पाणी देऊन 10 टक्के पाणी देखील शेतकऱ्यांना दिले नाही आणि म्हणूनच पश्चिम विदर्भात मोठ्या प्रमाणावर शेतकऱ्यांच्या आत्महत्या होत आहेत. आपण याचा कधी तरी विचार करणार आहात की नाही ? तिरोडा येथील धोपेवाडा क्र.2 प्रकल्पासाठी आम्ही उपोषण केले होते. आम्ही तो प्रकल्प पूर्ण केला आणि त्या प्रकल्पातील पाणी कोणाला देण्यात आले ? त्या प्रकल्पातील पाणी अदानी कंपनीला देण्यात आले. त्या प्रकल्पातील पाणी कारखानदारांना विज निर्मितीसाठी देण्यात आले. तेथील शेतकरी पाण्यासाठी ओरडत आहेत आणि आम्ही मात्र कारखानदारांना पाणी पुरवितो. त्या काळात जर ही वस्तुस्थिती नसती तर शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या नसत्या. आज शेतकऱ्यांना शेतीसाठी पाणी पाहिजे. आम्ही प्रकल्प सुरु करणार, शेतकऱ्यांच्या नावाने पैसे खर्च करणार आणि पाणी मात्र उद्योजकांना देणार हे कोठे तरी थांबले पाहिजे. आपण सर्वांनी सामुदायिक रीत्या याबाबत विचार करण्याची आवश्यकता आहे आणि हे कोणाचे पाप आहे ? हे तुमचे पाप आहे, का आमचे पाप आहे ? शेतकऱ्यांना कोणी लुटले, उद्योजकांना कोणी पाणी दिले, याचा गांभीर्याने विचार करण्याची आवश्यकता आहे. शेतकऱ्यांच्या आत्महत्यांच्या संदर्भात गांभीर्याने विचार करण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदय, राज्यात 70 हजार कोटी रुपये खर्च करुन 1 टक्के देखील सिंचन झालेले नाही. हा कॅगचा अहवाल आहे, हा आमचा अहवाल नाही. अतिरिक्त सचिवांनी हायकोर्टात ॲफिडेव्हिट सादर केलेले आहे. त्यामध्ये काय म्हटले आहे ? राज्यातील आराखड्याची अट डावलून 189 प्रकल्पांना तत्कालीन जलसंपदा मंत्री यांच्या सूचनेमुळे मान्यता देणे भाग पडले, असे शपथपत्र जलसंपत्ती प्राधिकरणाच्या अतिरिक्त सचिवांनी मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठात सादर केलेले आहे. माझ्या जवळ त्या ॲफिडेव्हिटची प्रत आहे. आपल्याला ती प्रत पाहिजे असेल तर मी ती आपल्याला देते. दिनांक 25 एप्रिल, 2007 रोजी औरंगाबाद खंडपीठात हे शपथपत्र सादर करण्यात आले आहे. हे संपूर्ण प्रकल्प मंजूर झालेले नाहीत. त्या प्रकल्पांना

..2...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्रीमती शोभा फडणवीस........

केवळ मान्यता दिलेली आहे. हे 5,640 कोटी रुपये किंमतीचे प्रकल्प आहेत. त्यांनी प्रशासकीय मान्यतेपूर्वी प्रकल्पांना मंजुरी घेण्याची सूचना केली होती. मग याला काय म्हणावयाचे ? याला व्यवहार म्हणावयाचे, गैरव्यवहार म्हणावयाचे, भ्रष्टाचार म्हणावयाचे का व्यवस्था म्हणावयाची ? यासाठी कोणता शब्द वापरावयाचा ? शेतकऱ्यांना ना पाणी मिळाले, ना प्रकल्प झाले, ना फायदा झाला. केवळ मंजुरी देऊन शेतकऱ्यांच्या तोंडाला पाने पुसण्यात आली. आम्ही प्रकल्प कोणासाठी सुरु करतो ? सिंचन झाले पाहिजे अशी मागण करतो, तर शेतकरी करतो. सिंचन पाहिजे यासाठी प्रशासकीय मान्यता न घेता कार्यक्रम राबवायचे काय ? हे चुकीचे आहे असे आपल्याला वाटत नाही काय ? ही शेतकऱ्यांची थट्टा आहे, शेतकऱ्यांना जे पाहिजे ते आम्ही त्यांना देऊ शकलो नाही, असे आपल्याला वाटत नाही काय ? आपण याचा कोठे तरी विचार करण्याची आवश्यकता आहे. शेतकऱ्यांची कर्जमाफी झाली पाहिजे, शेतकऱ्यांच्या आत्महत्या थांबल्या पाहिजेत, असे आपण म्हणतो. शेतकऱ्यांच्या आत्महत्या थांबल्या पाहिजेत, यावर सर्वांचे एकमत आहे. आपण सन 2008 मध्ये कर्जमाफी करुन शेतकऱ्यांना न्याय देण्याचा प्रयत्न केला. शेतकऱ्यांची कर्जमाफी व्हावी यावर आपण जोर देत आहात. खरे म्हणजे, याचे कारण मला समजू शकत नाही. मराठवाड्याला कर्जमाफीपेक्षा सिंचनाची, विजेची, शेतकऱ्यांच्या विकासाची आणि पिण्याच्या पाण्याची आवश्यकता असताना त्याची मागणी कोणीच करीत नाही. लोकांना जे लागते त्याची मागणी करावयाची, शेतकऱ्यांना जे लागते त्याची मागणी करावयाची ? आज तेथील शेतकरी शेतीसाठी, पिण्यासाठी पाणी मागत आहेत. आम्हाला पिण्याचे पाणी द्यावे, अशी मागणीशेतकरी करीत आहेत.

सभापती महोदय, आज जलयुक्त शिवार योजनेवर कितीही टिका केली, कितीही भ्रष्टाचाराचे आरोप केले तरी जलयुक्त शिवार योजनेवर आज जनता खूश आहे. चांगला पाऊस पडला असता तर जलयुक्त शिवार योजनेचा नक्कीच फायदा झाला असता. आपण आता पर्यंत फक्त पाण्याचा उपसा केलेला आहे. परंतु, आपण रिचार्जिंगचा कधीही विचार केलेला नाही आणि त्यामुळे भूगर्भातील पाण्याची पातळी कमी झालेली आहे, हे आपण मान्य केले पाहिजे. (...अडथळा...) काय करायचे हे आम्ही ठरवितो. परंतु, जे सत्य आहे ते पचवून घेण्याची

..3...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्रीमती शोभा फडणवीस........

मानसिकता ठेवावी.शेतकऱ्यांना पाणी मिळावे, भूगर्भातील पाण्याची पातळी वाढावी यासाठी आपण जलयुक्त शिवार योजना सुरु केली. आज शेतकऱ्यांच्या सर्वात जास्त आत्महत्या जर कोठे होत असतील तर त्या पश्चिम विदर्भात होत आहेत आणि त्यासाठी उपाययोजना करण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदय, आपण सन 2008 मध्ये शेतकऱ्यांसाठी कर्जमाफीची योजना जाहीर करण्यात आली. देशात 71 हजार कोटी रुपयांची कर्जमाफी करण्याची घोषणा करण्यात आली. त्यावेळी शेतकऱ्यांचा 7/12 चा उतारा कोरा करण्याची घोषणा देखील करण्यात आली होती. देशातील 37 लाख 50 हजार शेतकऱ्यांना कर्जमाफीचा लाभ देण्याचे ठरले आणि महाराष्ट्रासाठी 6,208 कोटी रुपयांचे कर्ज मंजूर झाले. दिनांक 31 मार्च, 2000 पर्यंतचे शेतकऱ्यांचे कर्जमाफ करण्याचा निर्णय घेऊन त्यासाठी गाईड लाईन्स तयार करण्यात आल्या. 2.5 एकरापर्यंत 20 हजार रुपये कर्जमाफी, 5 एकरापर्यंत 50 टक्के कर्जमाफी, 7 एकरापेक्षा जास्त शेती असेल तर 25 टक्के कर्जमाफी देण्याच्या सूचना देण्यात आल्या. ज्यांचे कर्ज 20 हजार रुपयांपर्यंत असेल त्यांना पूर्ण कर्जमाफी, ज्यांचे कर्ज 40 हजारापेक्षा जास्त असेल त्यांना 50 टक्के म्हणजे 20 हजार रुपयेच कर्जमाफी, ज्यांचे कर्ज 80 हजार रुपयापेक्षा जास्त असेल त्यांना 25 टक्के म्हणजे 20 हजार रुपयेच कर्जमाफी आणि ज्यांचे कर्ज 1 लाखापेक्षा जास्त असेल त्यांना 25 टक्के कर्जमाफी देण्यात आली. (...अडथळा...) सन्माननीय सदस्य श्री.माणिकराव ठाकरे साहेबांनी माझे म्हणणे ऐकून घ्यावे. शेतकऱ्यांच्या आत्महत्या का थांबत नाहीत, हे मी सांगत आहे. हा तुमचाच विषय आहे. हा तुमचा, आमचा सर्वांचा विषय आहे, याचाही आपण विचार करावा. संपूर्ण कर्जमाफीचे 6,208 कोटी रुपये महाराष्ट्र स्टेट को-ऑपरेटिव्ह बँकेत जमा करण्यात आले आणि जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या मागणी प्रमाणे ते जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेकडे वर्ग करावयाचे होते. त्याप्रमाणे ते जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेकडे वर्ग करण्यात आले. मी विदर्भातील शेतकऱ्यांचा विषय विधानसभा आणि विधानपरिषदेत देखील मांडला होता. विदर्भातील शेतकऱ्यांना फक्त 10 हजार

..4...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्रीमती शोभा फडणवीस........

रुपयेच कर्जमाफी मिळाली आणि छोटा शेतकरी असेल तर फक्त 5 हजार रुपयेच कर्जमाफी मिळाली. विदर्भातील शेतकऱ्यांना 20 हजार रुपये कर्जमाफीचा फायदा का होत नाही, असा मुद्दा मी सभागृहात मांडला होता. (...अडथळा...) आपण जुने पाप ऐकून घ्यावे. अगोदर काय चुकले ते ऐकून घ्यावे. मग पुढील विचार करु. 1 लाख रुपये कर्ज असेल तर 25 हजार रुपये कर्जमाफी आणि प्रत्यक्षात विदर्भातील शेतकऱ्यांना 10 हजार, 5 हजार रुपये कर्जमाफी मिळाली. मग विदर्भातील कोणत्या शेतकऱ्यांचा 7/12 चा उतारा कोरा झाला ? छोट्या शेतकऱ्यांचा देखील 7/12 चा उतारा कोरा झालेला नाही. (...अडथळा...) आपण ऐकून घेण्याची मानसिकता ठेवावी. आम्ही आता पर्यंत तुमचे भजन ऐकून घेतले, तुम्ही माझे कीर्तन तरी ऐकून घ्यावे. सन्माननीय सदस्य श्री.माणिकराव ठाकरे साहेब आपण विदर्भातील आहोत. आपण माझे म्हणणे एकून घ्यावे. पश्चिम महाराष्ट्रातील एका ज्येष्ठ सन्माननीय सदस्यांचा मी सन्मान करते, ते माझे आदर्श आहेत. ते काँग्रेस पक्षाचे सन्माननीय सदस्य आहेत. त्यावेळी त्यांनी मला बोलाविले आणि सांगितले की, विदर्भात फक्त 10 हजार रुपयेच कर्जमाफी झाली काय ? मी त्यांना होय असे सांगितले. मी त्यांना विचारले की, तुमच्या भागातील शेतकऱ्यांना किती कर्जमाफी मिळाली ? त्यांनी मला सांगितले की, आमच्या भागातील शेतकऱ्यांना 5 लाख रुपये, 4 लाख रुपये, 3 लाख रुपये कर्जमाफी मिळाली. मी त्यांना विचारले की, एवढा फरक कसा काय असू शकतो ? त्यांनी मला सांगितले की, आमच्या भागातील शेतकऱ्यांचे ट्रॅक्टरचे, विहिरीचे, कृषी पंपाचे कर्ज माफ झाले. मग आम्ही काय पाप केले ? कर्जाच्या बाबतीत कोठेही असे नमूद केलेले नाही. फक्त शेतीचे कर्जमाफ करावे, असे सांगितले. 20 हजारापर्यंत 20 टक्के, 25 टक्के कर्जमाफ करावयास सांगितले. मग पश्चिम महाराष्ट्रातील शेतकऱ्यांचे 5 लाख रुपये कर्जमाफ होते आणि विदर्भातील शेतकऱ्यांचे फक्त 10 हजार रुपयांचे कर्जमाफ होते ?

(विरोधी पक्षाचे काही सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करतात.)

..5...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्रीमती शोभा फडणवीस : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी माझे म्हणणे ऐकून घ्यावे. मी केवळ बोलणार नाही तर आकडेवारी देखील सांगणार आहे. आपण ऐकण्याची मानसिकता ठेवावी. तुमची ऐकण्याची मानसिता नाही तर कर्जमाफीची मानसिकता तुम्ही कोठून आणली ?

( दोन्ही बाजूचे सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करतात.)

श्रीमती शोभा फडणवीस : सभापती महोदय, मी सन 2008 मध्ये जे झाले त्या विषयी बोलत आहे आणि मी आकडेवारी देखील सांगणार आहे. शेतकऱ्यांच्या किती आत्महत्या झाल्या हे मी सांगणार आहे. कोणत्या विभागाचे, कोणत्या जिल्ह्यातील शेतकऱ्यांचे किती कर्जमाफ झाले, हे देखील मी सांगणार आहे. मी यवतमाळ जिल्ह्यातील परिस्थिती विषयी देखील बोलणार आहे. सन्माननीय सदस्यांनी माझे म्हणणे एकून घ्यावे.

श्री.धनंजय मुंडे : सभापती महोदय, माझा पॉईंट ऑफ ऑर्डर आहे. विरोधी पक्षातर्फे मांडण्यात आलेल्या प्रस्तावावर चर्चा होत आहे. परंतु, मंगळवारी सत्ताधारी पक्षातर्फे फक्त कर्जमुक्ती हा शब्द वगळता असाच प्रस्ताव आला होता. मी सत्ताधारी पक्षाच्या सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, राज्यातील शेतकऱ्यांना शासनाकडून काही अपेक्षा आहेत आणि सभापती महोदयांनी स्वतः सांगितले की, दोन्ही विषय एकच असल्यामुळे याच अनुषंगाने आपण बोलले पाहिजे. सन 2008 मध्ये कर्जमाफी कोणाला मिळाली हा चर्चेचा विषय नाही, वाद घालण्याचा विषय नाही.

यानंतर श्री.खर्चे वि........

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.धनंजय मुंडे...

राजकारण करण्याचा हा विषय नाही. मी स्वतः माझ्या भाषणात बोललो आहे. आम्ही कोणतीही राजकीय मागणी आज करीत नाही. हे मी स्वतः सांगितले आहे. आज शेतकरी अडचणीत आहे, तो कसा अडचणीत आला, आज होणारी कर्जमाफी कोणाला मिळावी, कशी मिळावी, आमचे म्हणणे आहे की, आमच्या सरकारने जितक्या रकमेची कर्जमाफी दिली तेवढीच या सरकारने द्यावी. आता ही चर्चा वेगळ्या विषयाकडे चालली आहे. म्हणून माझी सन्माननीय सदस्या श्रीमती शोभा फडणवीस यांना विनंती आहे की, जो प्रस्ताव दिलेला आहे, त्या प्रस्तावावर आपण चर्चा करावी.

श्रीमती शोभा फडणवीस : सभापती महोदय, मी प्रस्तावात दिलेल्या विषयाच्या बाहेर चर्चा करीत नाही. शेतकऱ्यांना कर्जमाफी देण्याचा विषय उपस्थित झाला असल्यामुळे मागील सरकारने जी कर्जमाफी केली त्यामुळे शेतकऱ्यांच्या आत्महत्या थांबल्या आहेत काय हा माझा खरा प्रश्न आहे. आता कर्जमाफी हवी असेल तर ती कशी असावी, कर्जमाफी असावी की, विकासाची दिशा असावी असा मी विषय मांडीत आहे. सरकारला मार्गदर्शन करणे, दिशा देणे हे सर्वच लोकप्रतिनिधींचे कर्तव्य असते. या दृष्टीकोनातून हा विषय मी मांडीत आहे. या विषयाचे राजकारण करण्याची गरज नाही. मागील काळात जे घडले तेच मी सांगत आहे. सन 2008 मध्ये कर्जमाफी देऊन देखील शेतकऱ्यांच्या आत्महत्या थांबल्या आहेत काय, याचे उत्तर नाही असे आहे. म्हणून याबाबत विचार करण्याची गरज आहे.

सभापती महोदय, माझ्याकडे नागराज कमिटीचा रिपोर्ट आहे. तो रिपोर्ट मी वाचून दाखविणार आहे. त्या वर्षातील सरकारी आकडे देखील मी वाचून दाखविणार आहे. त्यामुळे या कमिटीचा रिपोर्ट व सरकारचे आकडे यामध्ये कशी तफावत आहेत हे आपणाला कळून येईल. सन 2000-2001 मध्ये नागराज कमिटीच्या रिपोर्टनुसार 3022 शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या होत्या. सरकारच्या रिपोर्टमध्ये फक्त 62 आत्महत्या नोंदविल्या आहेत. हे आकडे दाबण्याचा व शेतकऱ्यांच्या मरणावर राजकारण करण्याचा प्रयत्न त्यावेळी झालेला आहे. हे आपणाला मान्य करावे लागेल. सन 2001-2002 मध्ये 3536 शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या असून सरकारच्या रिपोर्टमध्ये 122 आत्महत्या नोंदविल्या आहेत. सन 2002-2003 मध्ये 3695 शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या असून सरकारच्या रिपोर्टमध्ये 180 आत्महत्या नोंदविल्या आहेत. सन 2003-2004 मध्ये 3836 शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या असून सरकारच्या रिपोर्टमध्ये 640 आत्महत्या



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्रीमती शोभा फडणवीस..

नोंदविल्या आहेत. सन 2004-2005 मध्ये 4147 शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या असून सरकारच्या रिपोर्टमध्ये 6009 आत्महत्या नोंदविल्या आहेत. सन 2005-2006 मध्ये 3926 शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या असून सरकारच्या रिपोर्टमध्ये 2376 आत्महत्या नोंदविल्या आहेत. सन 2006-2007 मध्ये 4238 शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या असून सरकारच्या रिपोर्टमध्ये 2076 आत्महत्या नोंदविल्या आहेत. सन 2007-2008 मध्ये 4453 शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या असून सरकारच्या रिपार्टमध्ये 1966 आत्महत्या नोंदविल्या आहेत. सन 2008-2009 मध्ये 3802 शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या असून सरकारच्या रिपोर्टमध्ये 1605 आत्महत्या नोंदविल्या आहेत. अशा प्रकारे सन 2014 पर्यंत म्हणजे गेल्या 15 वर्षात 53275 शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या असून सरकारच्या रिपोर्टमध्ये 12 हजाराच्यावर एकही आत्महत्या नोंदविण्यात आलेली नाही. आघाडी सरकारने शेतकऱ्यांवर आरोप केले, तुम्ही दारु पिऊन मेला, तुम्ही बिमार होऊन मेला, तुम्ही आजारी होऊन मेला. अशा प्रकारे आघाडी सरकारने शेतकऱ्यांची थट्टा केली होती. ज्या आत्महत्या झालेल्या त्या आघाडी सरकारने गृहीत धरल्या नाहीत. सरकारी आकडेवारी कमी दाखवून 40 टक्के शेतकऱ्यांच्या विधवांना पैसे मिळाले नाहीत. यासाठी किती तरी वेळा विधवांनी रस्त्यावर येऊन आंदोलने केली आहेत. आत्महत्या करणाऱ्या शेतकऱ्यांबाबत आपणाला अशा प्रकारे प्रेम आहे काय ? आज तुम्हाला आठवते की, कर्जमाफी झाली पाहिजे. आत्महत्या केलेल्या शेतकऱ्यांच्या विधवांना पैसे दिले पाहिजेत असे या सभागृहात कोणीच का विषय मांडला नाही. त्यांच्या पाठीशी आपण उभे राहण्याचा का प्रयत्न केला नाही. शेतकऱ्यांच्या जखमांवर मीठ चोळण्याचा प्रयत्न का होत आहे.

महोदय, शेतकऱ्यांच्या आत्महत्येची खरी आकडेवारी बाहेर आलेली नाही. खरी आकडेवारी 53275 आहे, ही आकडेवारी मी तयार केलेली नाही. नागराज समितीने दिलेली ही आकडेवारी आहे. सन 2008 मध्ये कर्जमाफी देण्यात आली त्यावेळी या आकडेवारीचा आधार केंद्र सरकारने घेतलेला आहे. हे देखील आपणाला मान्य करावे लागेल. सरकारकडून आकडेवारी बरोबर येत नाही, शेतकऱ्यांच्या विधवांना पैसे दिले जात नाही. गेल्या 15 वर्षात शेतकऱ्यांच्या आत्महत्या आघाडी सरकारला दिसल्या नाहीत. त्यांना मदत करावी असे तुम्हाला वाटले नाही. आजच तुम्हाला त्यांचा पुळका का येत आहे. जे 15 वर्षात आपण केले नाहीत ते या सरकारने 9 महिन्यात

...3...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्रीमती शोभा फडणवीस..

करावे अशी आपण अपेक्षा का ठेवीत आहात. मागील सरकारने शेतकऱ्यांवर आरोप केले की, शेतकरी दारु पिऊन, बिमार होऊन, आजारी होऊन किंवा जुगार खेळून मेला. अशा पध्दतीने मागील सरकारने शेतकऱ्यांच्या जखमेवर मीठ चोळले आहे. आपण कधीही शेतकऱ्यांचा विचार केलेला नाही. शेतकऱ्यांवर खूप मोठ्या प्रमाणात मागील सरकारने अन्याय केलेला आहे. हे आपणाला मान्यच करावे लागेल. ....अडथळा... सभापती महोदय, प्रत्येक वेळेस माझ्याच भाषणात का अडथळा आणला जात आहे, विरोधी पक्ष नेते भाषण करताना आम्ही अडथळा आणला काय ? आम्हाला देखील अडथळा आणता आला असता, आम्हाला देखील आरोप करता आले असते.

श्री.अमरसिंह पंडित : सभापती महोदय, माझी हरकत आहे. सन्माननीय ज्येष्ठ सदस्या श्रीमती शोभाताई फडणवीस आता जे भाषण करीत आहेत, ते अशा अविर्भावात मांडत आहेत की, हा कर्जमाफीचा प्रस्ताव आम्ही का मांडला. हा प्रस्ताव आम्ही मांडून किती चूक केली. अशा अर्विभावात त्या बोलत आहेत. सन्माननीय सदस्यांना कर्जमाफीच्या प्रस्तावाला पाठिंबा द्यावयाचा नसेल तर त्यांनी नाही म्हणून सांगावे. त्यांचा आवेश असा आहे की, कर्जमाफीचा प्रस्ताव तुम्ही का मांडला. हा कर्जमाफीचा प्रस्ताव किती चुकीचा आहे. हे मांडण्याचा ते केविलवाना प्रयत्न करीत आहेत.

श्री.भाई गिरकर : सभापती महोदय, गेले साडेतीन दिवस शेतकऱ्यांच्या आत्महत्या, कर्जमाफी यावर गोंधळ घातला असे मी म्हणत नाही, परंतु विरोधी पक्षाच्या सदस्यांनी सभागृह बंद पाडले आहे. सत्ताधारी पक्षाचा देखील मंगळवारी प्रस्ताव होता. सभागृहाचे कामकाज विरोधी पक्षाने चालू न दिल्यामुळे आमचा प्रस्ताव सभागृहात मांडता आला नाही. आता माननीय सभापती यांनी दोन्ही प्रस्ताव एकत्र केले आहेत. माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी प्रस्ताव मांडला आहे. त्यांनी भाषण करतांना पाप केले, या सरकारचा पायगुण बरोबर नाही, हे त्यांचे म्हणणे आम्ही ऐकून घेतले. त्यांच्या भाषणात आम्ही अडथळा आणला नाही. ते संपूर्ण अंधश्रध्देचे विषय मांडत होते. आम्ही श्रध्दावान असल्यामुळे त्यांचे भाषण शांतपणे ऐकून घेतले. सन्माननीय सदस्या गेल्या 50 वर्षाचा विषय मांडत नाहीत. गेल्या पाच वर्षात काय झाले व पुढील काळात आत्महत्या होऊ नयेत, त्यासाठी कायमस्वरूपी काय उपाययोजना करावी लागेल, अगोदर ज्या चुका झाल्या आहेत त्या पुन्हा होऊ नयेत, यासाठी सरकारने कोणती कामे करावित, काय नियोजन करावे, त्यातून

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.भाई गिरकर....

महाराष्ट्रात एकही आत्महत्या होणार नाही. कर्जमुक्ती करताना ज्या गोष्टींची आवश्यकता आहे. ते सरकारने करावे याबाबत ते विषय मांडत आहेत, हे मांडत असताना अगोदर काय उणिवा होत्या त्या मांडणे आवश्यक आहेत. कारण या सरकारने पुन्हा ती चूक करु नये. म्हणून त्या विषय मांडत आहेत, सन्माननीय सदस्यांच्या भाषणात कृपया अडथळा आणू नये अशी माझी विनंती आहे.

श्री.हेमंत टकले : सभापती महोदय, हे दोन्ही प्रस्ताव एकत्र करुन आपण भाषण करीत आहात. आपण वादासाठी हे मान्य केले की, गेल्या 15 वर्षात असंख्य चुका झाल्या आहेत. चुकीचे निर्णय असंख्य झाले, त्यामुळे काहीच साध्य झाले नाही. एक वेळ आर्ग्युमेंट म्हणून ते मान्य करू. आम्ही आता जे बोलत आहोत ते गेल्या सात ते आठ महिन्यात सुरु आहे. त्या बाबत तातडीने दुरूस्ती व्हावी. गेल्या 15 वर्षातील आत्महत्याचे आकडे खरे खोटे किंवा गेल्या आठ ते नऊ महिन्यातील आत्महत्यांचे आकडे त्यामुळे उद्‌भवलेली परिस्थिती, त्यातून काढावयाचा मार्ग आणि दीर्घकालीन योजना आणि तत्कालीक करावयाच्या उपाययोजना, आमचा सर्वांचा भर आज जो शेतकरी संकटात आहे, तो आत्महत्येला प्रवृत्त होत आहे, त्याला बाहेर काढण्यासाठी शासनाने तातडीने पावले उचलावीत व कर्जमुक्ती करावी एवढा एकच विषय आहे. मागील सर्व गोष्टी गृहीत धरल्या तरी आता शासनाने काय करावयास पाहिजे. अशा प्रकारच्या भाषणाची आपणाकडून अपेक्षा आहे. आपण वरिष्ठ सन्माननीय सदस्या आहात, आपण खूप अनुभवी आहात, आपण स्वतः शेतकरी आहात, आपण विदर्भातील आहात, आपण विदर्भाच्या प्रश्नासाठी कायम भांडत असतात. त्यामुळे निदान तुमच्याकडून तरी तातडीने काय उपाययोजना करावयाच्या आहेत. कर्जमुक्ती केल्यावर शासनाने कोणती सावधगिरी बाळगावी. अशा प्रकारे तुम्ही वरिष्ठ म्हणून या शासनाला मार्गदर्शन करावयाचे आहे. आपण परत पूर्वीच्या मार्गाने जाऊन मागील सरकारने काय केले याचा इतिहास सांगत असाल तर यामध्ये 100 टक्के वादविवाद होणार आहेत. मागचे सर्व विसरा व पुढे कोणते पाऊल टाकावयाचे आहे, त्याबाबत मार्गदर्शन करा एवढीच मी विनंती करतो.

श्रीमती शोभा फडणवीस : सभापती महोदय, मी बोलले तर आरोप होतात, सकाळपासून 9 महिन्याच्या सरकारच्या काळात 9 किंवा 15 शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या असे म्हटले जाते तर हे आरोप नाहीत काय ? यवतमाळच्या बाबतीत खोटे बोलून दिशाभूल करण्याचा प्रयत्न केला हा

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

16-07-2015 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) N-5

VVK/ KTG/ प्रथम श्री.बोरले... 16:00

श्रीमती शोभा फडणवीस..

आरोप नाही काय ? मी केले ते आरोप आणि यांनी केले तर ते कौतुक आहे काय ? माझ्या बोलण्यात अडथळा आणू नका, तुम्हाला बोलण्याचा अधिकारी आहे, आणखी बरेच सन्माननीय सदस्य बोलणार आहेत. सन्माननीय सदस्य श्री.माणिकराव ठाकरे अजून बोलावयाचे आहेत. त्यामुळे माझ्या भाषणात कृपा करुन अडथळा आणू नका. माझे भाषण ऐकून घेण्याची तयारी ठेवा. आम्ही सरकारला दिशा देण्याचा प्रयत्न करीत आहोत. मागील सरकारने ज्या चुका केल्या आहेत त्या चुका नवीन सरकारने करु नयेत. यासाठी आम्ही मार्गदर्शन करणार आहोत. आता ते तुम्हाला मार्गदर्शन वाटत नसेल, ते तुम्हाला आरोप वाटत असतील, याबाबत माझा काहीही दोष नाही. त्यामुळे मला माझे भाषण शांतपणे करु द्यावे.

या नंतर श्री.भोगले....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्रीमती शोभा फडणवीस.....

सभापती महोदय, खऱ्या अर्थाने लोकांना काय पाहिजे याचा निर्णय शासन घेणार आहे. जनतेच्या मागणीप्रमाणे त्यांना मदत दिली जाणार आहे. कोणी म्हटले म्हणून आम्ही कर्जमाफी करणार नाही. शेतकऱ्यांना काय पाहिजे? त्यांना कर्जमाफी हवी असेल तर त्याबाबत विचार केला जाईल. त्यांना सिंचनाचे प्रकल्प हवे असतील तर त्याबाबत विचार केला जाईल. शेतीसाठी आवश्यक असलेली अवजारे हवी असतील तर त्याबाबत विचार केला जाईल. जनतेचा विचार आमच्या डोळयासमोर आहे. त्यानुसार विकासाची दिशा ठरविली जाणार आहे, हे मान्य करावे लागेल.

सभापती महोदय, आघाडी शासनाच्या काळात कर्जमाफी म्हणून महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेला 6208 कोटी रुपये दिले गेले. ही आकडेवारी सरकारने जाहीर केली आहे. एकूण 26,06,346 शेतकऱ्यांना कर्जमाफी देण्याचा प्रयत्न केला गेला. तेवढेच शेतकरी राज्यात आहेत का? विरोधी पक्षनेत्यांनी 150 लाख शेतकरी असल्याचे सांगितले. 150 लाख शेतकऱ्यांपैकी 26 लाख शेतकऱ्यांना कर्जमाफीचा लाभ देण्यात आला. त्यासाठी 2849, 99, 82, 749 कोटी रुपयांचे वाटप करण्यात आले. जे अपात्र शेतकरी आहेत त्यांच्याकडूनही रक्कम वसूल करण्यात आली. 25,96,48,238 कोटी रुपये अपात्र शेतकऱ्यांकडून वसूल केले आहेत. कर्जमाफीसाठी शासनाकडून 6208 कोटी रुपये प्राप्त झाले असताना 2849 कोटी रुपये वाटण्यात आले. उर्वरित निधी कुठे गेला? 3358 कोटी रुपयांचा हिशोब महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेकडून घेण्याची आवश्यकता आहे, अशी मी शासनाला विनंती करते.

6208 कोटी रुपये मिळाले असताना पूर्ण रक्कम का वाटली गेली नाही, शेतकऱ्यांचा 7/12 कोरा का केला नाही? पश्चिम विदर्भात 2-5 हजार रुपये देऊन शेतकऱ्यांच्या तोंडाला पाने पुसली गेली. मराठवाड्याला खूप कमी रक्कम मिळाली आहे. अन्याय होत असेल तर तो सहन करण्याची भूमिका घेऊ नये. आपण शेतकऱ्यांचे प्रतिनिधी आहोत. जनतेचे प्रतिनिधी आहोत. त्यांच्याकरिता काम करावयाचे असेल तर अन्याय पचविण्यापेक्षा समोर येऊन अन्यायाचा विरोध करणे याला माणुसकी म्हटले जाते. 3358 कोटी रुपयांबद्दल सहकार मंत्र्यांनी महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेकडे विचारणा करावी. स्वत:चे कर्ज वसूल करण्यासाठी या निधीचा उपयोग केला

...2...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्रीमती शोभा फडणवीस....

गेला, शेतकऱ्यांना पैसे दिले गेले नाहीत असा माझा आरोप आहे. या संदर्भात चौकशी करुन त्याचा अहवाल सभागृहाला देण्यात यावा अशी मी विनंती करणार आहे.

सभापती महोदय, राज्यावर 3 लाख कोटी रुपयांचे कर्ज आहे असे म्हटले जाते. 30 हजार कोटी रुपयांचे व्याज द्यावे लागते याची चिंता करण्याची गरज आहे. हे कर्ज तुमच्या माझ यावर नसून सर्वसामान्य माणसांवर कर्ज लादले गेले आहे. ज्यांचा याच्याशी काही संबंध नाही. त्याचा विचार करण्याची गरज आहे. देशाचा, राज्याचा विकास झाला पाहिजे, विकासासाठी कर्ज काढले पाहिजे, या मताची मी आहे. हे करीत असताना तो निधी सत्कारणी लागावा एवढेच आमचे म्हणणे आहे.

सभापती महोदय, शेतकऱ्यांना सिंचनाचे प्रकल्प, कर्ज, व्याज माफी, उत्पन्नावर आधारित शेतमालाला भाव, विहिरीवर पंप बसवून 24 तास वीज उपलब्ध करुन देऊ शकलो तर शेतकऱ्यांच्या आत्महत्या थांबतील. शेतकरी आत्महत्या का करतात याचा शोध घेण्यासाठी समिती स्थापन करावी आणि सर्व शेतकऱ्यांच्या घरी जाऊन प्रत्यक्षात चौकशी करावी, त्यांना काय हवे आहे हे मिळवून देण्यासाठी, त्यांच्या भावना लक्षात घेण्याची गरज आहे.

सभापती महोदय, विम्याच्या बाबतीत या ठिकाणी बोलले गेले. हवामानाचे कारण दाखवून विम्याचा लाभ देण्यास टाळाटाळ केली जाते. प्रत्येक वेळेला उंबरठा उत्पन्नाचे कारण सांगितले जाते, त्यामुळे आम्हाला आणेवारीचा फायदा मिळत नाही. आम्ही फक्त विम्याचे हप्ते भरायचे, आम्हाला प्रत्यक्षात विमा कंपनीकडून नुकसान भरपाई मिळत नाही. यंदा पहिल्याच वर्षी आम्हाला विम्याचा लाभ मिळत आहे. गेल्या 10 वर्षात कधी विम्याचा लाभ मिळाला नाही. म्हणून विमा योजनेच्या निकषामध्ये बदल करावा आणि शेतकऱ्यांना न्याय देण्याकरिता विचार करावा. राज्य सहकारी बँकेकडे जो निधी शिल्लक आहे त्यातून शेतकऱ्यांना आर्थिक सहाय्य देता येईल का याचा विचार करावा एवढे सांगून मी माझे भाषण पूर्ण करते. जय हिंद, जय महाराष्ट्र, जय विदर्भ.

--------------

...3..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.माणिकराव ठाकरे (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, राज्यातील शेतकऱ्यांच्या कर्जमाफीच्या संदर्भात जो प्रस्ताव माननीय विरोधी पक्षनेत्यांनी सदनामध्ये मांडला आहे त्यावर माझे विचार मांडण्यासाठी मी या ठिकाणी उभा आहे.

सभापती महोदय, शेतकऱ्यांना कर्जमाफी देण्याच्या संदर्भातील हा प्रस्ताव आहे. कर्जमाफीची आवश्यकता का आहे हे मी सांगण्याचा प्रयत्न करणार आहे. शेतीमधील सुधारणेच्या संदर्भात सभागृहात वेगळी चर्चा होऊ शकते. भविष्यात कशा प्रकारची योजना हाती घेतल्यास शेतकऱ्यांची आर्थिक परिस्थिती सुधारेल यावर चर्चा होऊ शकते. परंतु आज राज्यामध्ये शेतकऱ्यांची जी आर्थिक परिस्थिती निर्माण झाली आहे त्यामुळे शेतकरी हवालदिल झाला असून त्यातून आत्महत्या करण्यास प्रवृत्त होत आहे. हे शेतकऱ्यांच्या आत्महत्येचे सत्र थांबविण्यासाठी कर्जमाफीची आवश्यकता आहे. शासनाने या प्रस्तावाच्या माध्यमातून शेतकऱ्यांचे कर्ज माफ करुन त्यांना दिलासा देण्याचा प्रयत्न करावा, जेणेकरुन या प्रश्नावर मार्ग निघू शकतो. जी अपेक्षा विरोधी पक्षातील सदस्यांना आहे तीच अपेक्षा सत्तारुढ पक्षातील माननीय सदस्यांना देखील असावी, याबद्दल दुमत असण्याचे कारण नाही. शासनाने या प्रश्नाच्या अनुषंगाने वेगवेगळ्या अधिकाऱ्यांकडून अहवाल मागविले. त्या अहवालांमध्ये कर्जमाफी ही प्रमुख शिफारस केलेली आहे, याची आम्हाला माहिती आहे आणि शासनाला सुध्दा आहे. कर्जमाफी जाहीर करण्याच्या दृष्टीने शासनाने जो विचार समोर ठेवला पाहिजे त्याकडे का दुर्लक्ष होत आहे हे आम्हाला कळून येत नाही. राज्यातील शेतकऱ्यांवर ज्या ज्यावेळी नैसर्गिक आपत्ती येते त्या त्यावेळी शासनाच्या वतीने शेतकऱ्यांना मदत दिली जाते.

नंतर पी.1...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.माणिकराव ठाकरे....

शासन म्हणून लाँग टर्म प्रोग्रॅम आपल्याला सुरू ठेवावे लागतात. त्यातून नवनवीन कल्पना पुढे येतात व नवनवीन उपाययोजना करण्याचा शासनातर्फे प्रयत्न करण्यात येतो. कोणत्याही पक्षाचे शासन असले तरी त्यावर विचार करून पावले टाकावी लागतातच. राज्यातील शेतकऱ्यांची परिस्थिती ढासळली आणि शेतकऱ्यांचे आत्महत्या करण्याचे सत्र मोठ्या प्रमाणावर सुरू झाले तर त्यावर तात्काळ उपाययोजना करण्याची जबाबदारी राज्या शासनाची आहे. तशी परिस्थिती आज राज्यामध्ये निर्माण झाली आहे. सन्माननीय सदस्या श्रीमती शोभाताई फडणवीस यांनी सांगितले की, आज शेतकरी पाणी मागतो आहे, शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढावे म्हणून शेतकरी शेतीमध्ये सुधारणा मागतो आहे. हे बरोबर आहे. माझ्याकडे उदाहरणांची जंत्रीच आहे. पण मी येथे एक-दोन निवडक उदाहरणे आपल्याला देणार आहे. यवतमाळ जिल्ह्यातील पांढरकवडा या तालुक्यातील घोडदरी या गावातील श्री.माधव गोडे नावाच्या एका शेतकऱ्याने आत्महत्या केली. त्याने आत्महत्या करण्यापूर्वी चिठ्ठीत लिहिले होते की, कर्जमाफी मिळत नसल्यामुळे मी आत्महत्या करीत आहे. त्याने चिठ्ठीत असे लिहिले होते की, मी दोन महिने आधीच आत्महत्या केली असती. पण हे सरकार कर्ज माफी करेल या आशेवर मी जीवंत राहिलो. परंतु, आता कर्ज माफी मिळण्याची आशा संपली आहे. या सरकारने आम्ही कर्ज माफी देऊ शकत नाही अशा प्रकारचे विधान केले आहे. त्यामुळे माझ्यामध्ये नैराश्य आले आहे म्हणून मी आत्महत्या करीत आहे. तशा प्रकारचा स्पष्ट उल्लेख त्याच्या चिठ्ठीमध्ये होता.

..2

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**एबीपी माझा या दूरचित्रवाहिनीवरील महिला पत्रकारावर**
**सांताक्रूझ, वाकोला येथे झालेला जीवघेणा हल्ला**

श्री.धनंजय मुंडे : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे. सांताक्रूझ, वाकोला पोलीस ठाण्याच्या हद्दीत एबीपी माझा या दूरचित्रवाहिनीवरील श्रीमती मनश्री पाठक नावाच्या एका महिला वार्ताहारावर जीव घेणा हल्ला झालेला आहे. या अधिवेशनाच्या अगोदर राज्यातील सर्व पत्रकारांनी या सदनावर मोर्चा काढला होता. त्यांनी मोर्चा काढून पत्रकारांच्या संरक्षणासाठी कायदा व्हावा अशी मागणी केली होती. महाराष्ट्रामध्ये अशा प्रकारच्या अनेक घटना पत्रकारांवर होत आहेत. एका महिला पत्रकारावर हल्ला करण्यात आला आहे. लोकशाहीतील चौथा स्तंभ म्हणून आपण पत्रकारितेकडे पाहतो. हा स्तंभच आज धोक्यात येत असेल तर ती एक गंभीर बाब आहे. सदनाचे कामकाज सुरू असताना एका माध्यमाच्या महिला पत्रकारावर जीवघेणा हल्ला तेथील गुंडांकडून होणे ही कायदा व सुव्यवस्थेच्या दृष्टीने लाजीरवाणी बाब आहे. तेव्हा यासंबंधी सरकारने निवेदन करावे अशी माझी मागणी आहे.

श्रीमती पंकजा मुंडे : सभापती महोदय, या विषयाची विस्तृत माहिती घेऊन सभागृहाचे आजचे कामकाज तहकूब होण्याच्या आधी शासनातर्फे निवेदन करण्यात येईल.

....



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी.:** राज्यात सरासरीपेक्षा कमी पाऊस झाल्याने भूजल पातळीत कमालीची घट होऊन दुबार पेरणीचे निर्माण झालेले संकट

**मु.शी.:** राज्यात सरासरीपेक्षा कमी पाऊस झाल्याने भूजल पातळीत कमालीची घट होऊन दुबार पेरणीचे निर्माण झालेले संकट या विषयावर सर्वश्री धनंजय मुंडे, माणिकराव ठाकरे, सुनील तटकरे, अमरसिंह पंडित, संजय दत्त, हेमंत टकले, भाई जगताप, जयंतवराव जाधव, जयंत पाटील, शरद रणपिसे, कपिल पाटील, वि.प.स. यांचा प्रस्ताव

(चर्चा पुढे सुरु.......

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.माणिकराव ठाकरे : सभापती महोदय, कर्ज माफी का करावी यासंबंधी शेतकऱ्यांच्या बोलक्या प्रतिक्रिया आहेत. आज शेतकरी आत्महत्या करीत असल्यामुळे कर्ज माफी करण्याची गरज निर्माण झाली आहे हे लक्षात आणणे गरजेचे आहे. मी आपल्याला अमरावती जिल्ह्यातील मोर्शी तालुक्याचे उदाहरण देणार आहे. शेतकऱ्यांच्या कर्जाचे पुनर्गठन करण्यासंबंधातील धोरण शासनाने जाहीर केले होते. तो शेतकरी महाराष्ट्र बँकेमध्ये गेला. त्या शेतकऱ्याने माझ्या कर्जाचे पुनर्गठन करून द्यावे अशा प्रकारची मागणी केली. परंतु, त्यास सांगण्यात आले की, पुनर्गठन होऊ शकणार नाही. अद्याप पर्यंत आम्हाला लेखी आदेश प्राप्त झालेले नाहीत. त्या शेतकऱ्याला शीवगाळी करण्यात आली. त्याला बाहेर हाकलून देण्यात आले. त्या शेतकऱ्याने चिठ्ठीमध्ये उल्लेख केला आहे की, पुनर्गठनासंबंधी मी बँकेत गेलो असताना माझा अपमान झाला आहे. माझा अपमान सहन न झाल्यामुळे मी आत्महत्या करीत आहे. या घटना बोलक्या आहेत. माननीय मुख्यमंत्री यवतमाळ जिल्ह्यातील पिंपरी-बुटी या गावातील आत्महत्याग्रस्त शेतकऱ्याच्या घरी गेले होते. महाराष्ट्रातील एकाच गावामध्ये ते गेले व तेथे त्यांनी मुक्काम देखील केला. ते आत्महत्याग्रस्त शेतकऱ्याच्या घरी गेले व त्या शेतकऱ्याची पत्नी श्रीमती शांताबाई ताजने यांना भेटले. या गावाची लोकसंख्या 1700 एवढीच आहे. या गावात 11 शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या. माननीय मुख्यमंत्र्यांनी सांगितले की, राज्यातील सर्व शेतकऱ्यांच्या पाठीशी शासन उभे आहे. कोणीही आत्महत्याक करू नये. ज्या घरात जाऊन माननीय मुख्यमंत्र्यांनी दिलासा देण्याचे काम केले त्या शेतकऱ्याच्या पत्नीने सुद्धा तीन महिन्यामध्ये कोणीही अधिकारी, लोकप्रतिनिधी न गेल्यामुळे आत्महत्या केली. त्या गावाला कोणीही मार्गदर्शन किंवा मदत केलेली नाही. तेथील स्थानिक लोकप्रतिनिधींनी किंवा माननीय मंत्र्यांनी या गावात जाऊन माननीय मुख्यमंत्र्यांनी आम्हाला आपणास मदत करायला सांगितले आहे असे

..4

श्री.माणिकराव ठाकरे....

देखील सांगायला गेले नाही. त्या गावाला मदत करण्यासाठी कोणीही गेलेले नाही. त्यामुळे त्या गावात सुद्धा आत्महत्या झालेली आहे.

सभापती महोदय, या देशाचे पंतप्रधान यवतमाळ जिल्ह्यातील आर्णी तालुक्यातील एका गावामध्ये गेले होते. माननीय पंतप्रधान गेल्या नंतर त्या गावात दोन महिन्यामध्ये तीन शेतकऱ्यांनी आत्महत्या केलेल्या आहेत. शासन शेतकऱ्यांना दिलासा देण्यामध्ये समर्थ ठरलेले आहे काय ? शासनाकडून मदत मिळणार आहे त्यामुळे आत्महत्या करण्याची गरज नाही असा दिलासा देण्यामध्ये आपण कमी पडलेला आहात. आज राज्यात जी परिस्थिती निर्माण झाली आहे ती साधारण परिस्थिती नाही.

सुरुवातीला माननीय मुख्यमंत्र्यांनी 19 हजार गावे दुष्काळग्रस्त असल्याचे जाहीर केले. त्यानंतर त्यांनी सांगितले की, 25 हजार गावे दुष्काळग्रस्त आहेत. यापूर्वी आपल्या राज्यावर एवढ्या मोठ्या संख्येने कधीही आपत्ती आली नव्हती. आपण इतिहास तपासून पहावा. अपुरा पाऊस, प्रचंड नापिकी यात शेतकरी होरपळला आहे. कधी नव्हे एवढे शे्ती मालाचे भाव कमी झाले आहेत. गारपीट, अवकाळी पावसाने सोयाबीन, कापूस या सारख्या पिकांची प्रचंड प्रमाणावर हानी झाली आहे. आज या सर्व पिकांचे भाव गडगडले आहेत. असे असताना शासनाच्यावतीने आधार देण्याचे काम कुठेही झालेले नाही. कांदा, धान या सारख्या पिकांना देखील चांगला भाव मिळाला नाही. मागच्या वर्षी धानाला 2700 ते 2800 रुपये प्रति क्विंटल भाव होता.

यानंतर श्री.जुन्नरे....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. माणिकराव ठाकरे .......

1000 रुपयांने धानाची किंमत कमी झाली असून कापासाची व सोयाबीनची किंमत सुध्दा कमी झालेली आहे. यवतमाळ येथे पंतप्रधांनानी "चाय पर" चर्चेमध्ये सांगितले होते की,"शेतकऱ्यांना 50 टक्के नफा मिळाला पाहिजे." सोयाबीनला भाव मिळत नसल्यामुळे शेतकरी आत्महत्या करीत आहेत. सोयाबीन तसेच कापसाचे दर वाढवून देण्याचे काम शासनाकडून झालेले नाही. कापूस उत्पादकाला हे सरकार दिलासा देऊ शकलेले नाही. केंद्रामध्ये कापसाला केवळ 50 रुपयांनी भाव वाढवून मिळला आहे. आज जी परिस्थिती राज्यावर ओढवली आहे तशी परिस्थिती या राज्यामध्ये कधीही आली नव्हती. 2009 च्या परिस्थितीपेक्षा या वर्षाची परिस्थिती गंभीर आहे. यासंदर्भातील आकडेवारी विरोधी पक्ष नेत्यांनी दिली असल्यामुळे ती आकडेवारी पुन्हा देऊन मी सभागृहाचा वेळ घेऊ इच्छित नाही.

सभापती महोदय, अमरावती जिल्हयातील उमरखेड तालुक्यातील एका 28 वर्षाच्या शेतकऱ्याने आत्महत्या केली आहे. या शेतकऱ्याने 40 हजार रुपयाचे कर्ज काढले होते परंतु त्या कर्जाचे पुनर्गठण न केल्यामुळे त्याने खाजगी सावकाराकडून कर्ज काढून बी-भरण करुन पेरणी केली होती. परंतु गेल्या 15 दिवसापासून पाऊस न पडल्यामुळे आता मला दुबार पेरणी करावी लागेल व त्यासाठी मी पैसा कोठून आणू या कारणामुळे 28 वर्षाच्या तरुणाने आत्महत्या केली. कालसुध्दा यवतमाळ जिल्हयात दोन शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या असून यापेक्षा अजून वेगळी परिस्थिती कोणती असू शकेल ? तुम्ही लॉंग टर्म् प्रोग्राम करा परंतु शेतकऱ्यांच्या आत्महत्या रोखण्यासाठी शासन म्हणून तुम्ही काही काम करणार आहात की, नाही ? या वर्षा सारखीच परिस्थिती दर वर्षी असते असे तुम्ही सांगत असाल तर सांगा. या सरकारला शेतकऱ्यांच्या अडचणीचे किती गांभीर्य आहे हे एकदा जनतेला कळू द्या. अडचणीत सापडलेल्या शेतकऱ्यासाठी आम्ही गाव शिवार योजना घेणार आहोत, शेतकऱ्यासाठी पाण्याची योजना करणार आहोत, तसेच शेतकऱ्याने शेती चांगली केली पाहिजे हे तत्वज्ञान या सदनात आपण सातत्याने करीत असतो. परंतु सरकारने आज खऱ्या अर्थाने शेतकऱ्यांच्या पाठीमागे उभे राहण्याची गरज आहे. शेतकरी प्रचंड प्रमाणात आत्महत्या करीत आहेत. पश्चिम विदर्भातील 5 जिल्हयात सर्वात जास्त आत्महत्या झालेल्या आहेत. पश्चिम विदर्भात जानेवारीपासून 31 मे पर्यंत 441 शेतकऱ्यांनी आत्महत्या केलेल्या

...2...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. माणिकराव ठाकरे .......

आहेत. मराठवाडयातील सात जिल्हयामध्ये 31 मे, पर्यंत 367 शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या आहेत. कापूस उत्पादक जो भाग आहे त्या भागातील शेतकरीच मोठया प्रमाणात आत्महत्या करीत असतात. "आत्महत्याचे तुम्ही राजकारण करु नका, शेतकऱ्यांच्या आत्महत्या होतच असतात" असे जा आपले म्हणणे असेल तर आम्हाला काही म्हणावयाचे नाही. परंतु या गंभीर प्रश्नाकडे अशा प्रकारे पाहून चालणार नाही एवढे मला या निमित्ताने सांगावयाचे आहे.

सभापती महोदय, पश्चिम विदर्भ, पश्चिम महाराष्ट्र, खान्देश,कोकण आणि मराठवाडा या भागामध्ये काय फरक आहे व त्या ठिकाणी आत्महत्या का होतात याचा विचार करण्याची आवश्यकता आहे. ज्या भागामध्ये कापूस मोठया प्रमाणात पिकवला जातो त्या भागामध्ये कापूस सोडून दुसरे कोणतेही शेतीचे उत्पन्न निघत नाही तसेच त्या ठिकाणी जोडधंदा सुध्दा निघू शकत नाही. या ठिकाणचे शेतकरी पूर्णपणे कापसाच्या पिकावर अवलंबून असतात. परंतु कापूस उत्पादक भागातील शेतकऱ्यांनी आता सोयाबीनची लागवड करण्यास सुरुवात केली आहे. या ठिकाणचा कापसाचा पेरा हळू हळू कमी होऊन येथील शेतकरी सोयाबीनकडे वळला गेला. काही कापूस उत्पादक जिल्हयामध्ये तर 55 ते 90 टक्के सोयाबीनची लागवड झालेली आहे. अशा परिस्थितीमध्ये तेथील शेतकऱ्यांच्या हातामध्ये सोयाबीनचे उत्पन्न आले नाही. मागच्या दोन तीन वर्षामध्ये झालेली नापिकी, अपुरा पडलेल्या पावसामुळे या ठिकाणचा शेतकरी अत्यंत अडचणीत सापडलेला आहे.

सभापती महोदय, या शेतकऱ्यांना आज बँकेमधून कर्ज मिळत नाही. दोन तीन वर्षाच्या नापिकीमुळे शेतकरी कर्ज भरु न शकल्यामुळे या वर्षी शेतकऱ्यांना बँकाकडून कर्ज उपलब्ध होऊ शकले नाही. जे खाजगी सावकार तारण ठेवून कर्ज देत होते त्यांनी सुध्दा आपला हात आखडता घेतला. शासनाने या ठिकाणी उल्लेख केला आहे की, आम्ही परवाना धारक सावकाराच्या माध्यमातून शेतकऱ्यांना कर्जमाफी देणार आहोत. परंतु शासनाची ही घोषणा सपशेल फेल ठरली आहे. नागपूर अधिवेशनामध्ये सरकारने उल्लेख केला होता की, खाजगी सावकाराच्या माध्यमातून शेतकऱ्यांनी जे कर्ज घेतले आहे त्यासाठी आम्ही 400 कोटी रुपयांची तरतूद केली आहे. मुंबई येथील बजेट अधिवेशन येईपर्यंत यासंदर्भातील जीआर सुध्दा निघाला नव्हता. परंतु बजेट

...3...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. माणिकराव ठाकरे .......

अधिवेशनामध्ये सन्माननीय सदस्यांनी विचारणा केल्यानंतर शासनाने गडबडीमध्ये जीआर काढून 194 रुपये लागतील असे सांगितले. शेतकऱ्याने सावकाराकडून घेतलेल्या एकाही कर्जाला सरकारने माफी दिलेली नाही. यवतमाळ जिल्हयातील गाठणजी येथे सोन्या-चांदीचा व्यवहार करणारे सावकार मोठया प्रमाणात आहेत. नागपूर येथे खाजगी सावकारीच्या संदर्भात शासनाने जी घोषणा केली होती ती योजना खाजगी सावकारांना लागू होत नसल्यामुळे त्यांनी बैठक घेतली होती. त्या बैठकीमध्ये त्यांचा काही निर्णय न झाल्यामुळे ते परवाना धारक सावकार माझ्या घरी आले. मी त्यांना विचारले की, गाठणजी येथे 23 खाजगी सावकार आहेत तुम्हाला शासनाकडून किती कर्ज माफी मिळाली ? तेव्हा त्यांनी सांगितले की, कर्जमाफीचा एक सुध्दा पैसा शेतकऱ्याना मिळाला नाही, मिळण्याची आशाही नाही. खाजगी सावकार शेतीसाठी कर्ज देऊ शकत नाही अशी अट आहे. खाजगी सावकाराकडून शासनाने फॉर्म भरुन मागितला आहे. त्यांनी सांगितले की, हा फॉर्म आम्ही भरुन दिला तर आम्हाला पहिल्या प्रथम जेलमध्ये जावे लागेल त्यानंतरच कर्जमाफीची घोषणा होऊ शकेल.

सभापती महोदय, काल मला उस्मानाबाद जिल्हयाचे जिल्हाधिकारी भेटले असता मी त्यांना विचारले की, तुमच्या जिल्हयातील शेतकरी मोठया प्रमाणात अडचणीत आहेत. शासनाने सावकारांच्या माध्यमातून खाजगी सावकाराची कर्ज माफी केली असल्यामुळे तुम्हाला खाजगी सावकारांच्या कर्जमाफीचे किती पैसे मिळाले ? त्यावर त्यांनी सांगितले की, "एकाही शेतकऱ्याला आम्ही एक पैसाही देऊ शकलो नाही." यामध्ये काही तांत्रिक अडचणी असतील तर त्या मला माहिती नाहीत. परंतु खाजगी सावकारांच्या माध्यमातून हे शासन कर्ज माफी देत आहे ती केवळ शेतकऱ्यांची भुलावणी आहे. चूक असेल तर ते आपण मान्य केले पाहिजे. हे जे काही झालेले आहे ते बरोबर झाले नाही असे आपण सांगितले पाहिजे. असे असताना चुकीचे समर्थन करण्यामध्ये तुमचा वेळ जातो आहे. खरे म्हणजे या प्रश्नाच्या संदर्भात शासनाने वेगवेगळया योजना निश्चितपणे योजल्या पाहिजेत. गावस्तरावर काही लोकांकडे पैसा आहे. असे लोक शेतकऱ्यांना कर्ज पुरवठा करीत असतात. परंतु कर्ज पुरवठा करणाऱ्या सावकाराने कर्ज पुरवठा करण्यासाठी व्यवस्था निर्माण करण्याची आवश्यकता आहे.

यानंतर श्री. अजित.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**( सभापतीस्थानी तालिका सभापती प्रा.जनार्दन चांदूरकर )**

श्री.माणिकराव ठाकरे...

सभापती महोदय, नॉन बँकींगच्या संदर्भात रिझर्व्ह बँकेची काही व्यवस्था आहे. त्याप्रमाणे गावातील छोट्या-मोठ्या सावकारांनी कंपनी स्थापून या कंपनीमार्फत शेतकऱ्यांना कर्ज पुरवठा करता येईल. शासनाने ही व्यवस्था विचारात घेतली तर भविष्यकाळात ग्रामीण स्तरावर शेतकऱ्यांना कर्जाच्या संदर्भात दिलासा मिळू शकेल. शासन असा कार्यक्रम हातामध्ये घेऊ शकतो.

सभापती महोदय, शेतकऱ्यांना कर्जमाफी मिळावी यासाठी काँग्रेस पक्षाकडून जिल्ह्याजिल्ह्यामध्ये मोर्चे काढण्यात आले आणि या मोर्चास शेतकऱ्यांचा प्रचंड प्रतिसाद मिळाला. या मोर्चात शेतकरी मोठ्या प्रमाणात सहभागी होत आहेत. आपले कर्ज कशाप्रकारे माफ होईल याकडे सर्व शेतकऱ्यांचे लक्ष लागलेले आहे. त्यामुळे या संदर्भात शासनाने अत्यंत गांभीर्याने लक्ष देण्याची गरज आहे. हा राजकारणाचा विषय नाही. शेतकऱ्यांना न्याय देण्याच्या दृष्टीकोनातून सत्तारूढ पक्षाचा आणि विरोधी पक्षाचा प्रयत्न असतो. पण आम्हाला एखादी बाब करायची नाही असे म्हणून चालणार नाही. शेतकऱ्यांचे कर्ज माफ केले पाहिजे अशी विरोधी पक्षातील सदस्य मागणी करीत आहेत. परंतु सत्तारूढ पक्षातील शिवसेना पक्षाच्या नेतृत्त्वाने आणि त्यांच्या पक्षातील सन्माननीय सदस्यांनी देखील ही मागणी करण्यास सुरुवात केली आहे. भारतीय जनता पक्षालासुद्धा त्यांच्या सन्माननीय सदस्यांना सांभाळून ठेवण्याची गरज निर्माण झाली आहे. त्यांना रोज आमदारांची मिटींग घेऊन सर्वांनी एकत्र रहावे असे सांगावे लागत आहे. कर्जमाफीच्या संदर्भात आज सर्वांच्या भावना एकवटलेल्या आहेत. मग विरोधी पक्षातील आमदार असोत की सत्ताधारी पक्षातील आमदार असोत, भाषणाचा समारोप करताना आम्ही शेतकऱ्यांतून निवडून आलो आहोत तेव्हा त्यांचा विचार करावा असे सांगत आहेत. आपण शेतकऱ्यांना त्यांच्या आजच्या परिस्थितीत मदत केली नाही तर आम्हाला उद्या कोण मतदार करेल ही भीती सत्तारूढ पक्षातील सदस्यांना आहे. या ठिकाणी सहकार मंत्री माननीय श्री. चंद्रकांत पाटील उपस्थित आहेत. आपला पक्ष केंद्रात आणि राज्यात सत्तेवर आहे. विरोधी पक्ष जेव्हा सत्तेवर येतो तेव्हा त्यांच्याकडून लोकांच्या फार अपेक्षा असतात.

..2..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.माणिकराव ठाकरे....

आता सत्तेवर असलेल्या पक्षातील सदस्यांनी विरोधी पक्षात असताना शेतकऱ्यांच्या आत्महत्येची जबाबदारी शासनावर टाका, सरकारला फासावर चढवा अशी भाषणे केली होती. परंतु आता त्यांच्यावर जबाबदारी आली आहे. जनतेने मोठ्या विश्वासाने तुम्हाला सत्तेवर बसविले आहे. त्या जनतेच्या विश्वासास पात्र ठरण्याच्या दृष्टीकोनातून तशा प्रकारची पावले टाकणे गरजेचे आहे. आज राज्यातील शेतकऱ्यांची काय अवस्था आहे हे मी सरकारला सांगण्याची गरज नाही. सरकारने त्यांच्या पक्षातील आमदारांची बैठक घेऊन त्यांच्याकडून माहिती घ्यावी. आज राज्यातील शेतकरी काय म्हणत आहेत, आपण कशा प्रकारे पावले टाकली पाहिजेत हे जाणून घ्यावे. आम्ही म्हणतो म्हणून करु नका तर आपल्या पक्षाच्या सदस्यांकडून देखील माहिती घ्यावी.

सभापती महोदय, या ठिकाणी सन्माननीय सदस्या श्रीमती शोभाताई फडणवीस यांनी सांगितले की, विरोधी पक्षाने काहीही सांगितले म्हणून आम्ही तसेच का केले पाहिजे, आमच्या देखील कल्पना असू शकतात. आपल्या कल्पना आहेत ही चांगली बाब आहे. आपल्या पक्षाने जलयुक्त शिवार ही चांगली योजना आणली आहे. योजना चांगल्याच असतात. या योजना पूर्वीपासूनच्या आहेत फक्त त्याची नावे बदलली आहेत. वसंत बंधारे पासून कोल्हापुरी बंधारे, पाणी अडवा पाणी जिरवा, अशी अनेक नावे देण्यात आली. हे कदाचित नववे नाव असेल. ही नावे वेगवेगळी असली तरी कार्यक्रम एकच आहे. शिरपूर बंधारे पॅटर्न आला. तो पॅटर्न इतर भागात लागू केला होता. आपण त्या योजना पुढे चालवीत आहात ही चांगली गोष्ट आहे. जमिनीत पाणी साठविणे हे भविष्याच्या दृष्टीने अतिशय महत्वाचे आहे.

सभापती महोदय, यापूर्वी दोनवेळा शेतकऱ्यांची कर्जमाफी झाली. सन 1982 च्या सुमारास तत्कालीन मुख्यमंत्री बॅ.अे.आर.अंतुले यांनी शेतकऱ्यांची कर्जमाफी केली होती. या कर्जमाफीचा फायदा 23 लाख शेतकऱ्यांना झाला होता. त्यांनी पाच एकरच्या आतील शेतकऱ्यांचे कर्जमाफ केले होते. त्यानंतर सन 2009 मध्ये शेतकऱ्यांचे कर्जमाफ करण्यात आले. सन 2009 मध्ये केंद्राने प्रथमच संपूर्ण कर्जमाफी केली होती. त्यावेळी जवळपास 71 हजार कोटी रुपयांची कर्जमाफी केली होती. संपूर्ण कर्जमाफी याच नावाखाली कर्जमाफी करण्यात आली होती. सर्व शेतकऱ्यांना त्याचा लाभ मिळाला होता.

..3..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.माणिकराव ठाकरे....

सभापती महोदय, माननीय सहकार मंत्री श्री.चंद्रकांत पाटील यांनी काल असा उल्लेख केला की, मी कर्जाच्या संदर्भात सांगितलेला आकडा बरोबर नाही. पण मी कालच जिल्हा बँकेला पत्र देऊन त्यांच्याकडून माहिती घेतली. शेतकऱ्यांना 50 टक्के कर्ज राष्ट्रीयकृत बँकेकडून मिळते तर 50 टक्के कर्ज जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेकडून मिळते. या ठिकाणी सांगण्यात आले की, या कर्जमाफीचा फायदा बँकांना होतो. परंतु तशी वस्तुस्थिती नाही. बँकेला फायदा होण्याचा प्रश्नच येत नाही. कारण शेतकऱ्यांच्या 7/12 उताऱ्यावर कर्ज असेल तेच कर्ज माफ होईल. तेव्हा कोणते कर्ज माफ झाले, कोणते कर्ज माफ झाले नाही हा संशोधनचा विषय आहे. परंतु या कर्जमाफीमुळे बँकांचा फायदा होतो असे मत बनवून घेतले जात आहे, त्यामध्ये दुरुस्ती होण्याची गरज आहे.

सभापती महोदय, सन 2005-2006 मध्ये शेतकऱ्यांना जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या माध्यमातून 133 कोटी रुपयांचे कर्ज वितरित करण्यात आले होते. सन 2008-2009 मध्ये जिल्हा बँकेने 186 कोटी रुपयांचे कर्ज वितरित केले होते. सन 2009-2010 मध्ये शेतकऱ्यांना 510 कोटी रुपयांची कर्जमाफी देण्यात आली. त्यानंतर सन 2010-2011 मध्ये 470 कोटी रुपये, सन 2011-2012 मध्ये 436 कोटी रुपये, सन 2012-203 मध्ये 458 कोटी रुपयांचे कर्जमाफ करण्यात आले. सन 2005-2006 मध्ये शेतकऱ्यांना 133 कोटी रुपयांचे कर्ज वाटप करण्यात आले होते परंतु त्यानंतरच्या काळात जवळपास दुप्पट-तिप्पट कर्ज बँकेने दिल्याचे दिसते. यावेळी आपण शेतकऱ्यांना कर्जमाफी दिली तर मागील तीन वर्षापासून म्हणजे सन 2011-2012, 2012-2013 आणि 2013-2014 या वर्षातील थकीत कर्ज माफ व्हावयास पाहिजे. आपण ही कर्जमाफी केली तर हे सर्व शेतकरी मुख्य प्रवाहामध्ये येणार आहेत. अन्यथा राज्यात शेतकऱ्यांची जेवढी संख्या आहे त्यातील 25 टक्के शेतकऱ्यांकडे थकीत कर्ज असल्यामुळे त्यांना बँकेकडून कर्ज मिळत नाही.

यानंतर श्री.बोर्डे...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.माणिकराव ठाकरे....

सर्वच शेतकरी कर्ज उचलतात असे नाही. 25 टक्के शेतकरी कर्ज उचलत नाहीत. मागची आकडेवारी पाहिली तर 75 ते 80 टक्के शेतकरी कर्ज उचलतात. परंतु आज केवळ 20 ते 25 टक्के शेतकऱ्यांना कर्ज देतो. याचाच अर्थ जवळजवळ 50 ते 60 टक्के शेतकरी कर्जापासून वंचित राहतात, कर्जमाफीपासून वंचित राहतात. त्यामुळे विशेषतः सोयाबीन व कापूस उत्पादक भागाता मोठ्या प्रमाणावर आत्महत्या होत आहेत. या भागातील शेतकऱ्यांना दिलासा मिळण्यासाठी त्यांना मदत केली नाही किंवा त्यांना कर्जमाफी दिली नाही तर त्या भागातील परिस्थिती अधिकच भयंकर होईल. अधिवेशनामध्ये विरोधी पक्षाकडून मागणी होईपर्यंत सरकारने थांबून राहणे योग्य नाही. या ठिकाणी क्रेडिट कोणी घ्यावे हा विषय नाही. 2008-09 मध्ये विरोधी पक्षाने सुध्दा कर्जमाफीची मागणी केली होती. केंद्र सरकारने कर्जमाफीचा निर्णय घेतल्यानंतर सर्वजण हेच म्हणतात की, 2008-09 मध्ये युपीए सरकारने शेतकऱ्यांचे कर्ज माफ केले. त्यामुळे आज राज्य शासनाने कर्जमाफी केली याचा अर्थ विरोधकांना क्रेडिट मिळेल असे नाही. आपल्यावर आपत्ती आल्यामुळे, आपल्याला दिलासा देण्याच्या दृष्टिकोनातून शासनाने कर्जमाफी केली असा अर्थ शेतकरी बांधव काढतील. त्यामुळे या विषयामध्ये पक्षीय राजकारण न करता, सरकार म्हणून जबाबदारी स्वीकारून संपूर्ण शेतकऱ्यांचे कर्ज माफ करण्याची भूमिका शासनाने घ्यावी, अशी मी विनंती करतो. या प्रस्तावावरील चर्चेला माननीय मुख्यमंत्र्यांकडून उत्तर मिळेल. परंतु त्यांनी सुध्दा उत्तर देताना स्पष्ट भूमिका घ्यावी की, शेतकऱ्यांना कर्जमाफी देण्यात येईल. कोणत्या स्तरावर कशा प्रकारची कर्जमाफी देण्यात येईल हे त्यांनी सभागृहासमोर मांडावे, हे या प्रस्तावावरील चर्चेच्या अनुषंगाने अपेक्षित आहे. सरकारला या गंभीर प्रश्नाची जाणीव आहे. सरकारकडे विविध विभागांकडून अहवाल आलेले आहेत. कधी कधी अधिकारी मंडळी सरकारला खूष करण्यासाठी किंवा सरकारचा पैसा वाचविण्यासाठी वेगळे सांगतात. मला वाटते सरकारने वस्तुस्थिती जाणून घेऊन तसेच शेतकऱ्यांच्या व्यथा समजून घेऊन, शेतकऱ्यांना कर्जमाफी देणे गरजेचे आहे. या दृष्टिकोनातून शासन निर्णय घेईल अशी अपेक्षा व्यक्त करतो. नाही तर विरोधी पक्ष म्हणून आम्हाला आमचे काम अशाच प्रकारे चालू ठेवावे लागेल आणि त्याचे परिणाम निश्चित या सरकारवर होतील, हे वेगळे सांगण्याची आवश्यकता नाही. त्यामुळे शासनाने निदान आता तरी शेतकऱ्यांच्या कर्जमाफी संदर्भात निर्णय घ्यावा अशी विनंती करतो व येथेच थांबतो.

--------



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**तालिका सभापती** (प्रा.जनार्दन चांदूरकर) : सभागृहाची वेळ सायंकाळच्या 6.00 वाजेपर्यंत वाढविण्यात येत आहे. त्यानंतर पुढील कामकाजाबाबत निर्णय घेतला जाईल.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, या प्रस्तावावरील चर्चा उद्या प्रश्नोत्तराचा तास झाल्यानंतर सुरु करावी. ही महत्त्वाच्या विषयावरील चर्चा आहे. त्यामुळे या प्रस्तावावरील चर्चा सकाळच्या सत्रात ठेवू नये अशी आमची विनंती आहे.

**तालिका सभापती** : मी सभागृहाच्या निदर्शनास आणून देतो की, या प्रस्तावावर बोलण्यासाठी सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील, सत्ताधारी पक्षाकडून सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे, सन्माननीय सदस्य सर्वश्री महादेव जानकर, गोपीकिशन बाजोरिया, पांडुरंग फुंडकर, विनायक मेटे, प्रा.अनिल सोले, श्रीमती स्मिता वाघ, श्री.नागो गाणार, भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस पक्षाकडून सन्माननीय सदस्य सर्वश्री चंद्रकांत रघुवंशी, प्रा.जोगेंद्र कवाडे, ॲड.रामहरी रुपनवर, डॉ.सुधीर तांबे, श्री.सुभाष झांबड, शरद रणपिसे, राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाकडून सन्माननीय सदस्य सर्वश्री अमरसिंह पंडित, प्रभाकर घार्गे, ॲड.जयदेव गायकवाड, सर्वश्री हेमंत टकले, प्रकाश गजभिये आणि लोकभारती पक्षाकडून सन्माननीय सदस्य श्री.कपिल पाटील यांची नावे आलेली आहेत. आता सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील यांनी आपल्या भाषणास सुरुवात करावी.

..3..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.जयंत प्र.पाटील (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, म.वि.प. नियम 260 अन्वये मांडलेल्या प्रस्तावावर माझे विचार व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, शेतकऱ्यांच्या कर्जमाफीबाबत या सभागृहात सातत्याने मागणी केली जात आहे. मी तर म्हणेन की, शेतकऱ्यांना कर्ज घ्यायची गरज पडता कामा नये अशा प्रकारचे धोरण राज्य व केंद्र सरकारकडून आखणे गरजेचे आहे. काल मी आयबीएन-लोकमत या वृत्त वाहिनीवरील चर्चेत भाग घेण्यासाठी गेलो होतो. सन्माननीय सदस्या श्रीमती विद्या चव्हाण सुध्दा माझ्यासोबत होत्या.

सभापती महोदय, शेती मालाला योग्य भाव मिळाला पाहिजे तसेच शेतीकडे उद्योग म्हणून बघितले पाहिजे, या दृष्टिकोनातून शासनाने धोरण आखले पाहिजे. शेतीला उद्योगाचा दर्जा कसा देता येईल हे सरकारने बघितले पाहिजे. किती शेतकऱ्यांना कर्ज दिले, किती शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या हे आम्ही गेल्या 10-12 वर्षांपासून ऐकत आहोत. परंतु यावर कायमस्वरुपी उपाय म्हणून या सभागृहात कोणतीही चर्चा होत नाही, ही दुर्दैवाची बाब आहे. या सभागृहात चर्चा करीत असताना शेतकऱ्यांना दिलेले कर्ज आणि त्याची शेती किंबहुना उद्योग हा कायमस्वरुपी स्थिर होईल आणि पुन्हा त्याला कर्ज घ्यावे लागणार नाही, अशा प्रकारचे धोरण शासनाच्या माध्यमातून आखले गेले पाहिजे. या देशामध्ये एखाद्या भांडवलदार किंवा उद्योगपतीने व्यवसायाकरिता कर्ज घेतल्यानंतर त्याची परतफेड करण्यासाठी 5-7 वर्षांची मुदत असते. त्यानुसार ते विहित मुदतीत कर्जाची परतफेड करतात. 5-7 वर्षानंतर तो भांडवलदार किंवा उद्योगपती पुन्हा कर्ज घेत नाही. परंतु आपण गेल्या 100-150 वर्षांपासून शेतकऱ्यांना कर्ज देत आहोत आणि शेतकरी सुध्दा कर्ज घेत आहेत. आपल्या देशाला स्वातंत्र्य मिळून 66-67 वर्षे झाली आहेत. गेल्या कित्येक वर्षांपासून शेतकरी सातत्याने कर्ज घेत आहे. शेतकऱ्यांमध्ये कर्ज फेडण्याची क्षमता नाही ही वस्तुस्थिती आहे. माझी विनंती आहे की, शेतीला उद्योगाचा दर्जा कसा देता येईल या अनुषंगाने या प्रस्तावावरील चर्चा झाली पाहिजे.

सन्माननीय सहकार मंत्री श्री.चंद्रकांत पाटील यांचे दिल्ली दरबारी चांगले वजन आहे. त्यांना केंद्रातून कोणत्याही गोष्टीसाठी नकार मिळणार नाही. केंद्रात आणि राज्यात भारतीय जनता

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

पक्षाचे सरकार आहे. या सरकारांमध्ये शिवसेना पक्ष हा केवळ 'टेकू' आहे. खरे सरकार भारतीय

..4..



श्री.जयंत प्र.पाटील....

जनता पक्षाचे आहे. या सरकारशी शिवसेनेचा काही संबंध नाही. हे राज्य सरकार शेतकऱ्यांना कर्जमाफी देणारच नाही. या प्रस्तावावर केवळ चर्चा होणार आहे. महोदय, या प्रस्तावावरील चर्चा गांभीर्याने झाली पाहिजे, असे माझे स्पष्ट मत आहे. आपण शेती व्यवसायासाठी अजून किती वर्षे कर्जे देणार आहोत, शेतकऱ्यांना अजून किती वर्षे कर्जमाफी देणार आहोत ? मी विचारु इच्छितो की, शेती व्यवसाय किंवा शेतीवर आधारित असलेल्या उद्योगांना उर्जितावस्था येण्याच्या अनुषंगाने शासन काही धोरण आखणार आहे की नाही ? आम्ही आमच्या पक्षाच्या माध्यमातून या विषयावर आयुष्यभर बोलत आहोत. वारंवार मागणी करुन सुध्दा शेतकऱ्यांच्या शेती मालाला किमान आधारभूत किंमत मिळत नाही.

श्री.माणिकराव ठाकरे : सभापती महोदय, या प्रस्तावावरील चर्चा शेतकऱ्यांच्या कर्जमाफी बाबत आहे. सन्माननीय सदस्य श्री.जयंत पाटील यांनी उल्लेख केला की, शासन शेतकऱ्यांना कर्जमाफी देणारच नाही. सन्माननीय सदस्यांचा शासनावर विश्वासच नसेल तर त्यांनी या विषयावर बोलण्याचे फारसे कारण नाही.

तसेच दुसरी बाब अशी की, सन्माननीय सहकार मंत्री खाली बसून शेती मालाच्या आधारभूत किंमतीबाबत बोलले. मी निदर्शनास आणून देतो की, केंद्रामध्ये कृषी मूल्य आयोग आहे. माननीय मुख्यमंत्र्यांनी जाहीर केले होते की, राज्य स्तरावर सुध्दा कृषी मूल्य आयोग स्थापन करण्यात येईल.

नंतर श्री.कांबळे.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. माणिकराव ठाकरे ....

कायद्यात काय बदल करण्यात येणार आहेत किंवा केंद्र सरकारकडून परवानगी मिळते की नाही, करता येते की नाही याबाबत मला काहीही माहीत नाही. तुम्ही कृषी मूल्य आयोग कसा करावा या संदर्भातील समितीचे अध्यक्ष माजी आमदार श्री. पाशा पटेल यांना केले आहे. आपण सपोर्ट प्राईज संदर्भात बोललात. आपण असे सर्व शेतमालाच्या संदर्भात केले तर फार चांगले होईल. आपण फक्त बोलाची कढी आणि बोलाचाच भात असे करू नका. राज्य स्तरावर कृषी मूल्य आयोग स्थापन करण्याच्या संदर्भात अंमलबजावणी करावी. राज्यातील सर्व शेतमालाला सपोर्ट प्राईज देण्याबाबत राज्य शासनाचे धोरण वेगळे राहील असे राज्य शासनानेच विधान केले आहे, हे मी बोलत नाही. आपण ठोस, प्रामाणिकपणे निर्णय घेतला तर आम्ही आपले स्वागत करू. (अडथळा)

श्री. जयंत प्र. पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी आताच सांगितले आहे. मी खरे बोलत आहे. माझे शब्द मागे घ्यावे लागले तर मला आनंदच होईल. (अडथळा) शासनाने कर्जमाफी द्यावी. मी सकाळपासून आग्रही होतो की, सभागृहाचे कामकाज सुरू करावे. जेणेकरून ही चर्चा होईल. कर्जमाफी करावी लागेल. तो वेगळा विषय आहे. मला वाटते की, शासन कर्जमाफी करणार नाही. (अडथळा)

**तालिका सभापती** : माननीय मंत्र्यांनी किंवा सन्माननीय सदस्यांनी बसून बोलू नये.

श्री. जयंत प्र. पाटील : सभापती महोदय, प्रामुख्याने ही चर्चा 2 दिवस चालली तरी चालेल. आपण कृषी उद्योगांची विल्हेवाट लावण्यास निघाला आहात. कृषी उद्योग म्हणजे शेती मालावर प्रक्रिया करणारे उद्योग यांची दयनीय अवस्था आहे. आपल्याकडून कर्जमाफी अपेक्षित होती. कर्ज का काढावे लागते आणि कर्ज कधी फेडले आहे ? कर्जमाफी पहिल्यांदा सन 1978 मध्ये पुलोद सरकारने केली. माननीय श्री. शरद पवार साहेब मुख्यमंत्री झाले, त्यावेळी खरी कर्जमाफी झाली आणि ती आमच्या पक्षाच्या आग्रहामुळे झाली. आमच्या पक्षाच्या 14 आमदारांनी पाठिंबा दिला आणि आम्ही माननीय श्री. शरद पवार साहेबांना अटी घातल्या की, मराठवाडा विद्यापीठाला डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव द्यावे. आम्ही त्यामध्ये गेलो. आमचे राजकीय नुकसान झाले. आम्ही त्याची पर्वा केली नाही. आपण मराठवाड्यात गेलात. आम्ही आमचे विचार



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. जयंत प्र. पाटील ....

सोडले नाहीत. सरकारला पाठिंबा देताना मराठवाडा विद्यापीठाला डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ करावे अशी अट घातली. पहिल्यांदा सन 1978 ला कर्जमाफी झाली आणि नंतर बॅ. अंतुले साहेबांनी क्रांतिकारी कर्जमाफी केली, त्यांचा कर्जमाफीचा वेगळा निर्णय आहे. मधु दंडवते अर्थमंत्री झाले, त्यांनी व्ही.पी.सिंग यांच्या सरकारमध्ये पहिल्यांदा 10 हजार रूपये प्रत्येकी कर्जमाफी केली, केंद्र शासनाने कर्जमाफी केली आणि त्यानंतर सन 2009 ला कर्जमाफी झाली. मी सहकार क्षेत्रात काम करतो. मी 20 वर्षे एका बँकेचा चेअरमन आहे. कर्जमाफी देणारे लोक तेच आहेत आणि ते शेतकरी आहेत. सन्माननीय श्री. धनंजय मुंडे, श्री. हेमंत टकले, श्री. जयंत पाटील हेच ते आहेत. आपण या संदर्भात पाहण्यासाठी सहकार मंत्री म्हणून यादी काढा. सन 1978 पासून सन 2009 पर्यंत झालेल्या कर्जमाफीत असलेले शेतकरी ते तेच लोक आहेत, ते सर्व गाव पातळीवरील सर्व पक्षांचे पुढारी आहेत आणि ही वस्तुस्थिती आहे. कर्जमाफी कोणाला, कशी मिळते याची चर्चा आपल्याला करावयाची आहे. मी राजकारण करीत नाही. मी राजकीय हेतूने बोलत नाही. आपल्याला शेतकऱ्यांना जगवायचे असेल, तो जगला पाहिजे असे वाटत असेल तर त्याला कर्जमाफी दिली पाहिजे. शेती उद्योग म्हणून कशी करणार याचे आश्वासन शासनाकडून मिळाले पाहिजे. राज्यात साखर कारखाना, सूत गिरणी, कापसावर प्रक्रिया करणारे उद्योग, तेलबियावर प्रक्रिया करणारे उद्योग, डाळीवर प्रक्रिया करणारे उद्योग असे छोटे मोठे उद्योग असून त्यांची परिस्थिती दयनीय आहे. सहकार तत्वावरील उद्योग आहेत, त्यामध्ये अफरातफर, मिसमॅनेजमेंट आहे. खाजगी उद्योगांची परिस्थिती देखील दयनीय आहे. आपण सहकार मंत्री आहात, सहकार रूजलेल्या कोल्हापूरमधील भूमीपूत्र आहात. साखर उद्योगाची दैना झाली आहे. सहकार विभागाची काय परिस्थती आहे यावर आपण चर्चाच करीत नाही. त्यामुळे आपल्याला शेतकऱ्यांची बाजू घेण्याचा अधिकार काय आहे ?

सभापती महोदय, साखरेला 18 रूपये भाव आहे. तुम्ही हमीभावाप्रमाणे ऊसाला भाव दिला पाहिजे नाही तर केस दाखल करू असे सांगता. आधारभूत किंमत ठरविता, त्यावेळी त्याची विक्री किंमत ठरली जात असते. तुम्ही कोल्हापूरला आधारभूत किंमत 2500 रूपये भाव, पुण्याला 2000



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. जयंत प्र. पाटील ....

रुपये भाव आणि तुमच्याकडे 1700 रुपये भाव ठरविला. वसुलीप्रमाणे किंमत ठरविली जाते. तुम्ही 3200 रुपये भाव ठरविला असेल आणि 1800 रुपयांनी व्यवहार होत असेल तर सर्व शेतकरी नष्ट होणार आहेत. कारखानदारी ही कोणा एकट्याची नाही तर शेतकऱ्यांची आहे. (अडथळा) बँका देखील शेतकऱ्यांच्याच आहेत, व्यक्तिगत कोणाच्याही नाहीत. (अडथळा) राज्यात साखर उद्योग संकटात आहे, सूत गिरण्यांचे प्रश्न ऐरणीवर आले आहेत. सदर विषयांच्या बाबतीतील चर्चा झाली पाहिजे. यावर्षी कर्जमाफी आहे. पुढील वर्षी उद्योग बंद पडले तर राज्यातील कोणत्याही राजकीय आमदारांना, कार्यकर्त्यांना, लोकप्रतिनिधींना शेतकरी फिरू देणार नाहीत अशी स्थिती आहे. परंतु राज्य शासनाला याचे गांभीर्य नाही आणि केंद्र सरकारलाही याचे गांभीर्य नाही. मी म्हणतो की, त्याची चर्चा येथे झाली पाहिजे असे आश्वासन शासनाने दिले पाहिजे. आपण आज कर्ज दिले पण रिपेमेंट कसे करणार ? आम्हाला व्याजाचे सांगू नका. आम्ही व्याजमाफी देणार, व्याज भरणार अशा गोष्टी करू नका. कारण आम्हाला बिनव्याजी पैसे आहेत. आपण ती गोष्ट करू नका. व्याजाची माफी आहे. दरवर्षी बिनव्याजी कर्ज देतो. आम्हाला ते नको आहे. आपण कर्जमाफी देणार नसाल तर देणार नाही असे सांगावे. आम्ही जाऊन सांगू की, आता शासनाची पत राहिलेली नाही. आपण कर्जमाफी देऊ शकत नाही असे का म्हणतो तर शासनाला यावर्षी 26 हजार कोटी रुपयांचे व्याज भरायचे आहे. 10 हजार कोटी रुपयांचा हप्ता भरायचा आहे. 3 लाख कोटी रुपये कर्ज काढले आहे, त्याचे रि-पेमेंट 10 हजार कोटी रुपये आहे. एकूण 36 हजार कोटी रुपये फेडण्यासाठी कर्ज काढावे लागणार आहे. मी अर्थसंकल्पाचा अभ्यास केल्यावर मला असे दिसून आले की, शासनाला 36 हजार कोटी रुपये भरावे लागणार आहेत.

( नंतर श्री. रोझेकर ....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.जयंत प्र.पाटील.......

राज्य शासनाने किती कर्ज काढावे, यालाही काही मर्यादा आहेत. त्यामुळे यासाठी आपल्याला केंद्र सरकारकडून पैसे आणावे लागतील. माननीय सहकार मंत्री श्री.चंद्रकांत दादा पाटील हे केंद्र सरकारकडून पैसे आणू शकतील. मी माझ्या भाषणाची सुरुवातच अशी केली होती की, या मंत्री मंडळामध्ये सर्वात वजनदार मंत्री कोण असतील तर ते माननीय श्री.चंद्रकांत दादा पाटील आहेत. प्रामाणिकपणे आणि शिस्तीने वागणारे श्री.चंद्रकांत दादा पाटील निश्चितपणे केंद्र सरकारकडून पैसे आणू शकतील, ही वस्तुस्थिती आहे. मी काही चुकत असेल तर माझे शब्द मागे घेईन. अर्थ मंत्री महोदय आता येतील. त्यांनी सांगावे की, 30 हजार कोटी रुपयांची परतफेड ते कशी करणार आहेत ? कारण, या अर्थसंकल्पात त्यासाठी तरतूद केलेली नाही. मी अर्थसंकल्पाचा पूर्ण अभ्यास केला आहे. त्यामुळेच मी असे सांगितले की, कर्जाची परतफेड करण्यासाठी राज्य शासनाला पुन्हा कर्ज काढावे लागणार आहे. शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी राज्य सरकार पैसे उभे करु शकणार नाही आणि त्यासाठीच केंद्र सरकारने मदत केली तरच या राज्यामध्ये 'अच्छे दिन' येतील.

सभापती महोदय, केंद्र सरकारने या राज्याला भरभक्कम अशी आर्थिक मदत केली पाहिजे. बिहार, झारखंड या राज्यांना केंद्र सरकार भक्कम आर्थिक मदत करीत आहे. बिहार राज्यात येत्या काही काळात निवडणुका होणार आहेत. या राज्यांकडे केंद्र सरकारकडून धो-धो पैसा पाठविला जात आहे. हा पैसा आपल्या राज्याकडे वळविण्याची ताकद आणि हिंमत माननीय सहकारी मंत्री श्री.चंद्रकांत दादा पाटील यांच्यामध्ये आहे आणि तशा प्रकारे हा पैसा वळवावा, अशी विनंती मी या माध्यमातून त्यांना करणार आहे.

सभापती महोदय, माझ्यानंतर सन्माननीय सदस्य श्री.चंद्रकांत रघुवंशी हे बोलणार आहेत. माझ्यापूर्वी सन्माननीय विरोधी पक्ष नेते व सन्माननीय सदस्या श्रीमती शोभाताई फडणवीस या बोलल्या. त्यांनी शेतकऱ्यांच्या आत्महत्यांची काही आकडेवारी येथे दिली. परंतु, माझा या चर्चेच्या निमित्ताने राज्य सरकारला हा सवाल आहे की, राज्य सरकार शेतकऱ्यांना वाचविण्यासाठी काय करणार आहे ? शेतकऱ्यांना जगविण्याचे शासनाचे धोरण काय आहे, हे राज्य शासनाने सांगितले पाहिजे.

...2....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.जयंत प्र.पाटील.......

सभापती महोदय, वेळेच्या मर्यादेची मला जाणीव आहे. मी फक्त चार उदाहरणे देणार आहे. कोकणात गेल्या दोन वर्षात भात खरेदी झालेली नाही. यामुळे कोकणातील शेतकरी मातीमोल झाला आहे. पूर्व विदर्भात भात जास्त प्रमाणात होतो. सन्माननीय सदस्या श्रीमती शोभाताई फडणवीस यांच्या भागातही भात पिकतो. मार्केटिंग फेडरेशनच्या माध्यमातून आपण आधारभूत किमतीमध्ये भात खरेदी करीत असतो. मी गेल्या 15-20 वर्षांपासून मार्केटिंग फेडरेशनचा संचालक आहे. गेल्या काही वर्षातील परिस्थिती बघून डोळ्यात पाणी येते. कारण, शेतकऱ्यांनी पिकविलेल्या भाताची खरेदी आम्ही करु शकलेलो नाही. यापूर्वीच्या तीन वर्षात खरेदी केलेला भात गोडाऊनमध्ये पडून आहे आणि आता भात साठविण्याची क्षमता या गोडाऊनमध्ये नाही. गोडाऊन उभारणीसाठी केंद्र सरकारकडून भरघोस सबसिडी दिली जाते. त्याची अंमलबजावणी राज्य शासन करणार आहे का ? केंद्र सरकारकडून 90 टक्के, 100 टक्के अनुदान दिले जाते. परंतु, या अनुदानाचा वापर आपल्याकडून केला जात नाही, त्याची अंमलबजावणी होत नाही. त्यामुळे केंद्र सरकारकडून येणारा हा पैसा आपण वापरत नाही, अशी परिस्थिती आहे. शेतकऱ्यांना आधारभूत किंमत देऊन त्यांचा भात खरेदी करण्याची जबाबदारी शासनाची आहे. आपण केंद्र सरकारची एजन्सी म्हणून काम करीत आहोत. परंतु, गेल्या दोन वर्षात आमच्या जिल्ह्यात एक क्विंटलही भात खरेदी झालेली नाही, ही परिस्थिती आहे. त्यामुळे शेतकरी कशाच्या आधारावर कर्ज फेडणार आहे ? शेतकऱ्यांनी बँकांकडून कर्ज घेतले, बियाणे खरेदी केली, खते खरेदी केली आणि आज त्यांनी उत्पादित केलेला माल आपण खरेदी करु शकत नाही, ही परिस्थिती आहे. त्यामुळेच माझी मागणी आहे की, या चर्चेला आपण वेगळे वळण दिले पाहिजे. वेगळ्या तऱ्हेने ही चर्चा आपण घडवू या. कारण, या संदर्भात वेगळी परिस्थिती राज्यात आहे.

सभापती महोदय, सन्माननीय सहकार मंत्री श्री.चंद्रकांत दादा पाटील असे म्हणाले की, गेल्या वेळी केलेल्या कर्जमाफीमुळे बँकांचा फायदा झाला. परंतु, तशी परिस्थिती नाही. या राज्यामध्ये सर्वात कमी कर्जमाफी घेणाऱ्या बँकेचा मी अध्यक्ष आहे. सन्माननीय सदस्या श्रीमती

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

शोभाताई फडणवीस यांनी आकडेवारी दिली आहे. मला हे निदर्शनास आणावयाचे आहे की, राज्य

...3....



श्री.जयंत प्र.पाटील.......

शासनाने गेल्या वेळी शेतकऱ्यांना कर्जमाफी दिली होती, बँकांना नाही. ही थ्री टायर सिस्टिम आहे. परंतु, कर्जमाफीचा फायदा बँकांना झाला, अशी चर्चा सभागृहात होते. आपणही बँक चालवीत आहात.

सभापती महोदय, यापूर्वी केंद्र सरकारने अर्बन बँकांना, पतपेढ्यांना कर्ज देण्यास सांगितले आणि ते बंधनकारक केले. कर्ज दिले नाही तर तुमच्यावर कारवाई करु, असेही सांगितले. तत्कालीन पंतप्रधान डॉ.मनमोहन सिंग यांनी पतपेढ्यांना आदेश दिले की, त्यांनी शेतकऱ्यांना कर्ज उपलब्ध करुन द्यावे. केवळ पतपेढ्याच नाही तर अर्बन बँका आणि ज्या ज्या म्हणून को ऑपरेटिव्ह फायनान्शिअल इन्स्टिटयुशन आहेत, त्यांनी शेतकऱ्यांना कर्जे दिली पाहिजेत, असा आदेश सरकारने दिला होता. परंतु, कर्जाची वसुली आपण कशी करणार आहोत ? कर्जमाफी दिल्यानंतर कोणी कर्ज परतफेड करणार आहे का ? सोसायट्या, जिल्हा बँका, राज्य बँका आणि त्यानंतर नाबार्ड, अशी ही सहकारी वित्तीय संस्थांची साखळी आहे. नाबार्ड राज्य बँकेला पतपुरवठा करते, राज्य बँक जिल्हा बँकांना आणि जिल्हा बँका सोसायट्यांना पतपुरवठा करीत असतात. त्यामुळे या कर्जाशी आणि दिलेल्या कर्जमाफीशी बँकांचा काय संबंध आहे ? यामध्ये जर काही बोगस गोष्टी झाल्या असतील तर त्याच्याशी बँकांचा काही संबंध नाही. सोसायट्यांनी कर्ज वितरण केले आहे. त्या ठिकाणी काही अनियमितता झाली असेल. बीड जिल्ह्यातही झ ाली आहे. सभापती महोदय, मला हे निदर्शनास आणून द्यावयाचे आहे की, अशा प्रकारच्या चर्चेमुळे बँकांवर ग्राहकांचा विश्वास रहात नाही. या बँकांमध्ये ठेवी कोणाच्या आहेत ? आमच्या बँकांनी स्वनिधीमधून कर्जे दिलेली आहेत. आम्ही नाबार्ड किंवा राज्य बँकेकडून पैसे घेतलेले नाहीत. या बँका उभ्या करण्यासाठी आम्ही मेहनत केली आहे, रक्त सांडले आहे. परंतु, अशा प्रकारच्या चर्चेमुळे ठेवीदारांचा बँकांवरील विश्वास उडतो. सहकार चळवळीमध्ये अग्रेसर असलेले आपले राज्य आहे आणि दुसऱ्या क्रमांकावर गुजरात राज्य आहे. परंतु, आपणच असे बोलू लागलो तर ते बरोबर नाही.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

सभापती महोदय, ही सर्व परिस्थिती आपण समजून घेतली पाहिजे. राज्य सरकारने मागील वेळी शेतकऱ्यांना कर्जमाफी दिली, त्याचा लाभ बँकांनी नाही तर

...4....



श्री.जयंत प्र.पाटील.......

सोसायट्यांनी घेतला आहे. सोसायट्या जी प्रकरणे पाठवितात, त्यावर कार्यवाही झाली आहे. ही एक सिस्टिम आहे आणि ती कशी बदलणार आहात, हे आपण बघितले पाहिजे. एकूण वितरित होणाऱ्या कर्जापैकी 111 टक्के कर्ज आम्ही शेतकऱ्यांना दिलेले आहे. पण माननीय सहकार मंत्री असे म्हणत आहेत की, बँकांवर कारवाई करा. त्यांनी असेही सांगितले आहे की, बँकांनी शेतकऱ्यांच्या कर्जाचे पुनर्गठण करावे. अन्यथा, त्यांच्याविरुध्द कारवाई करण्यात येईल. हे त्यांचे स्टेटमेंट आहे. जे शेतकरी नियमित कर्ज फेडू शकत नाहीत, एक वर्षासाठी घेतलेले कर्ज फेडू शकत नाहीत, ते कर्जाचे 5 वर्षांसाठी पुनर्गठण केल्यानंतर कर्ज फेडू शकतील का ? याचा खुलासा या चर्चेच्या उत्तरातून आला पाहिजे. आजही व्याजाची रक्कम सरकारच भरत आहे. त्यामुळे व्याजाचा काही प्रश्न नाही. परंतु, पुनर्गठणाच्या संदर्भातील उत्तर मला शासनाकडून हवे आहे. अशा प्रकारे या सहकारी संस्थांची धुळधाण होणार आहे.

सभापती महोदय, राज्य शासनाने आणखी कर्ज काढावे, अशा प्रकारचा वेडावाकडा सल्ला मी देणार नाही. परंतु, केंद्र सरकारची मदत घेऊन आणि काटकसर करून यामधून मार्ग काढावा, अशी सूचना मात्र मी करणार आहे. काटकसरीबाबत मी यापूर्वीही अर्थसंकल्पावरील चर्चेच्या माध्यमातून बोललो आहे. आपण राज्य शासनाचा सर्व व्यवहार संगणकीकृत केला आहे. परंतु, कर्मचाऱ्यांचा आकृतीबंध बदललेला नाही.

यानंतर श्री.बोरले........

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.जयंत प्र.पाटील...........

परंतु, कर्मचाऱ्यांचा पॅटर्न बदलला नाही. तो पॅटर्न बदलला पाहिजे, यासाठी तुम्ही धोरणात्मक निर्णय घेतला पाहिजे. माझ्या कोणत्याही संस्थांमध्ये मी शिपाई ठेवलेला नाही. शिपाई ही ब्रिटीश काळातील पद्धत आहे. माननीय मुख्यमंत्री, मंत्री आणि सन्माननीय सदस्य अमेरीका, युरोपमध्ये जातात. युरोपमध्ये कोणत्याही कार्यालयात शिपाई नाही. मी एकदा स्विडन येथील डिपार्टमेंट स्टोअरमध्ये गेलो होतो. तेथे आमची कॉन्फरन्स होती. मी स्वत: तेथे भाषण करणार होतो. त्यावेळी मला थोडी झोप येत होती. म्हणून मी पाणी मागितले. त्यावेळी स्वत: जनरल मॅनेजरने मला पाणी आणून दिले. ते माझ्याकडे बघत होते. त्यावेळी मला माझ्या बाजूला बसलेल्या व्यक्तीने सांगितले की, भाई, येथे पाणी मागावयाचे नसते, आपण स्वत: जाऊन पाणी घ्यायचे असते. मी त्या दिवसापासून ठरविले की, आपल्या कोणत्याही संस्थेत शिपाई नियुक्त करावयाचा नाही. मी स्वत: ती कामे करतो. शिपाई काय काम करतो ? ऑफिसमध्ये कोणतेही काम न करता लावालावी करण्याचे काम कोण करीत असेल तर तो शिपाई करतो, असे माझे म्हणणे आहे. साहेब अमूक ठिकाणी गेले, अमूक बोलले, जेवण कोणी मागविले, असे काम तो करतो. मी हे मुद्दाम सांगितले. परंतु, आपण हा पॅटर्न बदलत नाही. आपण गाड्यांचा पॅटर्न देखील बदलत नाही. गाडी किती किलो मीटर चालली हे बघितले पाहिजे. माननीय श्री.दिवाकर रावते साहेब, आपण मंत्रिमंडळाच्या बैठकीत काटकसर करण्याबाबतचा विषय मांडावा. त्यामुळे आपले 25 हजार कोटी रुपये वाचतील. आपण मंत्रिमंडळाच्या बैठकीत हा विषय मांडावा. माननीय श्री.दिवाकर रावते साहेबांनी मनावर घेतले तर ते करु शकता.

सभापती महोदय, शासकीय कर्मचाऱ्यांना सहावा वेतन आयोग लागू झालेला आहे आणि आता सातवा वेतन आयोग येणार आहे. सातवा वेतन आयोग अजिबात दिला नाही पाहिजे. यामुळे कर्मचारी नाराज होतील. हे काय चालले आहे ? कामाप्रमाणे मोबदला दिला पाहिजे. आमचे शिक्षक आमदार म्हणतात की, शिक्षकांना पगारवाढ मिळाली पाहिजे. आपण आज रुपयातील 82 पैसे वेतनावर खर्च करीत आहोत, अशी परिस्थिती आहे. मला दुपारी गुरुजी म्हणाले की, सरकारी



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.जयंत प्र.पाटील...........

कर्मचाऱ्यांना पगारवाढ मिळाली तर ती शिक्षकांना देखील मिळाली पाहिजे. राज्य शासनाचे आर्थिक धोरण काय आहे, पुढील दिशा काय असणार आहे, हे आपण सभागृहाला सांगितले पाहिजे. नाही तर काय उपयोग आहे ? आपल्या राज्याची लोकसंख्या 11.5 कोटी आहे आणि आपण केवळ 10-15 लाख लोकांसाठी सरकार चालविणार काय, हा खरा प्रश्न आहे. म्हणून याबाबत देखील गंभीरपणे चर्चा झाली पाहिजे. कर्मचारी संघटित होणार याचा आपण विचार करतो. परंतु, असंघटित असलेला आमचा शेतकरी आज वाऱ्यावर सोडल्यासारखा आहे. या सर्व गोष्टींची दोन नाही तर तीन दिवस गांभीर्याने चर्चा होऊ द्यावी. सन्माननीय सदस्य श्री.चंद्रकांत रघुवंशी साहेब, आपण या विषयावर प्रभाविपणे बोलू शकता. तुम्ही ग्रामीण भागात काम करणारे सन्माननीय सदस्य आहात. तुम्ही जिल्हापरिषदेचे अध्यक्ष म्हणून प्रभाविपणे काम केलेले आहे, याची मला जाणीव आहे. आपण या विषयावर चर्चा करावी. आत्महत्या, यांनी खाल्ले, त्यांनी खाल्ले, याची आपण वेगळी चर्चा करु (...अडथळा...) सरांचा विषय वेगळा आहे. मला आठवते की, माननीय श्री.दिवाकर रावते साहेब सभागृहात आल्यानंतर ते त्यांची बॅग खाली ठेवायचे आणि आपल्या भाषणात 332, 316, 415 शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्याचे सांगत होते. मला त्यांच्या चेहऱ्यावरील चिंता दिसते. परंतु, ते शासनामध्ये असल्यामुळे त्यांना बोलता येत नाही. त्यांच्या चेहऱ्यावरील दु:ख मला दिसते. मी माननीय श्री.दिवाकर रावते साहेबांना मानतो. मुंबईत राहून सर्व भागातील शेतकऱ्यांसाठी काम करणारा नेता म्हणून मी त्यांच्याकडे बघतो. त्यांची राजकीय जडणघडण मुंबई शहरात झाली. मराठवाडा आणि विदर्भात पायी फिरुन शेतकऱ्यांसाठी काम करणारा नेता म्हणून मी त्यांच्याकडे बघतो. त्यांच्या चेहऱ्यावर चिंता आहे. परंतु, त्यांच्यावर बंधने आहेत. टेकू देण्यासाठी घेतलेली सेना आहे, असे आम्हाला वाटते. आपण हा विषय मंत्रिमंडळाच्या बैठकीत उपस्थित करावा. माननीय श्री.दिवाकर रावते साहेब, मंत्रिपद सोडावे आणि ही देखील क्रांती करावी. (...अडथळा...) ते आमदार म्हणून देखील तेवढेच प्रभाविपणे काम करु शकता. त्यांचे मूळ गाव अलिबाग आहे आणि त्यांचे जावई देखील अलिबागचेच आहेत. सन्माननीय सदस्य श्री.भाई गिरकर यांना याची माहिती

..3...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.जयंत प्र.पाटील...........

नाही. मी हे चेष्टेने बोलत नाही. मी मनापासून बोलत आहे. त्यांनी केलेल्या कामाचा मी आदर करतो. त्यांनी पक्षात वेगळ्या पद्धतीने त्यांची भूमिका ठामपणे मांडलेली आहे आणि त्याबद्दल त्यांना वेळ प्रसंगी सोसावे देखील लागले आहे, हे आम्ही बघितले आहे. परंतु, त्यांनी शेतकऱ्यांची भूमिका सोडली नाही. कदाचित, त्यांच्या आणि आमच्या विचारामध्ये फरक असेल, मतभेतद असतील. माननीय श्री.चंद्रकांत पाटील साहेब, आपण शासन, प्रशासनामध्ये नवीन आहात. तुमच्या कामाबद्दल आम्हाला आक्षेप नाही. (...अडथळा...) मी माननीय श्री.दिवाकर रावते साहेबांना जाणीव करुन देतो की, त्यांनी विरोधी पक्षात असताना शेतकऱ्यांच्या बाजूने तीन-चार तास भाषणे केलेली आहेत. कर्जमाफी बाबत ते बोलत असत. त्यांनी मंत्रिमंडळासमोर ही बाजू मांडावी म्हणून मी हे बोलत आहे. मी उपरोधिकपणे बोलत नाही. मी कोणाला दुखविण्यासाठी बोलत नाही. जी वस्तुस्थिती आहे ती मी मांडत आहे.

सभापती महोदय, शेतकरी संघटनेचे नेते श्री.रघुनाथ दादा पाटील माझे सहकारी आहेत. ते मला परवा भेटले होते. अभ्यासू शेतकरी नेता म्हणून मी त्यांच्याकडे बघतो. त्यांनी माझ्याकडे जे मुद्दे मांडले ते सभागृहात मांडण्यासाठी मला आणखी दोन तास लागतील. गोहत्याबंदी हा बिकट प्रश्न आहे. गोहत्याबंदीला आमचा विरोध नाही. परंतु, आपण गोवंश शब्द नमूद केलेला आहे, आज त्याला विरोध का आहे ? राज्यातील शेतकऱ्यांची बिकट परिस्थिती झालेली आहे. भाकड जनावरांचे काय करावयाचे आणि पर्यावरणाचा देखील प्रश्न निर्माण झालेला आहे. आज कोणीही स्वतःच्या शेतात भाकड जनावरे ठेवायला तयार नाही. खाटीक गावाच्या बाहेर येतो आणि जनावरे घेतो. परंतु, तो अट घालतो की, हे जनावर मी तुझ्या शेतामध्येच कापेल. तो खाटीक शेतात जनावर कापतो आणि इतर घाण तेथेच टाकून निघून जातो. शेतकऱ्यांकडे जर्सी गायी आहेत. परंतु, जर्सी गायीपासून होणाऱ्या बैलांचा शेतीसाठी उपयोग होत नाही. ते शेतकऱ्यांच्या उपयोगाचे नाहीत आणि त्याला आहार देखील जास्त लागतो. त्यामुळे आज शेतकरी हवालदिल झालेला आहे. ही परिस्थिती पश्चिम महाराष्ट्रात देखील मोठ्या प्रमाणावर आहे. सन्माननीय सदस्य श्री.महादेव जानकर साहेब आपल्याला ही वस्तुस्थिती माहीत आहे. मग यावर आपण कोणती उपययोजना करणार आहात ?

..4...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.जयंत प्र.पाटील...........

याचा देखील फेरविचार करण्याची आवश्यकता आहे. ती जनावरे कशी सांभाळायची आणि त्यांच्यासाठी आहार कोठून आणायचा हा प्रश्न शेतकऱ्यांसमोर आहे. यामुळे शेतकऱ्यांच्या आर्थिक बजेटमध्ये मोठी तूट पडत आहे. राज्य शासन कर्मचाऱ्यांना अमूक वयोमर्यादेनंतर पेन्शन देते त्या प्रमाणे तुम्ही जनावरांची संपूर्ण जबाबदारी घेतली पाहिजे. आम्ही सर्व शेतकरी जनावरे मोफत द्यायला तयार आहोत. माझे जनावर तडफडून मरु नये, असे शेतकऱ्यांना वाटते. बैल म्हातारा झाल्यानंतर त्याला विविध प्रकारचे रोग होतात, फोड येतात. परंतु, एकदा तो बैल बसला तर त्याला उचलण्यासाठी 10-10 लोक लागतात, अशी परिस्थिती आहे. या सर्व गोष्टींची चर्चा झाली पाहिजे. आपण कायदे पास करावेत. आम्ही देखील हिंदू आहोत. माननीय डॉ.रणजित पाटील साहेब, आमचा त्याला विरोध नाही. परंतु, आपण वस्तुस्थिती बघावी. आपण अकोला शहरातून बाहेर पडल्यानंतर कशी परिस्थिती आहे हे आपल्याला कळेल. आपण याबाबत काय करणार आहात, कशी व्यवस्था करणार आहात आणि शेतकऱ्याला कशा प्रकारे हातभार लावणार आहात, हे देखील आम्हाला या चर्चेच्या निमित्ताने कळले पाहिजे.

यानंतर श्री.खर्चे वि........

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.जयंत प्र.पाटील...

शेतकऱ्यांचे बजेट आज दिवसेंदिवस अडचणीचे व कष्टमय होत चालले आहे. ही चर्चा करीत असताना माझ्याकडे अनेक मुद्दे आहेत परंतु इतर चर्चेच्या वेळी ते मुद्दे मी मांडणार आहे. साखरेच्या विषयावर मी नंतर बोलणार आहे, कोल्हापूरचे चांगले लोक आहेत म्हणून आम्ही कोल्हापूर येथे आलो आहोत. तेथे येऊन आम्ही फसलो अशी परिस्थिती निर्माण झालेली आहे. साखरेचे भाव अच्छे दिन मुळे पडले आहेत, त्याचे आम्हाला वाईट वाटत आहे.

सभापती महोदय, या चर्चेच्या निमित्ताने शेतीला उद्योगाचा दर्जा देण्याची हमी राज्य शासनाने दिली पाहिजे. उद्योगाचा दर्जा दिल्यानंतर शेती मालाची आधारभूत किंमत ठरवितांना त्यासाठी येणारा संपूर्ण खर्च गृहीत धरला पाहिजे. याबाबत चर्चा होण्याची गरज आहे. आज जो शेतकरी कर्जबाजारी झालेला आहे. त्यांना पूर्णपणे कर्जमुक्त करण्यासाठी राज्य शासनाने केंद्र सरकारकडून कशा प्रकारे मदत आणली जाईल याचा विचार करुन कर्जमुक्तीची घोषणा सभागृहात करण्यात यावी. अशा प्रकारे आश्वासन महाराष्ट्रातील सर्व शेतकऱ्यांना देण्यात यावे, एवढी विनंती करतो व माझे भाषण संपवितो.

-------------

...2...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी.** : गिरणी कामगारांना घरे वाटप करणे

**मु.शी.** : गिरणी कामगारांना घरे वाटप करणे यासंबंधी माननीय नगर विकास राज्यमंत्र्यांचे निवेदन

डॉ.रणजित पाटील (नगर विकास राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम 46 अन्वये पुढील निवेदन करतो :-

(प्रेस : येथे सोबत जोडलेले निवेदन छापावे)

....3...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.माणिकराव ठाकरे : सभापती महोदय, निवेदनावर चर्चा होत नाही परंतु मला एक प्रश्न विचारावयाचा आहे. मंत्री महोदयांनी आताच सांगितले की, गिरणी कामगारांकडून दीड लाख अर्ज प्राप्त झाले आहेत. आजपर्यंत 20 हजार घरांचे बांधकाम पूर्ण करण्यात आले आहे. ती पूर्वीची घरे आहेत त्यांचे वाटप करण्याचे त्यांनी सांगितले आहे. डिसेंबर, 2016 पर्यंत म्हणजे जवळपास दीड वर्षानंतर 10 हजार घरे शासन उपलब्ध करणार आहे. त्यासाठी एमएमआरडीए शासनाला जमीन देणार आहे. दीड लाख कामगार आहेत, त्यासंदर्भात कोणताही विचार शासनाने केल्याचे दिसून येत नाही. कामगारांना फक्त 30 हजार घरे देऊन गिरणी कामगार शांत होणार आहेत काय ? दीड लाख घरे तयार करण्यासंदर्भात शासनाने काय नियोजन केले आहे असा माझा प्रश्न आहे.

डॉ.रणजित पाटील : सभापती महोदय, एमएमआरडीए रिजनमध्ये गिरणी कामगारांचे पुनर्वसन करण्यात येणार आहे. त्याचा रोडमॅप तयार करण्यात आलेला आहे. यासंदर्भातील माहिती विस्ताराने देण्यात येणार आहे. 1 लाख 48 हजार अर्ज प्राप्त झाले आहेत. यापैकी एक लाख घरे उपलब्ध करण्याचे नियोजन सरकारने केले आहे. एमएमआरडीए रिझनमध्ये पुनर्वसन करावयाचे आहे. या भागात मुबलक प्रमाणात जमीन उपलब्ध आहे. यापुढील रुपरेषा वेळोवेळी निवेदनामार्फत अवगत करण्यात येईल.

---------

...4...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी.:** राज्यात सरासरीपेक्षा कमी पाऊस झाल्याने भूजल पातळीत कमालीची घट होऊन दुबार पेरणीचे निर्माण झालेले संकट

**मु.शी.:** राज्यात सरासरीपेक्षा कमी पाऊस झाल्याने भूजल पातळीत कमालीची घट होऊन दुबार पेरणीचे निर्माण झालेले संकट या विषयावर सर्वश्री धनंजय मुंडे, माणिकराव ठाकरे, सुनील तटकरे, अमरसिंह पंडित, संजय दत्त, हेमंत टकले, भाई जगताप, जयंतवराव जाधव, जयंत पाटील, शरद रणपिसे, कपिल पाटील, वि.प.स. यांचा प्रस्ताव

( प्रस्ताव पुन्हा प्रस्तुत झाला.....

डॉ.नीलम गोऱ्हे (विधानसभेने निवडलेल्या) : सभापती महोदय, विरोधी पक्ष आणि सत्ताधारी पक्षातील सन्माननीय सदस्यांनी नियम 260 अन्वये प्रस्ताव सभागृहात मांडलेला आहे त्यावर माझे विचार व्यक्त करण्यसाठी मी उभी आहे.

सभापती महोदय, सर्व प्रथम मी भाषणाची सुरुवात करीत असताना ज्या शेतकऱ्यांनी किंवा त्यांच्या कुटुंबीयांनी गेल्या काही महिन्यात आत्महत्या केल्या आहेत, त्यांना मी श्रध्दांजली अर्पण करते. या सदनात गिरणी कामगार, शेतकरी यांच्याबाबत आपण काय निर्णय घेतो व त्यांच्यासाठी काय सूचना करतो याकडे संपूर्ण समाजाचे लक्ष लागले असते. शेतकऱ्यांच्या दूरवस्थेबाबत बोलत असताना आजची परिस्थिती पाहिली तर सहा जिल्ह्यात खरीपाची पेरणी झालेली आहे आणि संपूर्ण महाराष्ट्रातील शेतकरी त्रासलेला आहे. कृषी आयुक्त श्री.विकास देशमुख यांनी याबाबत माहिती दिलेली आहे. त्याबाबत सरकारने असे ठरविले आहे की, 20 जुलैपर्यंत पाऊस न आल्यास दूबार पेरणीची वेळ येऊ शकते. त्यासाठी बियाणांची उपलब्धता करण्यात आलेली आहे.

सभापती महोदय, माननीय पंतप्रधान श्री.नरेंद्र मोदी यांनी गेल्या काही महिन्यात किंवा त्यांनी जबाबदारी घेतल्यानंतर जनधन योजनेमार्फत थेट शेतकऱ्यांना मदत मिळावी. त्या दृष्टीकोनातून खूप मोठी मोहिम हाती घेण्यात आली आहे. त्यामध्ये हेतू असा आहे की, शेतकऱ्यांना वेळेवर व त्यांच्यापर्यंत निधी मिळावा. यामध्ये काही लोक मदत करतो म्हणून सांगतात किंवा काही लोक दलाली करतात या सर्व अडथळ्यांमधून ही मदत थेट शेतकऱ्यांपर्यंत जावी म्हणून बँकांच्या मोहिमेला चालना देण्याच्या कामास केंद्र सरकारने सुरुवात केली आहे.

...5...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

डॉ.नीलम गोऱ्हे...

सभापती महोदय, ग्लोबल वार्मिंगचा अत्यंत महत्वाचा प्रश्न निर्माण झालेला आहे. हवामानात जे बदल झाले त्यामुळे मोठ्या प्रमाणात गेल्या काही वर्षात अवकाळी पाऊस व गारपीट होत आहे. त्यामुळे शेती व नागरी जीवनाची हालअपेष्टा होते. अशा पध्दतीचा धुमाकूळ ग्लोबल वार्मिंगमुळे चालू आहे. मी बऱ्याच मान्यवर सदस्यांची भाषणे ऐकली, काही सदस्यांनी याबाबत उल्लेख केला असेल किंवा काही सदस्य आपल्या भाषणात या बाबीचा उल्लेख करणार असतील. ग्लोबल वार्मिंगबाबत आपणाकडे ताबडतोब उपाययोजना करण्यासाठी कोणतेही उत्तर नाही. एका अर्थाने अस्मानी आणि सुलतानी संकट आहे. मला सुलतानी हे नाव आवडत नाही याची आपणाला कल्पना आहे, परंतु अस्मानी दूरवस्था निर्माण झाली आहे. याबाबत काय मार्ग काढता येईल याचा जगात विचार चालू आहे. यातून शेतकऱ्यांना खऱ्या अर्थाने कसा दिलासा देता येईल याचे शास्त्रिय तंत्रज्ञान आणि पर्यावरण संतुलन करण्यासाठी महाराष्ट्र शासन काही करु शकते किंवा नाही याबाबत फार मोठे प्रश्न चिन्ह आहे.

सभापती महोदय, गाव पातळीवर काही प्रमाणात शेतकऱ्यांपर्यंत मदत पोहचली आहे. वेगवेगळ्या प्रकारे सरकारने मदत देऊ केली आहे. 7 जानेवारी, 2015 रोजी 2000 कोटी रुपये व दुसऱ्या टप्प्यात 2000 कोटी रुपयांचे वाटप व त्यापैकी 803 कोटी व 9 लाख रुपये व आणखी 402 कोटी रुपये 8 जुलै रोजी महाराष्ट्रात वितरीत करण्यात आले आहेत. फेब्रुवारी आणि मार्च महिन्यात गारपिटीमुळे गहू व हरभरा या पिकांचे जे नुकसान झाले त्यासाठी काही मदत शासनाने दिली आहे. मी उस्मानाबाद व इतर काही जिल्ह्यातील शेतकऱ्यांशी बोलत असताना ही मदत फार तुटपुंजी व अपुरी आहे अशा प्रकारे सर्व शेतकऱ्यांनी सांगितले आहे.

या नंतर श्री.भोगले....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

डॉ.नीलम गोऱ्हे.....

ही अगदी थोडी मदतीची रक्कम पोहोचल्यामुळे शेतकऱ्यांच्या मनामध्ये अस्वस्थता आहे. एका बाजूला महाराष्ट्राचे अनेक प्रश्न आहेत. खास करुन विदर्भ, मराठवाडा, उत्तर महाराष्ट्रात शेतकऱ्यांची फार दुरवस्था झाली आहे. सन्माननीय सदस्य श्री.जयंत पाटील यांनी सांगितले की, माननीय मंत्री श्री.दिवाकर रावते विरोधी पक्षात असताना सातत्याने शेतकऱ्यांबद्दलची भूमिका मांडत होते. असा आग्रह धरण्याचे कारण नाही. माननीय महसूल राज्यमंत्री श्री.संजय राठोड आणि आम्ही 'देता का जाता' ही भूमिका घेऊन आंदोलन केले होते, त्यावेळी स्वत: श्री.संजय राठोड ट्रॅक्टर चालविण्यासाठी बसले होते. आम्ही नागपूरच्या हिवाळी अधिवेशनाच्या वेळी ट्रॅक्टरसह विधानभवनावर मोर्चा आणला होता. आमच्यावर केस दाखल केली गेली. पुढील काळात श्री.संजय राठोड हे महसूल राज्यमंत्री होतील हे आम्हाला तेव्हा माहीत नव्हते. 'देता का जाता' या संदर्भात काम करताना काही गोष्टींचे निरीक्षण दिसले. तुम्हाला सुध्दा त्या संदर्भात निश्चितपणे सांगता येईल.

सभापती महोदय, कर्ज मुक्ती ज्यांच्यासाठी काही मार्ग अपरिहार्य आहे तेवढी कर्जमाफी देता येईल. आमची सरकारला विनंती आहे की, जेवढी कर्जमाफी देता येईल तेवढी देण्यात यावी. गेल्या वेळी सरकारने कर्जमाफी जाहीर करताना 5 एकरची अट घातली होती. 5 एकरपेक्षा जास्त कोरडवाहू शेती असणाऱ्या शेतकऱ्यांना काय दिलासा मिळाला? मी टिकेसाठी टीका करणार नाही. अनेक शेतकरी 10 एकर, 12 एकर कोरडवाहू शेती असणारे आहेत, त्यात 5 एकरपर्यंतची मर्यादा असल्यामुळे ज्यांना संपूर्ण तंत्र माहीत होते त्यांनी फायदा घेतला. इतर शेतक-यांना त्या अर्थाने कर्जापासून मुक्ती मिळाली नाही. तात्पुरत्या स्वरुपातील माफी मिळाली. ज्याप्रमाणे आपण वैद्यकीय क्षेत्रात मल्टी ऑर्गन फेल्युअर शब्द वापरतो, त्याचप्रमाणे शरीरातील अनेक अवयव काम करणे थांबवितात आणि त्यानंतर व्यक्तीचा मृत्यू होतो तसे शेतकऱ्यांच्या आत्महत्यांचे स्वरुप दिसते. त्यामध्ये सातत्याने कोणाचाही आपल्याला आधार नाही या भावनेतून शेतकरी जात आहेत.

सभापती महोदय, आज अनेक मूलभूत प्रश्न आहेत. शेती मालाला योग्य भाव देण्याच्या संदर्भात केंद्र व राज्य सरकारकडून ज्या अपेक्षा आहेत त्या अपेक्षांची पूर्तता वेगाने झाली पाहिजे अशी आमची अपेक्षा आहे. नैसर्गिक संकटामुळे शेती मालाला योग्य भाव न मिळाल्यामुळे टोमॅटो

..2..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

डॉ.नीलम गोऱ्हे...

किंवा कांदा रस्त्यावर फेकून देण्याची, भाजीपाला उकिरड्यावर फेकून देण्याची परिस्थिती शेतकऱ्यांवर ओढवते. लक्षावधी शेतकऱ्यांनी सरकारला मतदान केले आहे. विधानसभेच्या सार्वत्रिक निवडणुकांमध्ये भारतीय जनता पक्ष आणि शिवसेना पक्ष वेगवेगळे लढले, ही वस्तुस्थिती आहे. लोकसभेच्या सार्वत्रिक निवडणुकांमध्ये आम्ही एकत्र लढलो. दोन्ही निवडणुकांमध्ये लाखो शेतकऱ्यांनी सरकारला मतदान केलेले आहे. आम्ही सभा पहिल्या आहेत. स्वतः माननीय पंतप्रधान श्री.नरेंद्र मोदी यांची सोलापूर येथे सभा झाली, त्या सभेला मी उपस्थित होते. ज्याप्रकारे शेतकऱ्यांनी भावी पंतप्रधानांवर विश्वास दाखविला होता त्या शेतकऱ्यांना निवडणुकीच्या अगोदर सामोरे जायचे आहे ही जाणीव आणि भावना निश्चितपणे सरकारमध्ये असेल अशी मला खात्री आहे. त्या दृष्टीने शेतकऱ्यांना सामोरे जाण्यासाठी आपण कशाप्रकारे दिलासा देतो हे आम्हाला समजून घ्यायचे आहे.

सभापती महोदय, कॅबिनेटमध्ये चर्चा होत असताना वाद होतात. माननीय मंत्री श्री.दिवाकर रावते व माननीय मंत्री श्री.रामदास कदम यांच्या स्वभावावरुन ते कॅबिनेटमध्ये बोलणार नाहीत असे वाटते का? ते शिवसैनिक आहेत. ते मुख्यमंत्र्यांसमोर कॅबिनेटमध्ये सातत्याने भूमिका मांडतात. सभागृहात बोलले नाहीत म्हणून त्यांच्या हेतूबद्दल शंका घेण्याचे कारण नाही. आज माननीय सदस्य श्री.महादेव जानकर, प्रा.अनिल सोले मंत्रिमंडळात नाहीत, याचा अर्थ मुख्यमंत्र्यांकडे किंवा कृषी मंत्र्यांकडे गेल्यानंतर ते म्हणणे मांडत नाहीत, सत्तेवर आल्यानंतर ए.सी.कॅबिनमध्ये बसले आहेत असा भाग अजिबात नाही. प्रत्येक आमदार, खासदार सरकारकडून अपेक्षा करीत आहेत की, शेती मालाला भाव मिळावा, कर्ज मुक्तीसाठी महत्वाचे पाऊल उचलले जाईल, बँकांच्या व्यवहाराचे सुलभीकरण करणे यांचा त्यात समावेश आहे. आज बँकेत गेल्यानंतर त्या बँकेचे अध्यक्ष कोण आहेत, अधिकारी कोण आहेत याच्यात मला जायचे नाही. परंतु मूलभूत प्रश्न हा आहे की, एखादा शेतकरी कामासाठी बँकेत गेल्यानंतर त्याचे काम होणार की नाही यासाठी त्याच्यावर हेलपाटे मारण्याची वेळ का यावी? शहरामध्ये फोन केल्यानंतर घरपोच दूध, धान्य पाठविले जाते. मग शेतकऱ्यांनी फोन केल्यानंतर बँकांकडून किती प्रतिसाद मिळतो?

सभापती महोदय, बँका सक्षम होत असताना शेतकऱ्यांशी त्यांनी जेवढ्या संवेदनशीलतेने वागले पाहिजे, त्या प्रमाणात वागत नाहीत. यवतमाळ येथील श्रीमती ताजणे यांच्या आत्महत्येच्या



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

डॉ.नीलम गोऱ्हे...

घटनेवरुन स्पष्ट चित्र दिसून येते. त्यांच्या नावाने बँकेत 50 हजार रुपये ठेव ठेवली होती. ठराविक परिस्थितीत संकट आले तरच हे पैसे काढता येतील असे सांगण्यात आले. संकट आले की नाही हे त्या बाईने कसे सिध्द करायचे? बँकेच्या नियमात तिने स्वतःचे दुःख बसवून पाहिले, ते न जमल्यामुळे तिने आत्महत्या केली असावी.

सभापती महोदय, मला काही उपाय सुचवावयाचे आहेत. बँकांच्या सुलभीकरणाबरोबर सरकारकडून काही अपेक्षा आहेत. मी मार्गदर्शन म्हणणार नाही. परंतु दुष्काळी परिस्थितीत आत्महत्या झालेल्या शेतकऱ्यांच्या कुटुंबांना शिवसेना पक्ष प्रमुखांनी भेट दिली. त्यांच्यासोबत स्थानिक आमदार होते. अनेकदा शिवेसना पक्षावर विरोधी पक्षाकडून टीका केली जाते की, यांना शेतीतले काय कळते? आज सभागृहातील नेत्यांनी शेतीतले कळते याचे वारंवार सर्टिफिकेट दिल्याबद्दल आभार मानते.

सभापती महोदय, मी काही उपाययोजना सुचवू इच्छिते. माननीय मुख्यमंत्री श्री.देवेंद्र फडणवीस यांनी मध्यंतरी जाहीर केले की, सचिवांचा एक गट वेगवेगळया जिल्हयांसाठी नियुक्त केला आहे. त्या अधिकाऱ्यांनी त्या त्या जिल्हयांमध्ये जाऊन शेतकऱ्यांसाठीच्या योजनांची अंमलबजावणी झाली की नाही याचा आढावा घ्यायचा आहे. हे सचिव त्या जिल्हयामध्ये केव्हा जातात, केव्हा येतात, काय आढावा घेतात, स्थानिक आमदारांना भेटतात का? मग ते आमदार कोणत्याही पक्षाचे असोत. माझी सूचना आहे की, सचिव ज्यावेळी जिल्हयामध्ये जातात त्यावेळी त्यांनी स्थानिक आमदारांबरोबर निदान दोन तास बैठक घेतली पाहिजे. त्यांच्या ज्या तक्रारी आहेत, तहसीलदार काम करीत नसतील, बियाणे वेळेवर मिळाले नसेल तर त्याचा पाठपुरावा सचिव स्तरावर झाला की नाही हे बघण्याचे काम कॅबिनेट करु शकते. म्हणून सचिवांच्या दौऱ्याच्या वेळी स्थानिक आमदारांना निमंत्रित करुन त्याबद्दलची सूचना विधानसभा आणि विधान परिषद आमदारांना सरकारकडून दिली गेली पाहिजे. जिल्हा परिषद, पंचायत समितीच्या सदस्यांवर कृषी विषयक योजना राबविण्याची जबाबदारी असते. ग्रामीण भागातील सदस्यांना कागदोपत्री मोठया प्रमाणात सामावून घेतले जाते. माझी सरकारला सूचना आहे, सरकारने अंमलात आणल्यास आनंद होईल. काही कारणामुळे त्रुटी राहिल्या तर जरुर सांगेन. शिवसेनेच्या माध्यमातून आम्ही

...4..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

डॉ.नीलम गोऱ्हे...

जरूर असे प्रयत्न करणार आहोत. प्रत्येक तालुक्यात सरकारला पर्यायी मदत करणारी यंत्रणा उभी करण्यात यावी. 10 लोकांचा गट करुन तो महसूल, कृषी, जलसंधारण, सहकार व ग्रामविकास या खात्यांच्या एकत्रित प्रयत्नातून सरकारला मदत करेल. 1972 मध्ये ज्याप्रमाणे दुष्काळ निवारण समित्या करुन त्यात सामाजिक संस्थांचे कार्यकर्ते सामावून घेतले. तशा प्रकारे सरकारने जनतेचे म्हणणे ऐकून घेणारी यंत्रणा उभी केली पाहिजे असे मला वाटते. प्रत्येकजण पालकमंत्र्यांकडे जाऊन स्वतःचे म्हणणे मांडू शकत नाही. गाव पातळीवर शेतकऱ्यांचे जे समूह आहेत. आम्ही दौरा नसताना गावामध्ये गेलो की गावातील गरीब माणूस आहे त्याच्याशी कोणी नीट बोलत नाही असे दिसते. पक्षाचे कार्यकर्ते बोलतील. परंतु सरकारी कार्यालयात, पोलीस ठाण्यामध्ये या माणसाशी कोणी बोलायला तयार नसतो. आत्महत्या केलेल्या शेतकऱ्याच्या पत्नीला विचारण्यात आले की, तूझा नवरा दारु प्यायचा का? ती म्हणाली, कधी तरी अधून मधून प्यायचा. त्यावरुन तिचा नवरा व्यसनाधीन होता असा निष्कर्ष काढण्यात आला. म्हणून महसूल विभागाची ग्रामीण स्तरावरील यंत्रणा आहे त्यामध्ये चांगल्याप्रकारे लक्ष घालण्याची आवश्यकता आहे. प्रत्येक जिल्हा स्तरावर आढावा घेतला पाहिजे. स्त्री पुरुष कर्जामुळे किंवा अन्य कारणामुळे दबावाखाली गेले आहेत. त्यांच्यासाठी समुपदेशनाची यंत्रणा उभी केली पाहिजे असे मला सांगावेसे वाटते.

नंतर वाय.1...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

डॉ.नीलम गोऱ्हे....

महाराष्ट्रातील सर्व भागांमध्ये जवळपास 2 लाखाच्यावर आत्महत्या झालेल्या आहेत. विदर्भ, मराठवाड्यात देखील आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांची संख्या भरपूर आहे. माझ्या माहिती प्रमाणे मराठवाड्यातील आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांची संख्या सातत्याने वाढते आहे. त्यामुळे मला नेहमी प्रश्न पडतो की, आत्महत्या झाल्यानंतर त्या कुटुंबात पुढे काय घडत असले ? मी काही गावांमध्ये पाहिले की, शेतकऱ्यांच्या विधवा सासरी आपल्या सासू-सासऱ्यांसमवेत राहात आहेत. आज ती बाई सासू-सासऱ्यांची आधार बनली आहे. ती बाई आज शेती करण्याचा थोडा प्रयत्न करीत आहे. जर आत्महत्याग्रस्त शेतकऱ्याच्या नावावर जमीन नसेल पण त्याच्या वडिलांच्या नावावर असेल तर त्याला शेतकरी धरले जावे असे नेहमी म्हणतो. पण त्याची किती केसमध्ये अंमलबजावणी झाली हे देखील पाहणे आवश्यक आहे. खरे तर आत्महत्या होऊ नयेत यासाठी प्रयत्न झाले पाहिजेत. पण दुर्दैवाने दोन लाखाच्या वर आत्महत्या झालेल्या आहेत. या सर्व आत्महत्याग्रस्त कुटुंबियांसाठी मदत केली पाहिजे. 1993 मध्ये लातूर येथे भूकंप झाल्यानंतर दहा हजार विधवांची संख्या पुढे आली. यातील अनेक स्त्रियांनी कधी शेतीची कामेच केली नव्हती. त्या फक्त मदतीसाठी जात होत्या. त्यांना बियाणे, खते कुठून आणायचे हे देखील माहीत नव्हते. या विधवांसाठी दहा वर्षे यंत्रणा काम करीत होती. सुरूवातीला श्री.शरद पवार हे मुख्यमंत्री होते. त्यानंतर श्री.मनोहर जोशी हे मुख्यमंत्री झाले. 1993 ते 1998 या कालावधीत भूकंपग्रस्तांच्या पुनर्वसनासाठी सरकारने कार्यक्रम राबविला होता. माझी अशी सूचना आहे की, आत्महत्याग्रस्त कुटुंबातील जी पीडित मुले आहेत, महिला आहेत त्यांच्यासाठी प्राधिकरण किंवा टास्क फोर्स किंवा यंत्रणा राज्यापासून गावा पर्यंत उभी केली पाहिजे. त्याद्वारे आपल्याला योग्य अंमलबजावणी करता येऊ शकेल. विविध महसुली विभागामध्ये टास्क फोर्स आहेत. बँकाचा विषय केंद्र सरकारशी संबंधित असला तरी त्यात खासदार आणि केंद्र सरकारशी संबंधित असलेल्या अधिकाऱ्यांना देखील सामावून घ्यावे लागेल.



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

डॉ.नीलम गोऱ्हे....

काल पासून शिवसेनेवर सातत्याने कॉमेंटस सुरू आहेत. दुसऱ्या सदनातील माननीय आमदारांनी बोलत असताना असा उल्लेख केला किंवा अनेक लोक आमच्यावर टीका करताना म्हणतात की, आपण सत्तेसाठी लाचार आहात. आपण सत्ता का सोडत नाही. या सदनामध्ये गेली 15 वर्षे अनेक घोटाळ्यांवर चर्चा झाली. सत्ता परिवर्तन झाल्यानंतर वेगळे काम करण्याची संधी मिळाली आहे म्हणून आम्ही सरकारमध्ये आहोत. सातत्याने सांगितले जात आहे की, आपण विरोधी पक्षात येऊन बसावे व चांगली भाषणे करावीत. मला असे वाटते की, ती संधी आता आपणाला मिळाली आहे. आपण जर श्री.रावते साहेबांना आदर्श मानत असाल तर आपण त्यांच्या सारखी चांगली भाषणे करावीत व सरकारला मार्गदर्शन करावे. मराठीत एक म्हण आहे. आपण कृपा करून वाईट वाटून घेऊन नका. मी येथे व्यक्तीवर बोलत नसून प्रवृत्तीवर बोलत आहे. शिंक्याचे तुटले आणि बोक्याचे फावले अशी मराठीत म्हण आहे. त्यामुळे भाजप-शिवसेनेमधील विसंवादाचा उपयोग आपण करू नये. आमचे मतभेद केवळ इश्यूजवर आहेत. प्रत्येक गोष्टीमध्ये सत्तेचा फायदा घेण्यासाठी सत्तेला चिकटून बसलेल्या अपप्रवृत्तीवर मी बोलत आहे. तेव्हा काही विषयांमध्ये राजकारण न करता एकत्र काम केले पाहिजे. मी येथे 1972 च्या दुष्काळाचा उल्लेख केला आहे. श्री.शरद पवार, श्री.सुधाकरराव नाईक, श्री.मनोहर जोशी मुख्यमंत्री असताना अनेक विषयांवर सर्व पक्षीय कार्यक्रम झाले. पण गेल्या काही वर्षातील चित्र पाहिले तर असे दिसून येते की, आता फार राजकीय स्वरूप सगळ्या दौऱ्यांना आणि बैठकांना येत आहे. तेव्हा सर्व पक्षीय समित्या करून सर्वांनी मिळून या संकटाचा मुकाबला केला पाहिजे अशी माझी सरकारकडून अपेक्षा आहे. धन्यवाद. जय हिंद, जय भीम, जय महाराष्ट्र.

.....

..3

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.चंद्रकांत रघुवंशी (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, विरोधी पक्षातर्फे नियम 260 अन्वये जो प्रस्ताव मांडला आहे, त्यावर माझे विचार मांडण्यासाठी मी उभा आहे.

खरे म्हणजे या अधिवेशनाचे नाव बदलण्याची वेळ आता आली आहे. आज आपण आपल्या डोळ्या देखत अत्यंत वाईट परिस्थिती बघत आहोत. आपले पावसाळी अधिवेशन सुरू आहे. पूर्ण आठवडाभरामध्ये या मुंबईतसुद्धा एक थेंब पाऊस पडला नाही. संपूर्ण महाराष्ट्रामध्ये देखील गेल्या आठवडाभरामध्ये पाऊसच पडला नाही. पण आमच्या अधिवेशनाचे नाव पावसाळी अधिवेशन आहे. एवढी भीषण परिस्थिती असताना, भीषण प्रश्नावर चर्चा करीत असताना सन्माननीय सदस्य श्री.भाई गिरकर म्हणाले की, विरोधी पक्षामुळे साडे तीन दिवस वाया गेले. माझी विनंती आहे की, माननीय मुख्यमंत्री पहिल्याच दिवशी आले असते आणि ते साडेतीन शब्दच बोलले असते की, मी असे बोललोच नाही तर मग हे सभागृह देखील चालले असते हे देखील मान्य करावे लागेल. पण दुर्दैवाने तेवढे गांभीर्य आपण देखील दाखविले नाही, हे आपणाला देखील मान्य करावे लागेल. वृत्तपत्र व इलेक्ट्रॉनिक मीडियाच्या माध्यमातून सातत्याने चर्चा होत असताना सत्ताधारी पक्षाने साडेतीन दिवसात गांभीर्य दाखविले नाही.

सभापती महोदय, माननीय सहकार मंत्री येथे बसलेले आहेत. आज सहकारी बँकांची स्थिती अत्यंत वाईट आहे. खानदेशची राजधानी जळगाव आहे. जळगावमध्ये दोन कॅबिनेट मंत्री आहेत. खानदेशात सगळ्यात जास्त आत्महत्या जळगावमध्येच होत आहेत. धुळे-नंदुरबार जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेने शेतकऱ्यांकडून कर्ज वसूल करून घेतले. परंतु, त्यांना पुन्हा कर्ज दिलेच नाही. बँक गॅरंटी दिली नसल्यामुळे एम.एस.सी.बँकने कर्ज दिले नाही असे त्यांचे म्हणणे आहे. आज धुळे व नंदुरबार जिल्ह्यातील शेतकऱ्यांना स्वतःकडील सोने किंवा शेतीवाडी गहाण ठेवून कर्ज घ्यावे लागत आहे, ही वस्तुस्थिती आहे. मी स्वतः त्या बँकेचा डायरेक्टर आहे. धुळे-नंदुरबार जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेने स्वनिधीतून 102 कोटी रुपयांचे वाटप केले. त्यावर एम.एस.सी.बँकने दोन रुपये देखील दिलेले नाहीत. त्यांनी सांगितले की, 90 कोटी रुपये आपण डिपॉझिट म्हणून ठेवावेत किंवा सरकारने गॅरंटी द्यावी. पण सरकारने दोन ओळीची गॅरंटी दिली नाही.



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.चंद्रकांत पाटील : सभापती महोदय, राज्य सहकारी बँकचे चेअरमन श्री.अग्रवाल यांचा या विषयामध्ये आग्रह होता की, जेवढ्या आपण एफ.डी.ठेवाल तेवढाच निधी मिळेल. ते त्यांच्या लेव्हलला बरोबर होते. पण त्यांचा हा रोल पाहता दहा दिवसांपूर्वीच त्यांच्या जागा नाबार्डचे निवृत्त अधिकारी श्री.सुखदेव यांना आणलेले आहे. त्यांनी आता निर्णय केला आहे की, जिल्हा सहकारी बँकांना राज्य सहकारी बँकांकडे ठेवी ठेवाव्या लागणार नाहीत. त्यानंतर मंत्रिमंडळाची बैठक होऊन नाबार्डला 500 कोटी रूपयांची हमी देण्यात आली आहे. त्यामुळे एक-दोन दिवसात पैसे रिलीज होतील असे मला वाटते.

श्री.चंद्रकांत रघुवंशी : सभापती महोदय, मी आता बोले पर्यंत तरी अजून काही झालेले नाही असे मला वाटते. ते आपणासही मान्य करावे लागेल. एम.एस.सी.बँकेचे प्रशासक ऐकत नव्हते हे देखील मला मान्य आहे. त्यांचे म्हणणे होते की, सरकारने गॅरंटी दिल्याशिवाय पैसे देण्यात येणार नाही. त्यामुळे आमची येथून बदली करावी. आम्हाला येथून काढण्याची भूमिका देखील त्यांनी घेतली होती. दुर्दैवाने शेतकऱ्याला मदत करण्याच्या दृष्टीने वाईट 2-3 महिने परिस्थिती निर्माण झाली. शेतकऱ्याजवळ पैसे नव्हते. त्याने इकडून तिकडून गोळा करून पैसे आणले आणि बियाणे शेतात पेरले. माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी 25 दिवसांचा उल्लेख केला आहे. पण आज 28 दिवस होऊन देखील पाऊस पडला नाही. आज पिके हवेमध्ये अक्षरशः उडून जात आहेत ही वस्तुस्थिती आहे. अशा परिस्थितीत त्या शेतकऱ्याला दिलासा देणे हे सरकारचे काम आहे. सरकार किती दिवस सांगणार आहे की, तिजोरीमध्ये ठणठणात आहे.....

**तालिका सभापती (प्रा.जनार्दन चांदूरकर) :** सभागृहाची वेळ सायंकाळी 6.00 वाजता संपणार आहे. आता सन्माननीय सदस्य श्री.चंद्रकांत रघुवंशी ऑन लेग आहेत. त्यानंतर सन्माननीय सदस्य प्रा.जोगेंद्र कवाडे यांची सदर प्रस्तावावर बोलण्यास अनुमती मिळण्यासंबंधातील विनंती आली आहे. तेव्हा सभागृहाच्या कामकाजाचे नियोजन करण्यासाठी आपण मला सहकार्य करावे. यानंतर आपल्याला कागदपत्रे पटलावर देखील ठेवायची आहेत. सन्माननीय सदस्य श्री.चंद्रकांत रघुवंशी यांचे भाषण झाल्यानंतर कागदपत्रे पटलावर ठेवण्यात येतील. त्यानंतर सभागृहाचे कामकाज दिवसभरासाठी स्थगित करण्यात येईल. आता मी सभागृहाच्या अनुमतीने दहा मिनिटांसाठी सभागृहाची वेळ वाढवित आहे.

यानंतर श्री.जुन्नरे....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. चंद्रकांत रघुवंशी : सभापती महोदय, आमच्या जिल्हयातील शेतकऱ्यांची परिस्थिती अत्यंत दयनीय झालेली आहे. शेतकऱ्याकडे जे काही होते त्यातून त्यांनी पेरणी केली, पीक उगवले परंतु पाणी भरण्यासाठी शेतकरी शेतात जातो परंतु लोड शेडींगमुळे त्याला त्याच्या पिकाला पाणी देता येत नाही. विहिरीत असलेले पाणी लोड शेडींगमुळे शेतकऱ्याला देता येत नाही. त्यामुळे माझी शासनाला विनंती आहे की, अशा अडचणीच्या परिस्थितीमध्ये तरी लोड शेडींग बंद झाले पाहिजे. आमच्या शासनाच्यावेळी आपण लोड शेडींगच्या संदर्भात फार काही बोलत होता, त्यामुळे ठराविक काळासाठी तरी लोड शेडींग बंद करण्याच्या सूचना मंत्री महोदयांनी तात्काळ द्याव्यात अशी माझी विनंती आहे.

सभापती महोदय, आपल्याला केवळ सिंचनाच्या भ्रष्टाचारावर बोलून चालणार नाही. सिंचनाच्या भ्रष्टाचाराचा उल्लेख करुन सिंचनाची सर्व कामे बंद करण्यात आली आहेत. आमच्या जिल्हयाला वरदान ठरणारी उपसा सिंचन योजनेचे काम जेमतेम चालू झाले, 8 कि.मी.ची पाईप लाईन टाकली गेली. परंतु आता ही सर्व कामे रेंगाळली गेली आहेत. केवळ सिंचनातील भ्रष्टाचाराचे कारण पुढे करुन सिंचनाची कामे बंद करण्यात आलेली आहेत. त्यामुळे माझी शासनाला विनंती आहे की, ज्या ठिकाणी अवर्षण प्रवण क्षेत्र आहे, डीपीएपीचे क्षेत्र आहे, ज्या ठिकाणी सातत्याने दुष्काळ पडतो अशा भागातील सिंचनाच्या कामांना प्रायोरिटी देणे महत्वाचे आहे. केवळ काम 75 टक्के झाले असेल तर ते पूर्ण करण्यापेक्षा भौगोलिक परिस्थितीचा विचार करुन त्या भागातील सिंचनाची कामे तात्काळ सुरु कशी करता येतील यासाठी सरकारने प्रयत्न करणे गरजेचे आहे.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्या श्रीमती शोभा फडणवीस यांचे भाषण ऐकल्यानंतर सरकारचे कर्जमाफीच्या संदर्भात धोरण काय राहणार आहे हे लक्षात येते. सरकार शेतकऱ्यांची कर्जमाफी करणार नाही असे आम्हाला आता वाटू लागले आहे. हे शासन शेतकऱ्यांच्या तोंडाला पाने पुसल्याशिवाय राहणार नाही असे वाटते. या शासनाकडून शेतकऱ्यांच्या खूप अपेक्षा आहेत. या सरकारने ज्या काही सभा घेतल्या त्या सभेमध्ये लोक विनाकारण आले नाहीत. या शासनावर श्रध्दा ठेवून, विश्वास ठेवून लोकांनी तुमच्या सभेला मोठा प्रतिसाद दिला होता. परंतु आज काय परिस्थित्ी आहे? शेतीमालाच्या आधारभूत किमतीला किंवा उत्पादन खर्चावर आधारित आपण दर

..2..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. चंद्रकांत रघुवंशी ......

देणार होता. शेतकऱ्याला उत्पादन किमतीपेक्षा 50 टक्के जास्त फायदा होईल असे वाटत होते.

सभापती महोदय, आमच्या भागात सर्वात जास्त कापूस पिकतो. 3200 ते 3800 रुपये या दराने सीसीआय कडे कापूस विकला गेला. आमच्या सरकारच्या वेळेस कापसाला 6.5 हजार रुपये दर मिळत होता. यावर्षी मात्र कापसाला 4 हजाराच्या वर दर मिळाला नाही. जेव्हा शेतकऱ्याजवळचा कापूस संपला तेव्हा मात्र बाजारामध्ये कापसाची किंमत वाढली. कापसाची किंमत जेव्हा वाढली तेव्हा दुर्दैवाने शेतकऱ्याच्या घरात कापूस नव्हता हे आपल्याला मान्य करावे लागेल. शासनाचे धोरण चुकल्यामुळे आमचा शेतकरी अडचणीत येतो त्याचाही या शासनाने विचार करण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदय, गोहत्या बंदीचा कायदा फार पूर्वीपासून आहे. परंतु या शासनाने आता गोवंश हत्त्या बंदीचा कायदा केला आहे. परंतु या कायद्याची पर्यायी व्यवस्था या सरकारने करावयास पाहिजे होती ती केलेली नाही. शासन गोवंश कायद्याची कठोर अंमलबजावणी करीत आहे. खरे म्हणजे आतापर्यंत जनावरांच्या छावण्यांची सुरवात व्हावयास पाहिजे होती. यासंदर्भात माझे वैयक्तिक मत असे आहे की, पोलिसांना आपण नव्याने हप्ता खाण्याचे कुरण निर्माण करुन दिले आहे. आज गोवंश हत्या बंदीचा कायदा असला तरी खरोखर गोवंश हत्त्या बंदी थांबली आहे काय ? आजही जे व्यवसाय करतात ते करीतच आहेत. पोलिसांच्या संगनमताने गोवंश हत्त्या सुरु आहे. नगरपालिका किंवा महानगरपालिकेचे कत्तलखाने बंद झाल्यामुळे लोकांनी घरामध्ये हा व्यवसाय करण्यास सुरुवात केली आहे. पोलिसांना हप्ता दिला तर ग्रामीण भागात सायकल-मोटरसायकलवरुन मांस विकले जाते. ग्रामीण भागातील लोक गरीब असल्यामुळे व मटनापेक्षा हे मांस स्वस्त असल्यामुळे ते खात असतात. केवळ लोकप्रियतेसाठी कायदे करुन ते चालत नाही तर कायद्यांची अंमलबजावणी करणे आवश्यक असते. या कायद्यामुळे आज शेतकऱ्याला कोणते चटके बसत आहेत त्याचा सरकारने विचार करण्याची आवश्यकता आहे. शेतकऱ्यांसाठी व्यवस्था केली तर यातून निश्चितपणे मार्ग निघू शकतो. शेतकऱ्यांच्या भाकड जनावरांसाठी शासनाने तात्काळ छावण्या सुरु केल्या पाहिजेत अशी माझी आग्रहाची मागणी आहे.

..3...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. चंद्रकांत रघुवंशी .....

सभापती महोदय, शासन सबसीडी कमी करीत चालले आहे. युरीयाची सबसीडी सुध्दा शासनाने कमी केली आहे.

सभापती महोदय, शेतकऱ्यांच्या कर्जमाफीचा पहिला उद्देश सरकारने डोळयासमोर ठेवला पाहिजे. महाराष्ट्रातील शेतकरी या शासनावर आणि आमच्यावरही काही प्रमाणात टीका करीत आहे.शासनाकडून शेतकऱ्याच्या काही अपेक्षा आहेत. शासन म्हणून आपली सुध्दा काही जबाबदारी आहे. आम्हाला 38 हजार कोटीचे व्याज भरावे लागते असे सांगून चालणार नाही, तर शेतकऱ्याला आपण किती मदत करु शकतो याची जबाबदारी सरकारने स्वीकारली पाहिजे. आमची एवढीच मागणी आहे की, आता पाऊस नसल्यामुळे शेतकरी दुबार पेरणी करु शकत नाही. इकडचा सूर्य तिकडे झाला तरी दुबार पेरणी होऊ शकत नाही. पाऊस पडेल याची कोणी गॅरंटी देऊ शकत नाही. त्यामुळे जवळचे असलेले संपवून टाकावयाचे अशी चूक सर्वसामान्य शेतकरी आता करणार नाही. आता शेतकऱ्याचे खरीपाचे आणि रब्बीचेही पीक गेले आहे. आमच्या सरकारने ज्या प्रमाणे शेतकऱ्यांचे कर्ज माफ केले होते त्याच धर्तीवर या शासनानेही शेतकऱ्यांचे सरसकट कर्ज तात्काळ माफ करावे अशी मी मागणी करुन माझे दोन शब्द पूर्ण करतो.

जय हिंद, जय महाराष्ट्र.

--------



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी.:**लेखी उत्तरे

**मु.शी.:**तारांकित प्रश्नोत्तराच्या याद्या सभागृहासमोर ठेवणे.

**उप सचिव :** सभापती महोदय,मी आपल्या अनुमतीने सोमवार दिनांक 13 जुलै, मंगळवार दिनांक 14, जुलै व बुधवार दिनांक 15 जुलै, 2015 रोजीच्या तारांकित प्रश्नोत्तराच्या याद्या सभागृहासमोर ठेवत आहे.

**तालिका सभापती** (प्रा.जनार्दन चांदूरकर)**:** सोमवार दिनांक 13 जुलै, मंगळवार दिनांक 14, जुलै व बुधवार दिनांक 15 जुलै, 2015 रोजीच्या तारांकित प्रश्नोत्तराच्या याद्या सभागृहासमोर ठेवण्यात आल्या आहेत.

(प्रेस:येथे सोबत जोडलेल्या याद्या छापाव्यात.)

----

**...5....**

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी./मु.शी.** : अध्यादेश सभागृहासमोर ठेवणे.

डॉ. रणजित पाटील (नगरविकास राज्यमंत्री) **:** सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील अध्यादेश सभागृहासमोर ठेवतो.

(क) सन 2015 चा अध्यादेश क्रमांक 5 - महाराष्ट्र लोकसेवा हक्क अध्यादेश, 2015.

(ख) सन 2015 चा अध्यादेश क्रमांक 6 - महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना (सुधारणा) अध्यादेश, 2015.

(ग) सन 2015 चा अध्यादेश क्रमांक 13 - मुंबई महानगरपालिका (सुधारणा) अध्यादेश, 2015.

**तालिका सभापती**: अध्यादेश सभागृहासमोर ठेवण्यात आले आहेत.

-----

...6...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**सांताक्रुझ येथील सिलेंडर स्फोटाची घटना कव्हर करण्यासाठी गेलेल्या महिला पत्रकारावर करण्यात आलेला हल्ला**

डॉ. रणजित पाटील : सभापती महोदय, माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी औचित्याच्या मुद्याच्या अनुषंगाने सातांक्रुझ येथे पत्रकारांवर भ्याड हल्ल्याचा उल्लेख केला होता त्यासंदर्भात मी निवेदन करु इच्छितो.

सांताक्रुझ येथे सिलेंडर ब्लास्टची घटना कव्हर करण्यासाठी गेलेल्या पत्रकारांना तेथील लोकल गुंडांनी धक्काबुक्की करुन घटना कव्हर करण्यासाठी मज्जाव केला. या घटनेमध्ये मनुश्री पाठक या महिला पत्रकारासह इतर पत्रकारांनाही धक्काबुक्की करण्यात आली, हे निषेधार्ह आहे. विशेषत: महिला पत्रकारांवर हल्ला हा भ्याड हल्ला असून शासन पत्रकारावरील हल्ल्याचा निषेध करीत आहे. महिलांना सन्मानाने वागवण्याच्या भारतीय संस्कृतीला काही समाजकंटकानी पायदळी तुडवून हे कृत्य केल्याचे दिसते. या संपूर्ण घटनेचा तीव्र शब्दात निषेध करत, पत्रकारांच्या संरक्षणार्थ शासन कटिबध्द असून या दृष्टीने उचित कारवाई केली जाईल.

सभापती महोदय, फिर्यादीने वाकोला पोलीस स्टेशनमध्ये गेले. तेथे झीरो डायल करुन, फिर्यादीच्या तक्रारीवरून आयपीसी 354,509,323,143,146 आणि 189 अन्वये गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे.

---

यानंतर श्री. अजित.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.धनंजय मुंडे : सभापती महोदय, या गंभीर घटनेबाबत सरकारकडून निवेदन करण्यात आले. माझी सरकारला विनंती आहे की, ही व्हिडिओ क्लिप सोशल मीडियावर व्हायरल होत आहे. त्या व्हिडिओ क्लिपमध्ये त्या गुन्हेगारांचे चेहरे स्पष्ट दिसत आहेत. तेव्हा या आरोपींना लवकरात लवकर पकडावे. कारण ही घटना घडून बराच कालावधी झालेला आहे. मुंबईतील सांताक्रुझ भागात ही घटना घडली आहे. सरकारने आरोपींना लवकरात लवकर अटक करुन त्यांच्यावर कारवाई करावी.

डॉ.रणजित पाटील : सभापती महोदय, याबाबतीत दूरध्वनीवरुन दोन-तीन वेळा संपर्क झालेला आहे आणि तशा सूचना देखील निर्गमित करण्यात आलेल्या आहेत. या आरोपींबाबत जी काही कायदेशीर कारवाई असेल मग त्यामध्ये त्यांना अटक करण्याची गरज असेल, तर ती देखील करण्यात येईल.

-----

..2..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी./मु.शी.:** कागदपत्रे सभागृहासमोर ठेवणे

(पुढे सुरु....)

श्री.संजय राठोड (महसूल राज्यमंत्री ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने खालील अध्यादेश सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

(क) सन 2015 चा अध्यादेश क्रमांक 11- महाराष्ट्र करमणूक शुल्क (सुधारणा) अध्यादेश, 2015

(ख) सन 2015 चा अध्यादेश क्रमांक 12 - महाराष्ट्र जमीन महसूल संहिता (सुधारणा) अध्यादेश, 2015

(ग) सन 2015 चा अध्यादेश क्रमांक 15- महाराष्ट्राचा मासेमारीबाबत (सुधारणा) अध्यादेश, 2015

**तालिका सभापती** : अध्यादेश सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहेत.

----------



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी./मु.शी.:** विधेयकांना संमती व अधिसंमती

**तालिका सभापती** : दोन्ही सभागृहांनी संमत केलेल्या विधेयकांना राष्ट्रपतींची/राज्यपालांची अधिसंमती मिळाल्यासंबंधीची यादी सचिव वाचून दाखवतील.

उप सचिव : (अ) खालील विधेयकाला राष्ट्रपतींची अधिसंमती मिळाली :-
सन 2013 चे वि.स.वि.क्र 41 - भारतीय वन (महाराष्ट्र सुधारणा) विधेयक, 2013

(ब) खालील विधेयकांना राज्यपालांची अधिसंमती मिळाली :-

(1) सन 2015 चे वि.स.वि.क्रमांक 2- महाराष्ट्र महानगरपालिका आणि महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी (सुधारणा) विधेयक, 2015

(2) सन 2015 चे वि.स.वि.क्रमांक 3 - महाराष्ट्र पोलीस (सुधारणा) विधेयक, 2015.

(3) सन 2015 चे वि.स.वि.क्रमांक 4- महाराष्ट्र ग्रामपंचायत (सुधारणा) विधेयक, 2015

(4) सन 2015 चे वि.स.वि.क्रमांक 5 - महाराष्ट्र विद्यापीठ (सुधारणा) विधेयक, 2015.

(5) सन 2015 चे वि.स.वि.क्रमांक 6- नांदेड शीख गुरुद्वारा सचखंड श्री हजूर अपचलनगर साहिब (सुधारणा) विधेयक, 2015

(6) सन 2015 चे वि.स.वि.क्रमांक 8 - महाराष्ट्र (नागरी क्षेत्रे) झाडांचे संरक्षण व जतन (सुधारणा) विधेयक, 2015

(7) सन 2015 चे वि.स.वि.क्र. 10 - महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीवसंरक्षक उपाययोजना (सुधारणा) विधेयक, 2015

(8) सन 2015 चे वि.स.वि.क्रमांक 13 - महाराष्ट्र विनियोजन (लेखानुदान) विधेयक, 2015.

..4..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

उप सचिव......

(9) सन 2015 चे वि.स.वि.क्रमांक 16 - महाराष्ट्र करविषयक कायदे (कर बसविणे, सुधारणा व विधिग्राह्यीकरण) विधेयक, 2015.

(10) सन 2015 चे वि.स.वि.क्रमांक 17 - महाराष्ट्र महानगरपालिका (सुधारणा) विधेयक, 2015.

(11) सन 2015 चे वि.स.वि.क्रमांक 18 - महाराष्ट्र विनियोजन विधेयक, 2015.

(12) सन 2015 चे वि.स.वि.क्रमांक 21- महाराष्ट्र जमीन महसूल संहिता (सुधारणा) विधेयक, 2015.

(13) सन 2015 चे वि.स.वि.क्रमांक 23 - महाराष्ट्र मुद्रांक (सुधारणा) विधेयक, 2015.

(14) सन 2015 चे वि.प.वि.क्रमांक 4 - महाराष्ट्र महानगरपालिका आणि महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी (दुसरी सुधारणा ) विधेयक, 2015.

---------



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी./मु.शी.:** अशासकीय विधेयके आणि ठराव समितीचे प्रतिवृत्त सादर करणे व संमत करणे

प्रा.अनिल सोले (समिती सदस्य ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने अशासकीय विधेयके आणि ठराव समितीचे प्रतिवृत्त सादर करतो.

शुक्रवार, दिनांक 17 जुलै, 2015 रोजीच्या कामकाजाच्या क्रमात दाखविण्यात येणाऱ्या अशासकीय कामकाजास द्यावयाचा वेळ ठरविण्याकरिता गुरुवार, दिनांक 16 जुलै, 2015 रोजी समितीची बैठक झाली. अशासकीय कामकाजासाठी एकूण 150 मिनिटांचा वेळ उपलब्ध आहे. 2 अशासकीय विधेयके पुर:स्थापनार्थासाठी दर्शविण्यात येणार असून मंगळवार, दिनांक 14 जुलै, 2015 रोजी संगणकीय आज्ञावलीव्दारे प्राथम्यक्रमानुसार आलेल्या 3 अशासकीय ठरावांना खालीलप्रमाणे वेळ नेमून देण्यात यावा अशी शिफारस समितीने केली आहे.

<u>पुर:स्थापनार्थ</u>

| | | |
|---|---|---|
| 1. | सन 2015 चे वि.प.वि.क्रमांक 14 -महाराष्ट्र राज्य विशेष मागास प्रवर्ग-अ (एसबीसी-ए)करिता (राज्यातील शैक्षणिक संस्थांमधील जागांच्या प्रवेशाचे आणि राज्याच्या नियंत्रणाखाली लोकसेवांमधील नियुक्त्यांचे किंवा पदांचे) आरक्षण विधेयक, 2015 श्री.शरद रणपिसे, वि.प.स. यांचे. | 5 मिनिटांपेक्षा जास्त नाही. |
| 2. | सन 2015 चे वि.प.वि.क्रमांक 15 -महाराष्ट्र राज्य लोकसेवा (अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, निरधिसूचित जमाती (विमुक्त जाती), भटक्या जमाती, विशेष मागास प्रवर्ग आणि इतर मागासवर्ग यांच्यासाठी आरक्षण) (सुधारणा) विधेयक, 2015 श्री.शरद रणपिसे, वि.प.स. यांचे. | |

<u>बॅलेटद्वारा ठरविलेल्या प्राथम्यक्रमानुसार अशासकीय ठराव</u>

| | | |
|---|---|---|
| 1. | श्री.अमरनाथ राजूरकर, वि.प.स. यांचा ठराव क्रमांक 172 | 50 मिनिटांपेक्षा जास्त नाही. |
| 2. | श्री. प्रकाश बिनसाळे , वि.प.स. यांचा ठराव क्रमांक 44 | 50 मिनिटांपेक्षा जास्त नाही. |
| 3. | श्री. जयंत पाटील, वि.प.स.यांचा ठराव क्रमांक 7 | 45 मिनिटांपेक्षा जास्त नाही. |



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**तालिका सभापती** : अशासकीय विधेयके आणि ठराव समितीचे प्रतिवृत्त सभागृहास सादर झाले आहे.

प्रा.अनिल सोले : सभापती महोदय, अशासकीय विधेयके आणि ठराव समितीचे प्रतिवृत्त सभागृहाला संमत आहे, असा मी आपल्या अनुमतीने प्रस्ताव मांडतो.

प्रस्ताव मतास टाकून संमत झाला

------



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी./मु.शी.:** नियम 93 अन्वये सूचना

**तालिका सभापती** : माझ्याकडे दिनांक 14 जुलै, 2015, 15 जुलै, 2015 आणि 16 जुलै, 2015 रोजी नियम 93 अन्वये ज्या सूचना प्राप्त झाल्या त्या संदर्भातील माझे निर्णय उप सचिव वाचून दाखवतील.

उप सचिव : दिनांक 14 जुलै, 2015 रोजीच्या सूचना : -

सन्माननीय सदस्य सर्वश्री सतीश चव्हाण, धनंजय मुंडे यांनी "वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठातील विद्यार्थ्यांना ईबीसीच्या सवलतीसाठी आवश्यक असलेले प्रमाणपत्र घेतल्याशिवाय विद्यार्थ्यांचे प्रतिपूर्तीचे अर्ज सादर करुन न घेणे, महसूल अधिकारी सदर प्रमाणपत्र देण्यास टाळाटाळ करीत असणे, त्यामुळे विद्यार्थी आर्थिक तणावाखाली असणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री अमरसिंह पंडित, धनंजय मुंडे यांनी "चंपावती अर्बन को-ऑ.बँक मर्यादित, बीड या बँकेच्या अवसायक मंडळाने सन 2012-2013 या कालावधीत मोठ्या प्रमाणावर आर्थिक गैरव्यवहार व भ्रष्टाचार करणे, सबळ पुरावे असताना देखील या संदर्भात कोणतीही कारवाई न होणे, या प्रकरणात फौजदारी गुन्हे दाखल करुन दोषींना पाठीशी घालणाऱ्या अधिकाऱ्यांची चौकशी करण्याची होत असलेली मागणी" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री.आनंद ठाकूर यांनी "वाडा तालुक्यातील नेहरोली गावातील चैताली मुकणे या मुलीचा विजेच्या खांबाचा शॉक लागून झालेला मृत्यू, उघड्यावर मोडकळीस आलेल्या डी.पी.व ट्रान्सफॉर्मरकडे महावितरणाचे होत असलेले दुर्लक्ष, महावितरणाच्या अधिकाऱ्यांवर गुन्हा दाखल करुन मुलीच्या कुटुंबाला नुकसान भरपाई देण्याची करण्यात आलेली मागणी" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

उप सचिव....

यानंतर सन्माननीय सदस्य श्री.कपिल पाटील यांनी "युडायस सन 2013-2014 नुसार राज्यात 2 लाख 93 हजार अपंग विद्यार्थी असणे, यापैकी बहुतांश विद्यार्थ्यांना विशेष शिक्षकांमार्फत शिक्षण देण्याची गरज असणे, सन 2005 पासून कंत्राटी पद्धतीने शिक्षक कार्यरत असणे, या विद्यार्थ्यांसाठी पूर्णवेळ नियमित शिक्षकांची नेमणूक करण्याची आवश्यकता" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री जयंत प्र.पाटील, विजय सावंत, कपिल पाटील, श्रीकांत देशपांडे, दत्तात्रय सावंत यांनी "औरंगाबाद जिल्ह्यातील शेंद्रा औद्योगिक वसाहतीत मद्यनिर्मिती करणाऱ्या रॅडिको एन्व्ही डिस्टीलरी कंपनीमधून निघणाऱ्या काळ्या रंगाच्या "स्पेंटवॉश" या घातक रसायनामुळे कुंभेफळ, टाकळी वैद्य आणि टाकळी शिंपी या गावांतील जमिनी करपून जात असणे तसेच शेतकऱ्यांना या रसायनांचा त्रास होत असल्यामुळे त्यांच्यामध्ये पसरलेले चिंतेचे वातावरण" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य ॲड.निरंजन डावखरे यांनी "मुंबई शहर व उपनगरांमध्ये लेप्टोचे रुग्ण आढळून येणे, या रोगाच्या प्रादूर्भावावर नियंत्रण ठेवण्यास मुंबई महानगरपालिकेस आलेले अपयश" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री.धनंजय मुंडे यांनी "अभिनेत्री जुई गडकरी यांना युवकाकडून जीवे मारण्याची धमकी देण्यात येणे त्या संदर्भातील तक्रार कर्जत पोलीस ठाण्यात करुन देखील पोलिसांकडून कोणतीच कारवाई न होणे, त्यामुळे अभिनेत्रीच्या कुटुंबामध्ये निर्माण झालेले भीतीचे वातावरण व त्यांना संरक्षण देण्याची आवश्यकता" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर श्री.बोर्डे..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

उप सचिव....

**दिनांक 15 जुलै, 2015 रोजीच्या सूचना :-**

सन्माननीय सदस्य श्री.कपिल पाटील यांनी "कनिष्ठ महाविद्यालयातील 914 पायाभूत पदे मंजूर होऊनही त्यांना वेतन अनुदान मिळालेले नाही. तसेच कनिष्ठ महाविद्यालयांचे ऑनलाईन मूल्यांकन होऊनही मूल्यांकनात पात्र झालेल्या कनिष्ठ महाविद्यालयांना अनुदान देण्यात आलेले नसणे, गेली 7-8 वर्षे पगाराविना असलेल्या अशा सर्व शिक्षकांनी आणि संघटनांनी आंदोलन पुकारले असल्याबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री.अमरसिंह पंडित यांनी "उप जिल्हाधिकारी कार्यालय, बीड येथे मग्रारोहयो अंतर्गत कोट्यवधी रुपयांचा भ्रष्टाचार झाल्याच्या तक्रारी देऊनही प्रकरणाची चौकशी न होणे, तसेच दुष्काळी जिल्ह्यात योजनेच्या कामाचा बोजवारा होऊन मजुरांचा गंभीर प्रश्न निर्माण होणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री.सतीश चव्हाण यांनी "औरंगाबाद शहरातील वाढती लोकसंख्या विचारात घेता शासनाने जाहीर केलेल्या बृहत आराखड्यात स्त्री रुग्णालयाचा समावेश असून देखील सदरहू रुग्णालयाकरिता जागा न मिळणे, स्त्री रुग्णालय त्वरित कार्यान्वित होण्यासाठी जनतेची होत असलेली मागणी" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री.जगन्नाथ शिंदे यांनी "10 लाखांपेक्षा अधिक बांधकाम खर्च असणाऱ्या बांधकाम व्यवस्थापकांना बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाकडे या कामगारांच्या हितासाठी रक्कम जमा करावी लागणे बंधनकारक असताना काही बांधकाम व्यावसायिकांनी जमा केलेले धनादेश न वटल्याचे त्यांच्या अहवालात नमूद करणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

..2..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

उप सचिव....

यानंतर सन्माननीय सदस्य श्री.धनंजय मुंडे यांनी "हरसूल, जि.नाशिक येथे गावकऱ्यांनी पुकारलेल्या बंदला हिंसक वळण लागून पोलिसांच्या गोळीबारात एका तरुणाचा मृत्यू होणे, वाशिम जिल्ह्यात दोन गटात दंगल उसळून एका युवकाचा मृत्यू होणे, अशा प्रकारे पोलिसांच्या अकार्यक्षमतेमुळे कायदा व सुव्यवस्थेचे धिंदवडे निघणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री.जयवंतराव जाधव यांनी "आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत दुग्ध भुकटीच्या दरामध्ये मोठ्या प्रमाणात घसरण झाल्यामुळे देशातील दूध भुकटीच्या दरावर परिणाम होऊनही शासनाने दूध भुकटी निर्यात अनुदानासंदर्भात कोणताही निर्णय न घेणे, त्यामुळे दुग्ध व्यवसायाच्या विकासाला चालना देण्यासाठी हा व्यवसाय करणाऱ्या शेतकऱ्यांना दिलासा देण्याची आवश्यकता असणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

**दिनांक 16 जुलै, 2015 रोजीच्या सूचना :-**

सन्माननीय सदस्य श्री.जगन्नाथ शिंदे यांनी "राज्यातील पाठ्यपुस्तक मंडळाच्या स्वाध्याय पुस्तिकांचा संच खाजगी प्रकाशक विद्यार्थ्यांना अधिक दराने विकत असून त्यामुळे पालकांची आर्थिक पिळवणूक होत असणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री जयवंतराव जाधव, दीपकराव साळुंखे, अनिल भोसले यांनी "सन 2014 मधील खरीप हंगामातील विमा संरक्षण मिळालेल्या शेतकऱ्यांना नुकसान भरपाई जाहीर करुन देखील शासन निर्णयाअभावी लाभ मिळण्यासाठी प्रतीक्षा करावी लागणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

उप सचिव....

यानंतर सन्माननीय सदस्य श्री.अमरसिंह पंडित यांनी "बीड जिल्ह्यात जलयुक्त शिवार अभियानातील कामांबाबात जिल्ह्यात अनेक तक्रारी दाखल होऊन देखील याकडे अधिकाऱ्यांनी दुर्लक्ष केल्यामुळे शासकीय निधीचा अपव्यय आणि कामाच्या दर्जाबाबतचा गंभीर प्रश्न निर्माण होणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री अब्दुल्ला खान दुर्राणी, रामराव वडकुते, जयवंतराव जाधव यांनी "मराठवाडयासाठी स्वतंत्र दुसरे महसूल आयुक्तालय परभणी येथे स्थापन करण्याबाबत राज्य शासनाने वेळकाढूपणाचे धोरण अवलंबिल्याबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री.धनंजय मुंडे यांनी "राज्य शासनाने शासन निर्णय दिनांक 18.8.2004 रोजी अपंगांच्या शाळा व कर्मचाऱ्यांचा आकृतीबंध निश्चित केला असून प्रत्यक्षात अंमलबजावणी न झाल्याने शाळेतील विद्यार्थ्यांवर तसेच व्यवस्थापनावर होत असलेला विपरीत परिणाम" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

------

**तालिका सभापती** : सभागृहाची बैठक आता स्थगित होत आहे. सभागृहाची बैठक उद्या शुक्रवार, दिनांक 17 जुलै, 2015 रोजी सकाळी 10.00 वाजता पुन्हा भरेल. सकाळी 10.00 ते 11.30 वाजेपर्यंत सभागृहाची विशेष बैठक घेण्यात येईल. सदरहू बैठकीत लक्षवेधी सूचना घेण्यात येतील. त्यानंतर सभागृहाची नियमित बैठक दुपारी 12.00 वाजता पुन्हा भरेल.

( सभागृहाची बैठक सायंकाळी 6 वाजून 23 मिनिटांनी, शुक्रवार, दिनांक 17 जुलै, 2015 रोजीच्या सकाळी 10.00 वाजेपर्यंत स्थगित झाली )

---------

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION